CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

लातूर | शुक्रवार, ३१ ऑक्टोबर २०२५ । वर्ष ३ रे अंक २४० । पाने १२ । किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. ▌dainiktarunbharat.com ▌epaper.dainiktarunbharat.com




## विचारपुष्प



विद्यार्थी उद्याचा नव्हे, तर आजचा नागरिक आहे. कारण तो समाजाशी जोडलेला आहे आणि त्यासाठी समाज परिवर्तनात त्याचे योगदान आवश्यक आहे. त्याने समाज परिवर्तनात साथ देणे आवश्यक आहे.

**- मदनदास देवी**
रा. स्व. संघाचे पूर्व सह सरकार्यवाह

## महत्त्वाचे

### ट्रम्प-जिनपिंग कराराचा बाजाराला फटका

**मुंबई** : अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि चीनचे जिनपिंग यांच्यात व्यापार करार होण्याच्या शक्यतेची बातमी देशांतर्गत बाजारांसाठी प्रतिकूल ठरली. बुधवारच्या तेजीनंतर गुरुवारी देशांतर्गत बाजारात मोठी घसरण झाली. दिवसभरातील कारभारादरम्यान विक्रीचा दबाव कायम राहिला. निर्देशांकात ५९३ अंकांची घसरण झाली आणि तो ८४,४०४ वर बंद झाला तसेच निफ्टी १७६ अंकांनी खाली येत २५,८८८वर स्थिरावला. बाजाराची सुरुवातच घसरणीने झाली. बहुतांश क्षेत्रातील शेअर्स खाली आले होते. त्यात धातू, आयटी, ग्राहकी वस्तू आणि औषधी कंपन्यांचा समावेश होता. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी मात्र बाजाराला मोठ्या घसरणीपासून सावरले. ■

### २४ नोव्हेंबरला शपथ घेणार नवे सरन्यायाधीश

**नवी दिल्ली** : केंद्र सरकारने गुरुवारी अधिकृतपणे पुढील सरन्यायाधीशांचे नाव जाहीर केले. न्यायमूर्ती सूर्यकांत हे पुढील सरन्यायाधीश असतील. विद्यमान सरन्यायाधीश भूषण गवई २३ नोव्हेंबर रोजी निवृत्त होतील आणि न्या. सूर्यकांत २४ नोव्हेंबर रोजी नवे सरन्यायाधीश म्हणून शपथ ग्रहण करतील, अशी घोषणा केंद्रीय कायदेमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी केली. सरन्यायाधीश गवई यांनी पुढील सरन्यायाधीश म्हणून न्या. सूर्यकांत यांच्या नावाची शिफारस केंद्र सरकारकडे केली होती. वरिष्ठतेच्या आधारावर ते सरन्यायाधीश होणार आहेत. ■

### टेंभुर्णीत आज ऊस परिषद

**टेंभुर्णी** : शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी, गतवर्षी अनेक साखर कारखान्यांनी जाहीर केलेला ऊस दर दिला नाही, सध्याच्या गळीत हंगामासाठी पहिली उचल किती? या व आदी मागण्यांसाठी ना पक्षाचा, ना नेत्याचा, ना जातीचा; लढा फक्त शेतकरी एकजुटीचा या तत्त्वाखाली टेंभुर्णी येथे जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी ऊस परिषदेचे आयोजन शुक्रवार, दि.३१ रोजी केले असल्याची माहिती रयत क्रांती पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुहास पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली. जिल्ह्यातील सुरू होणाऱ्या गाळप हंगामातील पहिली उचल जिल्ह्यातील एकाही कारखान्याने जाहीर केलेली नाही. कारखानदारांकडून एक ते दोन टक्के रिकव्हरी कमी दाखवली. जाते, उप पदार्थापासून मिळणाऱ्या उत्पन्नात शेतकऱ्याची वाटणी का नाही? साखरेला चाळीस रुपये हमीभाव करावा, साखरेचा दर उद्योगासाठी जास्तीचा व सामान्य नागरिकांसाठी कमी असावा, इथेनॉल निर्मितीवर जास्त भर देऊन परकीय चलन वाढवून जनतेच्या हिताचा निर्णय केंद्र सरकारने घ्यावा आणि संपूर्ण कर्जमाफी मिळावी या व इतर मागण्यांसाठी या ऊस परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील भोगावती सहकारी साखर कारखाने ३४०० रुपये पहिली उचल जाहीर केली आहे. हीच पहिली उचल ऊस परिषदेमध्ये ठरवण्यासाठीच परिषदेचे आयोजन केले आहे.

# १७ अल्पवयीन मुलांसह १९ जणांना ठेवले ओलीस

## पवईत थरार, आरोपी रोहित आर्याचे एन्काऊंटर

◆ **मुंबई, ३० ऑक्टोबर**

**पवईतीलल एका स्टुडिओमध्ये ऑडिशनसाठी आलेल्या १७ मुलांसह १९ जणांना एका माथेफिरुनं ओलीस ठेवल्यानं मोठी खळबळ उडाली आणि तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. ही घटना पवई येथील आरए स्टुडिओमध्ये घडली. मात्र, मुंबई पोलिसांनी केलेल्या गोळीबारात रोहित आर्या नामक ओलीस ठेवणारा व्यक्ती ठार झाला. गुरुवारी दुपारी सुरु झालेला हा थरार सायंकाळी संपला.**



रोहितने याच आरए स्टुडिओमध्ये मुलांना ओलीस ठेवले होते

### कोण होता रोहित आर्या?



पुण्याचा रहिवाशी असलेला रोहित आर्या प्रोजेक्ट लेट्स चेंज या संस्थेचा संस्थापक व संचालक होता. २०१३ मध्ये गुजरातमध्ये त्यांनी स्वच्छता मॉनिटर हा उपक्रम सुरू केला होता, तत्कालीन मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांनी याबाबत त्याचं कौतुक केलं होतं. प्रोजेक्ट लेट्स चेंज ही स्वयंसेवी संस्था (एनजीओ) आहे जी शाळांमध्ये स्वच्छता जागृती आणि मुलांना स्वच्छता दूत बनवण्यावर काम करते. जी शाळांमध्ये स्वच्छता जागृती आणि मुलांना स्वच्छता दूत बनवण्यावर काम करते. तसेच ''माझी शाळा, सुंदर शाळा'' या प्रकल्पाचे डिझाईनही त्यानेच केल्याचा दावा त्याचा आहे. पण त्याची दखल घेतली नसल्याने त्याने सरकारच्या विरोधात देखील मागीलवर्षी आंदोलन केले होते. ■

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंबईच्या पवई परिसरात असलेल्या एका इमारतीच्या तळमजल्यावरील आरए स्टुडिओमध्ये चित्रपटाच्या ऑडिशनसाठी सुमारे १०० मुले जमली होती. याच दरम्यान रोहित आर्य नावाच्या एका व्यक्तीने १७ अल्पवयीन मुलांसह १९ जणांना ओलीस ठेवले. त्यांना एका खोलीत डांबून ठेवले होते. पोलिस तातडीने घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी आरोपीशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला. मुलांचे पालक आणि इतर लोकही घटनास्थळी जमा झाले होते. सुदैवाने, पोलिसांनी अत्यंत शिताफीने स्टुडिओमध्ये आत प्रवेश केला. मात्र, आरोपी आर्याने पोलिसांवर एअरगनने गोळ्या झाडल्या. त्याला प्रत्युत्तर देताना पोलिसांनी केलेल्या गोळीबारात आर्या गंभीर जखमी झाला. त्याला तातडीणे रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. आर्याला जखमी अवस्थेत ताब्यात घेतल्यानंतर सर्व बंधकांना सुखरुप सोडविले.

**तर मी मुलांना आग लावून देईन**

मुलांना ओलीस ठेवल्यानंतर आरोपीने व्हिडिओ मेसेज प्रसारीत करीत (पान २ वर)

# शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी सरकारकडून समिती स्थापन

**शासनाने काढला अध्यादेश | प्रवीण परदेशी यांच्याकडे अध्यक्षपद | सहा महिन्यांत अहवाल सादर करण्याचे आदेश**

◆ **मुंबई, ३० ऑक्टोबर**

कर्जमाफीचा निर्णय घेवून शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याच्या मागणीसाठी प्रहार संघटनेचे माजी आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वात नागपुरातील जामठा परिसरात आणि नागपूर-वर्धा महामार्गावर दोन दिवसांपासून आंदोलन सुरू आहे. यावर तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कडू यांना मुंबईत बैठकीसाठी बोलावले. गुरुवारी त्यांच्यासोबत चर्चा सुरू असताना राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी उच्चाधिकार समिती स्थापन करण्याचा अध्यादेश काढला.

समितीचे अध्यक्ष मुख्यमंत्र्यांचे प्रधान आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी यांच्याकडे देण्यात आले असून, सहा महिन्यांत समितीला कर्जामाफिसंदर्भात अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करण्याचे धोरण राज्य शासनाने स्वीकारले आहे. शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीचा निर्णय घेताना शेवटच्या घटकातील एकही शेतकरी सुटू नये, याची खबरदारी घेण्यासाठी अहवाल तयार करण्याची जबाबदारी समितीकडे आहे.

कर्जमाफीसाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीच्या बैठकांना बच्चू कडू यांना निमंत्रित करण्यात येईल.

### मुंबईत मुख्यमंत्री फडणवीस-बच्चू कडू यांच्यात चर्चा

बुधवारच्या आंदोलनानंतर बच्चू कडू सरकारशी चर्चेसाठी मुंबईला रवाना झाले. गुरुवारी रात्री बच्चू कडू आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात सह्याद्री अतिथीगृहात चर्चा झाली. या प्रसंगी उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. ■

त्यांच्या सर्व सूचना आणि प्रस्तावांचा आग्रहपूर्वक समावेश केला जाईल. या समितीचा अहवाल सर्वांसाठी खुला राहील. त्यासोबतच येत्या खरीप हंगामासाठी कर्ज थकीत असलेल्या शेतकऱ्यांनाही कर्ज देण्यात येणार असल्याचे अध्यादेशात नमूद आहे.

**शेतकऱ्यांचे जीवनमान बदलण्यासाठी सूचना करणार**

ही समिती शेती क्षेत्रात आणि अनेक कर्जमाफी योजना असूनही कर्जात बुडालेल्या शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तनकारी बदल आणण्यासाठी अभ्यास करेल आणि सुधारणा सुचवेल. या समितीमध्ये महसूल, वित्त, कृषी आणि सहकार विभागातील वरिष्ठ अधिकारी, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, बँक ऑफ महाराष्ट्र आणि माहिती आणि तंत्रज्ञान विभागाचे प्रतिनिधी यांचा समावेश आहे. समिती गरजेनुसार इतर विभागातील तज्ज्ञ आणि अधिकाऱ्यांना आमंत्रित करू शकेल. *(वृत्तसंस्था)*


गुरुवारी मनोज जरांगे पाटील आणि बच्चू कडू यांनी पत्रकारांशी संवाद साधला. या आंदोलनाला पाठिंबा असल्याचे जरांगे यांनी सांगितले

# लाचखोर विस्तार अधिकाऱ्यास अटक

## बिलाची रक्कम बँक खात्यातून काढण्याची परवानगी देण्यासाठी घेतली २ हजाराची लाच

### गुरुवारी सायंकाळी जिल्हा परिषदेत झाली कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर -**

मंजूर बिलाची रक्कम ग्रामपंचायत बँक खात्यातून काढण्याची परवानगी देण्यासाठी २ हजारांची लाच स्विकारणाऱ्या दक्षिण सोलापूर पंचायत समितीच्या विस्तार अधिकाऱ्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून रंगेहात अटक केली.



ही कारवाई गुरुवारी सायंकाळच्या सुमारास जिल्हा परिषद कार्यालयात करण्यात आली. संदीप सुधाकर खरबस (वय ५२, रा. जुळे सोला- पूर) असे अटक करण्यात आलेल्या विस्तार अधिकाऱ्याचे नाव आहे. याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शासनाच्या १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत येळेगाव (ता. दक्षिण सोलापूर) येथे सिमेंट कॉक्रींट रोडचे काम करण्यात आले होते. हे काम पूर्ण झाल्यानंतर यातील तक्रारदार यांनी सदर कामाचे १ लाख रुपयांचे बिल मूल्यांकन प्रमाणपत्राप्रमाणे मिळण्यासाठीचा प्रस्ताव दक्षिण सोलापूर पंचायत समिती कार्यालयात सादर केला होता. त्याचा पाठपुरावा तक्रारदार करीत असताना सदर कामाचे मंजुर बिलाची रक्कम ग्रामपंचायत बँक खात्यातून काढण्याची परवानगी देण्यासाठी विस्तार अधिकारी संदीप खरबस यांनी २ हजार रुपये लाचेची मागणी केली होती. त्यामुळे तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती. या तक्रारीची पडताळणी केल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून गुरुवारी सायंकाळी जिल्हा परिषद आवारात सापळा लावला होता. त्यावेळी २ हजार रुपये लाचेची रक्कम स्विकारताना विस्तार अधिकारी संदीप खरबस यास रंगेहात पकडण्यात आले. याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई उपअधिक्षक प्रशांत चौगुले, पो. नि. शैलेश पवार, हवालदार अतुल घाडगे, स्वामीराव जाधव, सलीम मुल्ला यांनी केली.

**वडीलांनी काम केलेल्या पोलिस ठाण्यातच मुलावर गुन्हा दाखल...**

लाचखोर विस्तार अधिकारी संदीप खरबस याचे वडील तत्कालीन पोलिस निरीक्षक सुधाकर खरबस यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात पोलिस निरीक्षक म्हणून काम करून सेवानिवृत्त झालेले आहेत. वडील काम केलेल्या पोलिस ठाण्यातच मुलावर लाचखोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# संशयित दहशतवादी जुबेरच्या संपर्कातील सोलापूरचे दोघे एटीएसच्या ताब्यात

## सीडीआरवरून कारवाईने सोलापुरात खळबळ; इतरांनाही चौकशीसाठी ताब्यात घेण्याची शक्यता

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर -**

पुणे एटीएस पथकाने सीडीआरवूरन सोलापूर शहरातील दोघां बंधूंना ताब्यात घेत पुण्याला नेले आहे. एकास पुण्यातून तर दुसऱ्या भावास बुधवारी शहरातून चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. हे दोघे बंधून उच्च शिक्षित असून ते चांगल्या ठिकाणी नोकरीस आहेत. ताब्यात घेतलेल्या दोघांपैकी एकजण सोलापूर महापालिकेच्या शाळेत शिक्षक व तर दुसरा आयटी कंपनीत चांगल्या पगारावर नौकरीस आहे.

अल कायदा या दहशतवादी संघटनेच्या संपर्कात असलेल्या जुबेर यांच्या हे दोघे संपर्कात होते, अशी माहिती एटीएस पथकाकडे असल्याने त्यांना तात्काळ ताब्यात घेतले आहे. सोलापुरातून ताब्या घेतलेला व्यक्ती हा जेलरोड पोलिस ठाण्याच्या हद्दीतील आहे. एटीएसने सोलापुरात केलेल्या दहदतवादी विरोधी कारवाईमुळे खळबळ उडाली आहे. अक्कलकोट




तालुक्यातील वळसंग येथील एका शाळेत १७ ते १९ ऑक्टोंबर २०२५ दरम्यान व्यक्तीमत्व विकास शिबिराचा कार्यक्रम घेतला होता. या कार्यक्रमाचे आयोजन सोलापूर शहरातील एक वकील अध्यक्ष असलेल्या संघटनेने आयोजित केला होता. या शिबीरात विविध जिल्ह्यातील १६ ते २० वर्षे वयोगटातील काही ठरावीक मुलांनी हजेरी लावली होती. त्या कार्यक्रमास त्यांनी उच्च शिक्षित व आयटीमधील तज्ञ जुबेर हंगरगेकर (वय ३५, रा. कोढवा, पुणे मूळ रा. सोलापूर) यास बोलावले होते. १७ ते १९ ऑक्टोबर २०२५ रोजी वळसंग (ता. अक्कलकोट) येथील शाळेत त्याने हजेरी लावली होती. या शिबीरात कोणत्या प्रकारची माहिती किंवा प्रशिक्षण देण्यात आले याचा तपास सुरु आहे.

दहशतवादी संघटनेशी संपर्कात असल्याने एटीएस पथकाने पुणे रेल्वे स्थानकातून त्याला अटक केली आहे. त्याच्या संपर्कात असलेले सोलापूर शहरातील दोघां बंधूंना देखील एटीएस पथकाने ताब्यात घेतले आहे. त्यांची चौकशी सुरु आहे. मात्र सोलापुरात जुबेर यास कार्यक्रमासाठी बोलणाऱ्यांना त्या संस्थेचा अध्यक्ष व सचिव यांना देखील एटीएस पथकाकडून ताब्यात घेण्याची कारवाई होऊ शकते, असे सांगण्यात येत आहे. जुबेर हंगरगेकर उच्च शिक्षत आहे. त्याबरोबर त्या दिवशी कार्यक्रमासाठी संभाजी नगर आणि पुणे येथीलही एक व्यक्ती उपस्थित होता. त्यामुळे जेवढे जण संपर्कात आले त्या सर्वांना एटीएसचे पथकाकडून चौकशीसाठी ताब्यात घेतले जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# ऑस्ट्रेलियाला हरवून भारताच्या वाघिणींची फायनलमध्ये एन्ट्री




**जेमिमा रॉड्रिग्ज**
धावा : १२७
चेंडू : १३४
चौकार : १४

**नवी मुंबई** : महिला वर्ल्ड कप २०२५ च्या दुसऱ्या उपांत्य फेरीत टीम इंडियाने दमदार खेळ करत ऑस्ट्रेलियाचा पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. कर्णधार हरमनप्रीत कौर आणि जेमिमा रॉड्रिग्ज यांच्या शतकी भागीदारीमुळे भारताने ऑस्ट्रेलियाला पाच विकेट्सने पराभूत केले. या विजयासह टीम इंडियाने ऐतिहासिक कामगिरी करत अंतिम फेरी गाठली आहे. आता विजेतेपदासाठी भारताचा सामना दक्षिण आफ्रिकेशी रविवारी, २ नोव्हेंबर रोजी मुंबईतील डी. वाय. पाटील स्टेडियमवर होणार आहे. जेमिमा रॉड्रिग्जने उपांत्य फेरीत नाबाद १२७ धावांची अप्रतिम खेळी करत सर्वांना मंत्रमुग्ध केले. उजव्या हाताच्या या तडाखेबाज फलंदाजीनं १३४ चेंडूंत १४ चौकार लगावले आणि ९४.७८ चा स्ट्राईक रेट राखला. शेफाली वर्मा बाद झाल्यानंतर जेमिमा क्रीजवर आली आणि त्यानंतर सामना पूर्णपणे आपल्या नियंत्रणात घेतला. तिनं सुरुवातीपासूनच सिंगल-डबल्ससह जबरदस्त चौकारांची आतषबाजी केली. कर्णधार हरमनप्रीतसोबत तिनं शतकी भागीदारी केली. कौरच्या दमदार ८९ धावांच्या खेळीमुळे भारताने अवघ्या ९ चेंडू शिल्लक ठेवत विजय मिळवला आणि लक्ष्य सहज गाठले.

# निवडणूक प्रचार खर्चाच्या मर्यादेत वाढ

## १५ लाख खर्च करू शकतील मुंबई, पुणे, नागपूरचे उमेदवार

◆ **मुंबई, ३० ऑक्टोबर**

राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी उमेदवारांकडून प्रचारासाठी करण्यात येणाऱ्या खर्चाची मर्यादा आठ वर्षांनंतर वाढवली आहे. मुंबई, पुणे आणि नागपूरसाठी खर्चाची मर्यादा प्रती उमेदवार १५ लाखापर्यंत निश्चित करण्यात आली.

निवडणूक आयोगाने गुरुवारी जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, राज्यातील 'अ'वर्गात मोडणाऱ्या तीन महानगरपालिका मुंबई, पुणे आणि नागपूरसाठी प्रती उमेदवार प्रचारासाठी १५ लाखापर्यंत खर्च करू शकतील. 'ब' वर्गात मोडणाऱ्या महापालिकांसाठी १३ लाख तर 'क' वर्ग महापालिकांसाठी ११ लाखांची मर्यादा निश्चित करण्यात आली. वर्ग 'ड' मध्ये येणाऱ्या १९ महापालिकांसाठी निवडणूक लढवणारे उमेदवार ९ लाखापर्यंत खर्च करू शकतील.



'अ' वर्ग नगरपरिषदांसाठी नगराध्यक्षपदाची निवडणूक लढवणारे उमेदवार प्रचारावर १५ लाख रुपये आणि सदस्य पाच लाखापर्यंत खर्चाची मर्यादा निश्चित केली आहे. याशिवाय 'ब' वर्ग नगरपरिषदांमध्ये नगराध्यक्षाची निवडणूक लढवणारे उमेदवार प्रचारावर ११.२५ लाख आणि सदस्य ३.५ लाखापर्यंत खर्च करू शकतील. 'क' वर्गात मोडणाऱ्या नगरपरिषदेच्या अध्यक्षपदाच्या उमेदवारासाठी ७.५ लाख आणि सदस्यपदाच्या उमेदवारासाठी २.५ लाख रुपये खर्चाची मर्यादा निश्चित आहे. *(वृत्तसंस्था)*

### नगराध्यक्षपदाच्या उमेदवाराला सहा लाखांपर्यंत मर्यादा

नगरपंचायतीसाठी थेट अध्यक्षपदाची निवडणूक लढवणारा उमेदवार सहा लाखापर्यंत तर सदस्यपदासाठी २.२५ लाखांपर्यंतचा खर्च प्रचारावर करता येईल. ७१ ते ७५ जागा असलेल्या नगरपंचायतीच्या निवडणुका लढवणारे उमेदवार प्रचारावर ९ लाखापर्यंत खर्च करू शकतील, तर पंचायत समिती सदस्याची निवडणूक लढवणारे सहा लाखांपर्यंत खर्च करण्याची मुभा असेल. ६१ ते ७० जागा असलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य पदाची निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांसाठी खर्चाची मर्यादा अनुक्रमे ७.५ लाख आणि ५.२५ लाख इतकी निश्चित केली आहे. ग्रामपंचायतीसाठी सरपंचाची निवडणूक लढवणारे ७५ हजार आणि सदस्याची निवडणूक प्रचारासाठी ४० हजार इतकी मर्यादा निश्चित करण्यात आली. ■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे

### आयकर परतावा भरण्यास मुदतवाढ

**नवी दिल्ली** : आयकर परतावा भरण्याची मुदत वाढविण्यात आली आहे. आयकर विभागाने तशी नोटीस काढून सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर जारी केली आहे. यात ऑडिट केलेले आयकर रिटर्न दाखल करण्याची अंतिम तारीख १० डिसेंबरपर्यंत वाढवण्यात आली आहे. यामुळे ज्यांना कर ऑडिट करणे बंधनकारक आहे आणि ज्यांचे कर ऑडिट बॉकी आहे, अशा करदात्यांना आता दंडाशिवाय आपले रिटर्न दाखल करण्यासाठी आणखी वेळ मिळाला आहे. याआधी ही तारीख ३० सप्टेंबर होती. नंतर ती ३१ ऑक्टोबरपर्यंत वाढवण्यात आली होती. सीए संस्था आणि कर व्यावसायिकांच्या मागणीनंतर आयकर विभागाने पुन्हा याला मुदतवाढ दिली आहे.




### ड्रग्ज माफियांविरोधातील कारवाईत ४ पोलिसांसह ६४ जणांचा मृत्यू

**रिओ दि जानेरो** : ब्राझीलमधील रिओ दि जानेरो येथील पोलिसांनी ड्रग्ज माफियांविरोधात राबविलेल्या मोहिमेत ६४ जणांचा मृत्यू झाला, त्यात चार पोलिसांचा समावेश आहे. कारवाईसाठी आलेल्या पोलिसांच्या ताफ्यावर ड्रग्ज माफिया आणि तस्करांनी गोळीबार केला. एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, रिओ दि जानेरोच्या उत्तरेकडील भागात असलेल्या अलेमाओ आणि पेन्हा येथे मंगळवारी सकाळी सुमारे २५०० सुरक्षा कर्मचाऱ्यांनी ड्रग्ज माफिया आणि तस्करांवर कारवाई केली. पोलिस पथके पुढे जात असताना, रेड कमांड टोळीच्या सदस्यांनी गोळीबार सुरू केला. पोलिसांना अडथळा आणण्यासाठी ड्रोनमधून बॉम्ब टाकले. पोलिसांनी जोरदार प्रत्युत्तर दिले, या चकमकीत ६४ जणांचा मृत्यू झाला, त्यात चार पोलिसांचा समावेश आहे. या कारवाईत आतापर्यंत ८० पेक्षा अधिक तस्करांना अटक करण्यात आली, तर २०० किलोपेक्षा जास्त ड्रग्ज, अनेक रायफल आणि इतर शस्त्रे जप्त करण्यात आली.

### ठाण्यातील सदनिकेमध्ये आग, एकाचा मृत्यू

**ठाणे** : ठाणे शहरातील एका चार मजली सदनिकेमध्ये आग लागल्यामुळे एका व्यक्तीचा मृत्यू झाला, असे अधिकाऱ्यांनी गुरुवारी सांगितले. वागळे इस्टेट परिसरातील प्रथमेश अपार्टमेंटच्या चौथ्या मजल्यावर असलेल्या फ्लॅटमध्ये बुधवारी रात्री ९.४५ वाजता आग लागल्याची माहिती मिळाली, असे ठाणे महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे प्रमुख यासीन तडवी यांनी सांगितले. अग्निशमन दलाला माहिती मिळताच घटनास्थळी धाव घेतली आणि रात्री १०.१० वाजता आग विझवण्यात आली, असे त्यांनी सांगितले. या आगीत सदनिका मालक सचिन निकम (४५) गंभीर भाजले होते. त्यांना कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र त्यांना दाखल केल्यानंतर मृत घोषित करण्यात आले. आगीत सदनिकामधील विजेचे वायरिंग, छतावरील पंखे, गाद्या आणि इतर घरगुती वस्तूंचे नुकसान झाले आहे.

### जम्मू-काश्मीर विधानसभेत आमदारांत हाणामारी

**श्रीनगर** : गुरुवारी जम्मू आणि काश्मीर विधानसभेत विरोधी पक्षाच्या भाजपा आमदारांची एनसी आमदारांशी हाणामारी झाली. सभागृहाचे कामकाज सुरू होताच भाजपा नेते उभे राहिले आणि त्यांनी प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याची मागणी केली. त्यांनी जम्मूच्या पूरग्रस्त भागांवर अर्धा तास चर्चा करण्याची मागणी केली. तथापि, सभापती अब्दुल रहीम राथेर यांनी भाजपा आमदारांना प्रश्नोत्तराचा तास सुरू ठेवण्याची विनंती केली.

### शेअर बाजार

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ८४,४०४.४६ (-५९२.६७) |
| निफ्टी | २५,८७७.८५ (-१७६.०५) |



### सराफा

| | |
|---|---|
| सोने (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,२०,९०० |
| चांदी (प्रतिकिलो) | रु. १,४९,२०० |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३२.६ | २३.0 |
| अमरावती | २९.८ | २१.१ |
| भंडारा | २८.० | २०.० |
| बुलडाणा | २९.६ | २१.२ |
| चंद्रपूर | २९.२ | २२.६ |
| गडचिरोली | २८.० | २२.६ |
| गोंदिया | २५.४ | २२.० |
| नागपूर | २६.४ | २३.४ |
| वर्धा | २९.० | २३.० |
| वाशीम | -.- | २१.६ |
| यवतमाळ | २८.० | २२.० |

# दारू पिऊन ड्युटीवर येणाऱ्यांची खैर नाही

## एसटी महामंडळाची व्यापक तपासणी मोहीम ● कठोर कारवाईचा परिवहन मंत्र्यांचा निर्देश

◆ **मुंबई, ३० ऑक्टोबर**

कर्तव्यावर असताना महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचा चालक, वाहक किंवा अन्य कर्मचारी मद्यपान करून असल्यास आता त्याची खैर नाही. अशा कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे निर्देश परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिले आहे.

एसटी ही महाराष्ट्राची 'लोकवाहिनी' आहे. दररोज लाखो सर्वसामान्य नागरिक एसटीच्या प्रवासी सेवेचा लाभ घेतात. त्यांना सुरक्षित आणि सौजन्यशील सेवा देणे हे एसटीच्या प्रत्येक कर्मचाऱ्याचे कर्तव्य आहे. परंतु काही कर्मचारी कर्तव्यावर असताना मद्यपान करून गैरवर्तन करत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या.

त्या अनुषंगाने एसटीच्या सुरक्षा व दक्षता खात्याला तातडीने मोहीम राबवण्याच्या सुचना करण्यात आल्या होत्या. त्यातून अशा मद्यपी कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार राज्यभरात एकाच वेळी कोणतीही पूर्वकल्पना न देता कडक तपासणी मोहीम राबविण्यात आली. या तपासणी मोहिमेत सापडलेल्या मद्यपी कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल, असे यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.



**मोहीम कशी राबवली**

मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिलेल्या निर्देशानुसार एसटी महामंडळाच्या सुरक्षा आणि दक्षता खात्याने २८ ऑक्टोबरला राज्यभरातील सर्व विभागांमध्ये कार्यरत असलेले चालक, वाहक आणि यांत्रिक कर्मचाऱ्यांच्या मद्यपान तपासणीची एक मोठी मोहीम राबविली. या अचानक केलेल्या तपासणी मोहिमेमुळे महामंडळात एकच खळबळ उडाली. या कारवाईत संशयास्पद एकूण ७१९ चालक, ५२४ वाहक आणि ४५८ यांत्रिक कर्मचारी अशा सुमारे १७०१ कर्मचाऱ्यांची तपासणी करण्यात आली. या कारवाईत दोषी आढळलेल्या ७ कर्मचाऱ्यांवर दोषारोप निश्चित करण्यात आले आहेत. ◂(तभा वृत्तसेवा)

### भंडाऱ्यात आढळला मद्यपी कर्मचारी

धुळे विभागाच्या तपासणीत एक यांत्रिक कर्मचारी, एक स्वच्छक आणि एक चालक मद्यपान करताना आढळले.नाशिक येथे तपासणी केलेल्यांमध्ये एक चालक दोषी आढळला. परभणी आणि भंडारा विभागांत प्रत्येकी एक यांत्रिक कर्मचारी मद्याच्या अंमलाखाली काम करताना आढळला. नांदेड विभागामध्ये तपासणीत एक वाहक मद्यपान केलेला आढळला.

# रा. स्व. संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते सुनील राऊत यांचे निधन

◆ **पुणे, ३० ऑक्टोबर**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक आणि सिंहगड भागाचे संघचालक सुनील मधुकरराव राऊत यांचे गुरुवारी पहाटे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. ते ६९ वर्षांचे होते.



त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, जावई आणि नात असा मोठा आप्तपरिवार आहे. १९६४ पासून संघाचे निष्ठावंत स्वयंसेवक असलेले सुनीलजी राऊत यांनी आपल्या जीवनातील बहुतांश काळ संघकार्याला समर्पित केला होता. व्यवसायाने इलेक्ट्रिकल इंजिनीयर असलेल्या राऊत यांनी सुरुवातीला काही काळ नोकरी केली, त्यानंतर उद्योग क्षेत्रात नाव कमावले. परदेशात असतानाही त्यांनी संघाच्या विचारांशी नाळ जोडलेली ठेवली. संघाचे तृतीय वर्ष पूर्ण केल्यानंतर त्यांनी कोल्हापूर जिल्ह्यात तीन वर्षे प्रचारक म्हणून पूर्णवेळ कार्य केले होते.

संघाच्या सिंहगड भागाचे संघचालक म्हणून ते जबाबदारी सांभाळत होते. तसेच त्यांनी कौशिक आश्रम आणि अक्षय सेवा संशोधन प्रतिष्ठान या सामाजिक संस्थांचे अध्यक्ष म्हणूनही कार्य केले. त्यांच्या पार्थिवावर वैकुंठ स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आला. ◂(वृत्तसंस्था)

# क्षयरोगमुक्त मोहिमेत गोंदियाची आघाडी

◆ **गोंदिया, ३० ऑक्टोबर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या धोरणानुसार २०२५ पर्यंत भारत क्षयरोग मुक्त करण्याचे ध्येय ठरविण्यात आले. पंतप्रधान क्षयरोगमुक्त भारत मोहिमेंतर्गत गोंदिया जिल्ह्याने २०२४-२५ या वर्षात राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. २०२५-२६ या वर्षातही जिल्ह्याने केंद्र सरकारने ठरवून दिलेल्या १० बिंदूवर काम करण्यास सुरुवात केली असून, यावर्षी सुद्धा राज्यात अव्वल स्थान टिकवून ठेवण्याकरिता आरोग्य विभाग कामाला लागल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभिजित गोल्हार यांनी दिली.



कार्यक्रमाला उपस्थित डॉ. गोल्हार, डॉ. विनोद चव्हाण व अन्य

डॉ. गोल्हार यांनी प्रेस क्लबच्यावतीने आयोजित मिट द प्रेस या कार्यक्रमात सांगितले की, आधीच्या तुलनेत आमच्याकडे आता तपासणी प्रयोगशाळा व निक्षय मित्रांचा मिळत असलेल्या उत्कृष्ट सहभागामुळेच जिल्ह्याचे नाव राज्यपातळीवर आले आहे. योग्य औषधोपचार, समतोल आहार घेतल्यास या रोगावर सहज मात करता येते. क्षयरोगाने बाधित रुग्ण दगावू नये म्हणून शासनातर्फे जिल्ह्यात राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९० टक्क्यांपेक्षा अधिक असल्याने जिल्ह्याने राज्यस्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त केला. जिल्ह्यात २१ प्रयोगशाळांतून तपासणी केली जात असून, डिसेंबरअखेर ४९ हजार ५४७ तपासणीचे लक्ष्यांक देण्यात आले होते, जे सप्टेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करीत ६७ हजार ८१९ तपासण्या पूर्ण करण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे १०० दिवस कार्यक्रमांतर्गत ३२० रुग्ण शोधण्याचे उदिष्ठ असताना ७२० नवीन रुग्णांचा शोध घेण्यात आले. ◂(तभा वृत्तसेवा)

# रा. सू. गवईंच्या स्मारकाचे थाटात लोकार्पण

### शासनाकडून गौरव

◆ **अमरावती, ३० ऑक्टोबर**

रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई यांचे कार्य मार्गदर्शक ठरावे तसेच त्यांच्या कार्याची ओळख नव्या पिढीला व्हावी, यासाठी स्मारक आणि सर्वंकष वाटचालीचा दस्तावेज तयार करण्यासाठी संदर्भ ग्रंथ प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला. या दोन्ही प्रकल्पांतून त्यांच्या कार्याचा गौरव राज्य शासनाने केला आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

दिवंगत नेते रा. सू. गवई यांच्या स्मारकाचे गुरुवारी दुपारी उद्घाटन केल्यानंतर स्मारकस्थळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या हस्ते स्मारकाचे लोकार्पण झाले. यावेळी कमलताई गवई, उपमुख्यमंत्रिद्वय एकनाथ शिंदे, अजित पवार, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, रा. सू. गवई यांच्या अंगी विनयशिलता, नम्रता आणि शालिनता होती. त्यांनी चळवळ जीवंत ठेवण्याचे काम केले. उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, येत्या कालावधीत रा. सू. गवई यांचे जन्मशताब्दी वर्ष येणार आहे. यानिमित्ताने विविध उपक्रम राबविण्यात यावे. आमदार, खासदार, राज्यपाल म्हणून त्यांची राजकीय वाटचाल दीर्घकाळ राहिली. उत्कृष्ट वक्तृवाने नेतृत्व आणि कर्तृत्व घडविले असल्याचे पवार म्हणाले. स्मारकाच्या कामात योगदान देणाऱ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. स्मारकाच्या दर्शनी भागावरील दादासाहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांनी स्मारकाची पाहणी केली. कार्यक्रमात दादासाहेब गवई यांच्या जीवनावरील चित्रफित दाखविण्यात आली. क्षिप्रा मानकर यांनी सूत्रसंचालन केले. ◂(तभा वृत्तसेवा)



रा. सू. गवईंच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या अनावरण प्रसंगी उपस्थित सरन्यायाधीश. गवई, मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्रिद्वय एकनाथ शिंदे, अजित पवार व अन्य

### स्मारक विद्यार्थांसाठी उपयुक्त ठरेल : न्या. गवई

न्या. गवई म्हणाले, रा. सू. गवई यांचे स्मारक पूर्ण होणे ही एक स्वप्नपूर्ती आहे. स्मारकाची पायाभरणी ते उद्घाटन ही कामे गतीने करण्यात आली आहे. या वास्तूचा लाभ नागरिकांना होणार आहे. विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरेल, हा दृष्टिकोन ठेवून स्मारक उभारण्यात आले आहे. स्मारकात जीवनपट दर्शविताना कल्पकता ठेवली आहे. त्यामुळे स्मारक सर्वांग सुंदर झाले आहे. सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवून न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. नुकताच झुडपी जंगलाचा प्रश्न सोडविण्यात आल आहे.

# दुचाकींच्या धडकेत राठोड दाम्पत्यासह तिघे ठार

◆ **मानोरा, ३० ऑक्टोबर**

तालुक्यातील गिर्डा गावचे निवासी आणि रोजगारानिमित्त मुंबईला वास्तव्याला असलेले राठोड दाम्पत्य दिवाळी सण आटोपून दुचाकीने मुंबईकडे जात असताना वाशीम-मालेगाव रस्त्यावर समोरून आलेल्या दुचाकीसोबत झालेल्या धडकेत ठार झाले. दुसऱ्या दुचाकीवरील युवकही ठार झाला. राठोड दाम्पत्याच्या अपघाती मृत्युमुळे गावात शोककळा पसरली आहे.




मृत सदाशिव राठोड, सरला राठोड

सदाशिव रामदास राठोड, त्यांची पत्नी सरला दिवाळी सणानिमित्त आपले गाव गिर्डा येथे मागील आठवड्यात आले होते. सदाशिव राठोड हे मुंबईत वाहन चालक म्हणून काम करीत असल्याने त्यांचे कुटुंबीय मागील अनेक वर्षांपासून मुंबईलाच राहायला होते. दिवाळीनिमित्त गावाकडे येताना रेल्वे आणि राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसचे तिकीट मिळणे अवघड असल्याने व खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या गाड्यांचे तिकीट दर परवडणारे नसल्याने हे दाम्पत्य आपल्या दुचाकीने गावाकडे आले होते. दिवाळी आटोपून दुचाकीने मुंबईकडचा परतीचा प्रवास करताना गुरुवारी शेलूबाजार-मालेगाव मार्गावरील जऊळका रेल्वे गावाजवळ चुकीच्या मार्गाने दुचाकी घेऊन आलेल्या कृष्णा भोकरेसोबत समोरासमोर भीषण धडक झाल्याने हे दाम्पत्य जागीच ठार झाले, ष्णा भोकरे हा दुचाकी स्वारसुद्धा उपचारादरम्यान मरण पावल्याने अपघातातील मृतांची संख्या तीन झाली असून, भोकरे याच्या दुचाकीवर मागे बसलेला इसम गंभीर जखमी झाला. ◂(तभा वृत्तसेवा)

# रेल्वे पुलावरून क्रेन कोसळली, दोघांचा जागीच मृत्यू

**धार** : मध्य प्रदेशातील धार जिल्ह्यातील पिथमपूर औद्योगिक क्षेत्रात गुरुवारी पिथमपूर सेक्टर ३ मधील बांधकामाधीन सागौर रेल्वे पुलावर काम करणारी क्रेन अचानक कोसळली. क्रेनने टाटा मॅजिक आणि पिकअप ट्रक पूर्णपणे दबला, त्यात दोन जणांचा मृत्यू झाला, तर चार जण गंभीर जखमी आहे. गुरुवारी सकाळी ९.३० च्या सुमारास, पिथमपूर सेक्टर ३ मधील बांधकामाधीन सागौर रेल्वे पुलाच्या दोन्ही टोकांवरून दोन क्रेन गर्डर उचलत होते. सागौर बाजूने एक क्रेन अचानक खाली पडली आणि ती जाणाऱ्या टाटा मॅजिक आणि पिकअप ट्रकवर आदळली. माहिती मिळताच जिल्हा प्रशासन आणि पोलिस अधिकारी घटनास्थळी पोहोचले. ट्रकमध्ये अडकलेल्या नागरिकांना रुग्णालयात पोहोचविले असता, डॉक्टरांनी दोघांना मृच घोषित केले, तर चार जणांवर उपचार सुरू आहे.

### १७ अल्पवयीन मुलांसह १९ जणांना ठेवले ओलीस

(पान १ वरून) ▸


मी रोहित आर्या आहे. मी आत्महत्या करण्याऐवजी काही मुलांना बंधक बनवले आहे. माझ्या फार मोठ्या मागण्या नाहीत. माझे काही प्रश्न आहेत. मला काही लोकांकडून उत्तरे हवी आहेत. मी कोणताही दहशतवादी नाही. माझी पैशांची मागणी नाही. मी एका नियोजनानुसार मुलांना बंधक बनवले आहे, असे धमकावले.

**'ए थर्सडे' चित्रपटाची पुनरावृत्ती**

२०२२ मध्ये अभिनेत्री यामी गौतमचा 'ए थर्सडे' नावाचा एक चित्रपट प्रदर्शित झाला होता. यावेळी यामी गौतमसोबतच मराठी अभिनेते अतुल कुलकर्णी, नेहा धुपिया आणि डिम्पल कपाडियासारखे दिग्गज कलाकार यात होते.

या चित्रपटाचे कथानक हे आजच्या घटनेशी मिळतेजुळते आहे. चित्रपटात एक नैना जयस्वाल (यामी गौतम) कुलाबासारख्या भागात काही लहान मुलांना आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी ओलीस ठेवते. ते का घडतं? कसं घडतं? तिच्या मागण्या काय असतात? ते पाहून हे खूप रंजक वाटले होते. पण, असाच प्रकार मुंबईतील पवईमध्ये गुरुवारी घडला आणि याचा थरार मुंबईकरांनी प्रत्यक्ष अनुभवला. ◂(तभा वृत्तसेवा)

# गोर बंजारा समाजाचा समृद्धी महामार्गावर भोग लावून रास्ता रोको



### एसटी आरक्षणाची मागणी

◆ **वाशीम, ३० ऑक्टोबर**

गोर बंजारा समाजाला एसटी दर्जाचे आरक्षण मिळावे, हैदराबाद गॅझेट लागू करून सेवा सवलती उपलब्ध करून देण्यात याव्या, या मागणीसाठी गोर बंजारा महाराष्ट्रभरातून समृद्धी महामार्गावर उतरून सद्‌गुरू सेवालाल अन याडी मरियामाला भोग लावून बंजारा आरक्षण कृती समितीच्या वतीने गुरुवारी मालेगाव पाईंटजवळ रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात वाशीम जिल्ह्यासह अकोला, बुलढाणा, यवतमाळ, हिंगोली जिल्ह्यातील पाच हजारांवर आंदोलकांनी भाग घेतला होता.

पोहरागडचे महंत कबीरदास महाराज यांनी विंती आरदास बोलून संदेश चव्हाण, महंत संजय महाराज, जानू महाराज, प्रा. अनिल राठोडसह हजारो गोर बंजारा आंदोलकांनी यात सहभाग घेतला. सुरुवातीला पोलिस प्रशासनाने संदेश चव्हाण यांना वारंगी फाट्यावर दोन तास अडवून ठेवले.

हैदराबाद-अकोला महामार्गावर थांबलेले आंदोलक काही वेळातच समृद्धी महामार्गावर एकवटले व एक तास ठिय्या मांडून आंदोलन केले. यावेळी समृद्धी महामार्गावर पोहरागडचे महंत कबीरदास महाराज यांनी संबोधित केले.

नंतर नामा बंजारा, राजू रत्ने, अनिल चव्हाण, कांतीलाल नायक प्रा डॉ अनिल राठोड, प्रा संदेश चव्हाण यांनी संबोधित केले.

संदेश चव्हाण यांनी, प्रशासनाने गोर बंजारा समाजाच्या सहनशिलतेचा अंत पाहू नये, महिनाभरात ५५ महामोर्चे काढून शासन दखल घेत नाही म्हणून आम्हाला समृद्धी महामार्ग बंद पाडावा लागले. भविष्यात गोर बंजारा समाजाच्या एसटी आरक्षणासाठी केंद्राकडे शिफारस न केल्यास रेल रोको, पोहरागड येथे साखळी उपोषण करू आणि हिवाळी अधिवेशनात नागपूरला लाखो गोरबंजारा उतरवू, असा इशारा दिला. ◂(तभा वृत्तसेवा)

# सुबहान खानने घेतले कठोर कलारीपयट्टूचे प्रशिक्षण

◆ **मुंबई, ३० ऑक्टोबर**

दैवी बंधुत्वाची कथा जिवंत करणारी 'गाथा शिव परिवार की गणेश कार्तिकेय' ही मालिका आपल्या भावपूर्ण कथनशैली, भव्य पौराणिक सादरीकरण आणि प्रभावी अभिनयामुळे प्रेक्षकांची मने जिंकत आहे.या मालिकेत भगवान कार्तिकेयाची भूमिका साकारणारा अभिनेता सुबहान खान याने कार्तिकेयाच्या पात्राला न्याय देण्यासाठी गरजेची असलेली शारीरिक ताकद आणि योद्ध्याचे मनोबल दाखवण्यासाठी भारतातील सर्वात प्राचीन मार्शल आर्ट्सपैकी एक असलेल्या कलारीपयट्टूचे तीन महिन्यांचे कठोर प्रशिक्षण घेतले.



सुबहानसाठी ही भूमिका साकारणे म्हणजे फक्त एका दैवी व्यक्तिमत्त्वाचे रूप धारण करणे नव्हते, तर शरीर आणि मन या दोन्ही स्तरांवर संपूर्ण परिवर्तनाची प्रक्रिया होती. भगवान कार्तिकेयांच्या पराक्रम आणि सौंदर्याचे वास्तव दर्शन घडवण्यासाठी सुबहान यांनी प्रसिद्ध मार्शल आर्ट्स गुरू दीपक दास यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेतले. दीपक दास यांनी यापूर्वी टायगर श्रॉफ आणि क्रिती सेनन यांसारख्या बॉलिवूड कलाकारांनाही प्रशिक्षण दिले आहे. सुबहानचा प्रवास कॅमेऱ्यांपासून दूर अशा मास्टर दीपक दास यांच्या प्रशिक्षण केंद्रातील चटईवर सुरू झाला. यातील प्रत्येक हालचाल - ज्यात झपाट्याने मारलेली किक असो वा नाजूक, पण प्रभावी आसन - या सर्वांतून संतुलन, नियंत्रण आणि एकाग्रतेचे धडे त्यांना मिळाले. दक्षिण भारतीय परंपरेशी खोलवर जोडलेल्या या प्राचीन कलारीपयट्टू मार्शल आर्टद्वारे सुबहान यांनी केवळ आपली चपळता आणि शक्ती वाढवली नाही, तर दैवी योद्ध्याचे प्रतीक असलेली शिस्त आणि मानसिक शांतताही आत्मसात केली. ◂(वृत्तसंस्था)

# मैदानावर अपयशी ठरल्याने तेजस्वी झाले क्रिकेटपटू

**श्यामकांत जहागीरदार**

◆ **नवी दिल्ली, ३० ऑक्टोबर**

बिहारमध्ये महाआघाडीने राजदचे नेते आणि माजी उपमुख्यमंत्री तसेच विद्यमान विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर केले आहे. लालूप्रसादांना यादवांना मोठा तेजप्रताप आणि लहान तेजस्वी अशी दोन मुलं. तेजस्वी यादवला आपला राजकीय उत्तराधिकारी करण्याची लालूप्रसादांची इच्छा होती, त्यातून त्यांच्या घरात वादही झाले, तेजप्रताप दुखावला गेला. पण लालूप्रसाद आपल्या भूमिकेवर ठाम राहिले आणि तेजस्वीला त्यांनी आपला राजकीय वारस म्हणून प्रस्थापित केले. क्रिकेटच्या मैदानावर अपयशी ठरल्यामुळे तंजस्वी यादव यांना राजकारणात यावे लागेल.




शालेय जीवनापासूनच तेजस्वी यादव यांना क्रिकेटची आवड होती. शाळेच्या क्रिकेट संघाचे ते कर्णधार होते. अष्टपैलू खेळाडू म्हणून त्यांची ख्याती होती. दिल्लीच्या १५ वर्षाखालील क्रिकेट संघात तेजस्वी यादवचा समावेश झाला. विराट कोहली या त्यावेळी संघाचा कर्णधार होता. या संघाने १५ वर्षाखालील खेळाडूंचा राष्ट्रीय स्तरावरील अंतिम सामना जिंकला. या सामन्यात तेजस्वी यादवने ईशांत शर्मासोबत चांगली भागिदारी केली होती.



अंडर १७ आणि अंडर १९ क्रिकेट संघातही त्यांचा समावेश झाला. १९ वर्षाखालील राष्ट्रीय क्रिकेट संघात तेजस्वी यादवचा राखीव खेळाडू म्हणून समावेश करण्यात आला.

तेजस्वी रणजी चषक स्पर्धा खेळले आहेत. मुश्ताक अली आणि विजय हजारे चषकात ते झारखंडतर्फे खेळले होते. २००८ ते २०१२ या काळात तेजस्वी यादव आयपीएलमध्ये दिल्ली डेयरडेव्हील संघाचा भाग होते. पण दिल्ली डेयरडेव्हीलतर्फे या चार वर्षात ते एकही सामना खेळू शकले नाहीत. मैदानावर खेळत असलेल्या खेळाडूंना पाणी पाजणे, एवढेच काम दिल्ली संघाचा खेळाडू म्हणून तेजस्वी यादवला करावे लागले, असे लालूप्रसाद यादवांनी याबाबत एकदा सांगितले होते.

क्रिकेटपटू म्हणून तेजस्वी यांना आपले करीअर बनवायचे होते, पण त्यात ते अपयशी ठरले. त्यामुळे त्यांना राजकारणात यावे लागले.

### दोन बहिणी डॉक्टर पण तेजस्वी केवळ नववी

तेजस्वी यादव सात बहिणी आणि दोन भावात सर्वात लहान. त्यांच्या दोन मोठ्या बहिणी डॉक्टर आणि एक इंजिनीयर असताना तेजस्वी यादव शिक्षणातही फारसे चमकू शकले नाहीत. नववीनंतर त्यांनी शाळा सोडून दिली. शिक्षण आणि क्रिकेटमध्ये चमकू न शकलेले तेजस्वी यादव राजकारणात मात्र बऱ्यापैकी यशस्वी झाले. बिहारचे उपमुख्यमंत्रिपद त्यांनी दोनदा भूषवले. यावेळी तिसऱ्यांदा तेजस्वी यादव राघोपूरमधून विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात आहे. २०१५ मध्ये पहिल्यांदा त्यांनी या मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. २०२० मध्ये दुसऱ्यांदा ते राघोपूरमधून विजयी झाले.

# लालूप्रसाद, राबडीदेवीही लढले होते राघोपूरमधून निवडणूक

◆ **नवी दिल्ली, ३० ऑक्टोबर**

राघोपूरमधून लालूप्रसाद यादव आणि राबडीदेवी यांनीही निवडणूक लढवली आहे. या मतदारसंघातून लालूप्रसाद दोनवेळा तर राबडी देवी तीन वेळा निवडणूक जिंकले. पहिल्यांदाच राघोपूर विधानसभा मतदारसंघातून निवडून आले असताना नितीशकुमार यांच्या नेतृत्वातील महाआघाडीच्या सरकारमध्ये तेजस्वी यादव वयाच्या २६ व्या उपमुख्यमंत्री झाले.

१९ ऑगस्ट २०२४ ला दुसऱ्यांदा ते नितीशकुमार यांच्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्री झाले. २०२४ पर्यंत म्हणजे नितीशकुमार महाआघाडी सरकारचा राजीनामा देईपर्यंत ते उपमुख्यमंत्री होते. देशातील सर्वात कमी वयाचा उपमुख्यमंत्री आणि विरोधी पक्षनेता म्हणून तेजस्वी यादव यांच्या नावाची नोंद झाली. विशेष म्हणजे २०२० च्या विधानसभा निवडणुकीतही महाआघाडीने तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार म्हणून समोर केले होते. या निवडणुकीत भाजपाच्या नेतृत्वातील रालोआने १२५ तर तेजस्वी यादव यांच्या नेतृत्वातील महाआघाडीने ११० जागा जिंकल्या. महाआघाडीला बहुमतासाठी १२ जागा कमी पडल्या, तर रालोआला विधानसभेत काठावरचे बहुमत मिळाले.

तेजस्वी यादव यांच्यावरही भ्रष्टाचाराचे तसेच हत्येच्या प्रकरणात सहभागी असल्याचे अनेक आरोप झाले. आयआरसीटीसी घोटाळ्यात लालूप्रसाद आणि राबडीदेवी यांच्यासोबत आरोप निश्चित करण्यात आले आहेत. जमिनीच्या बदल्यात नोकरी प्रकरणातही त्यांच्यावर आरोपपत्र निश्चित होण्याची टांगती तलवार आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

# सर्वांत भ्रष्ट कुटुंबातील दोन युवराज मला शिव्या देताहेत

## मोदींचा हल्लाबोल ● दोघेही हजारो कोटींच्या घोटाळ्यात जामिनावर

◆ **मुजफ्फरपूर, ३० ऑक्टोबर**

एक देशातील सर्वांत भ्रष्ट घराण्याचा युवराज आहे, तर दुसरा बिहारमधील सर्वात भ्रष्टाचारी घराण्याशी संबंधित आहे. या दोघांनी मिळून आता खोट्या आश्वासनांचे दुकान सुरू केले आहे. हे दोघेही मला भर-भरून शिव्या देत आहेत. मात्र, बिहारची जनता यांच्या जाळ्यात अडकणार नाही. बिहारने विकासाची गती पकडली आहे, अशा शब्दांत गुरुवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी आणि राजदचे तेजस्वी यादव यांच्यावर थेट हल्ला चढवला. ते बिहार विधानसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर मुजफ्फरपूर येथील मोतीपूर साखर कारखान्याच्या मैदानावर आयोजित सभेत बोलत होते.



मोदी पुढे म्हणाले, दोन्ही 'युवराज' हजारो कोटींच्या भ्रष्टाचार प्रकरणांत जामिनावर आहेत आणि जामिनावर असलेल्यांचा सन्मान होत नसतो. हे नामदार लोक कामगारांना शिव्या देऊनच दिवसाची सुरुवात करतात. मागास आणि दलित समाजाचा अपमान करणे हा ते त्यांचा जन्मसिद्ध अधिकार समजतात. एका चहावाला इथवर पोहोचला, हे त्यांना अजूनही पचत नाही.

पंतप्रधान म्हणाले, राजद आणि काँग्रेसचा संबंध तेल आणि पाण्यासारखा आहे. यांचे कदीच पटू शकत नाही.

बाहेरून एक दिसतात. पण आतून वेगवेगळे आहेत. त्यांचा हेतू केवळ सत्तेवर कब्जा करणे एवढाच आहे. एवढ्या एका लालसेपोटीच ते सोबत आहेत. जेणेकरून पुन्हा बिहार लुटता यावा.

यावेळी मोदींनी लालू प्रसाद यादवांवरही निशाणा साधला. ज्या बाबासाहेब आंबेडकरांना संपूर्ण देश पूजतो, त्यांचा हे लोक अपमान करतात. बिहारमध्ये एनडीएला सर्वात मोठा विजय मिळणार असून राजद-काँग्रेस आघाडीला इतिहासातील सर्वात मोठा पराभव होईल. बिहारचे मतदार ६ नोव्हेंबरला मतदानाद्वारे या दोन्ही पक्षांना त्यांची जागा दाखवतील, असा विश्वासही मोदींनी व्यक्त केला. (वृत्तसंस्था)

### छट महापर्वाला युनेस्कोचा टॅग मिळवण्यासाठी केंद्राचे प्रयत्न

आमचे सरकार छटपूजा उत्सवाला युनेस्कोचा टॅग मिळवण्याचा प्रयत्न करत आहे. पण जेव्हा तुमचा हा मुलगा छटपूजेला जगभरात प्रसिद्ध करण्यासाठी प्रयत्नशील असताना काँग्रेस आणि राजदचे नेते मात्र छटमातेचा अवमान करत आहेत. मला सांगा, कुणी मतांसाठी छटमातेचा अपमान करू शकतं का? बिहार आणि भारत हे सहन करेल का? छटपूजेच्या दिवशी उपवास करणाऱ्या माता हे सहन करतील का? राजद आणि काँग्रेस किती निर्लज्ज आहेत. त्यांच्यासाठी ही पूजा म्हणजे ड्रामा आणि नौटंकी आहे. तुम्ही अशा लोकांना शिक्षा करणार की नाही, असे पंतप्रधान मोदी म्हणाले. ■

# चीनवरील शुल्क १० टक्क्यांनी घटविले

## जिनपिंग यांच्या भेटीनंतर ट्रम्प यांची घोषणा, दुर्मिळ खनिजांचा पुरवठा सुरळीत करण्यावर सहमती

### अमेरिकेकडून खरेदी करणार सोयाबीन

◆ **सेऊल, ३० ऑक्टोबर**

गेल्या काही महिन्यांपासून अमेरिका आणि चीन यांच्यात टॅरिफ वॉर सुरू आहे. दोन्ही देशांमधील व्यापारी संबंध ताणले गेलेले असताना अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गुरुवारी दक्षिण कोरियाच्या बुसान शहरात चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांची भेट घेतली. दोन्ही नेत्यांनी व्यापार, सुरक्षेसह विविध मुद्यावर चर्चा केली, त्यानंतर ट्रम्प यांनी चीनवरील १० टक्के शुल्क कमी करण्याची घोषणा केली.

चीनने अमेरिकेला दुर्मिळ खनिजांचा पुरवठा सुरळीत करण्यावर सहमती दर्शवली, तसेच अमेरिकेकडून सोयाबीन खरेदी करण्यासाठी करार होणार असल्याची माहिती ट्रम्प यानी दिली. अमेरिकेच्या निर्णयामुळे चीनवरील व्यापारी शुल्क ५७ टक्क्यांवरून ४७ टक्क्यांवर खाली आले आहेत. शी यांच्याशी झालेल्या भेटीनंतर ट्रम्प पत्रपरिषदेत सांगितले की, चीनवरील कमी केलेले शुल्क हे तत्काळ प्रभावाने लागू झाले आहेत. जिनपिंग यांनी अमेरिकेला दुर्मिळ खनिजांचा पुरवठा करण्यासंदर्भात करार केला आहे. अमेरिका आणि चीनमधील सर्व वाद मिटले आहेत. त्यामुळे चीनसोबतचा करार आणखी एक वर्षासाठी वाढवता येईल आणि हे संपूर्ण जगासाठी फायदेशीर ठरेल. चीनने अमेरिकेकडून मोठ्या प्रमाणात सोयाबीन खरेदी करण्याचे आश्वासन दिले आहे आणि माझी जिनपिंग यांच्यासोबत रशिया-युक्रेन संघर्ष सोडवण्यासाठी सहकार्यावरही चर्चा झाली. तैवानचा मुद्यावर यावेळी कोणतीही चर्चा झालेली नाही. ट्रम्प पुढे म्हणाले, की ते एप्रिलमध्ये चीनला भेट देणार आहेत. (वृत्तसंस्था)



### वाटाघाटी करण्यात जिनपिंग यांचा हातखंडा

ट्रम्प म्हणाले, आमची बैठक यशस्वी झाली, जिनपिंग यांचा वाटाघाटी करण्यात हातखंडा आहे. आमचे नेहमीच खूप चांगले संबंध राहिले आहे. दीड तासांच्या चर्चेत आम्ही आधीच अनेक गोष्टींवर सहमत झालो. मला विश्वास आहे की आमचे संबंध दीर्घकाळासाठी राहतील. वेगवेगळ्या राष्ट्रीय परिस्थितीमुळे, आम्ही नेहमीच एकमेकांशी सहमत नसतो आणि जगातील दोन प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये वेळोवेळी मतभेद असणे सामान्य आहे. ■

### मैत्री विकासासाठी गरजेची : जिनपिंग

संयुक्त पत्रपरिषदेत बोलताना जिनपिंग म्हणाले, चीनचा विकास अमेरिकेला पुन्हा महान बनवण्याच्या तुमच्या दृष्टिकोनाशी जुळवून घेत आहे. दोन्ही देश एकमेकांना यशस्वी आणि समृद्ध करण्यास पूर्णपणे सक्षम आहेत. चीन आणि अमेरिका भागीदार आणि मित्र असले पाहिजेत. चीन-अमेरिका संबंधांसाठी एक मजबूत पाया रचण्यासाठी आणि दोन्ही देशांच्या विकासासाठी वातावरण निर्माण करण्यासाठी मी तुमच्यासोबत काम करण्यास तयार आहे. ■

# सरदार पटेल यांना भारतरत्न देण्यास काँग्रेसमुळेच उशीर

### गृहमंत्री अमित शाह यांचा आरोप

◆ **पाटणा, ३० ऑक्टोबर**

सरदार पटेलांमुळेच आज भारत एकसंध झाला. आजच्या भारताच्या निर्मितीत त्यांनी मोठे योगदान दिले, मात्र काँग्रेसने त्यांना भारतरत्न देण्यास ४१ वर्षे लावली. देशाच्या उभारणीत त्यांच्या योगदानाचा काँग्रेसला विसर पडल्याची टीका केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी गुरुवारी केली.

भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त गृहमंत्री शाह यांनी पाटणा येथे गुरुवारी पत्रकार परिषद घेतली. यावेळी ते म्हणाले, ३१ ऑक्टोबर हा भारताचे लोहपुरुष सरदार पटेल यांची १५० वी जयंती आहे. २०१४ पासून, पंतप्रधान मोदी दरवर्षी ३१ ऑक्टोबर रोजी सरदार पटेल यांच्या जयंतीनिमित्त केवरिया कॉलनीला भेट देतात. सरदार पटेल यांच्या पुतळ्यासमोर भव्य परेड आयोजित केली जाते. गृह मंत्रालयाने दरवर्षी ३१ ऑक्टोबर रोजी भव्य परेड आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. ही परेड देशाची एकता आणि अखंडता सुनिश्चित करण्यासाठी आहे. सर्व राज्यांचे पोलिस आणि



केंद्रीय निमलष्करी दल परेडमध्ये सहभागी होणार आहे. ही परेड एकता आणि अखंडतेचा संदेश देईल. पटेल यांच्या जयंतीनिमित्त एकता नगरमध्ये भारत पर्व आयोजित केले जात आहे. ते १ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर पर्यंत चालेल. पटेलांमुळे लक्षद्वीपमध्ये तिरंगा फडकवण्यात आला. दुर्दैवाने, त्यांच्या निधनानंतर काँग्रेस पक्षाने त्यांना विसरण्यात कोणतीही कसर सोडली नाही. पटेलांसारख्या महान व्यक्तिमत्त्वालाही भारतरत्न मिळण्यास ४१ वर्षे उशीर झाला. त्यांच्यासाठी ना समाधीस्थळ बांधण्यात आले ना स्मारक बांधण्यात आले. नरेंद्र मोदी गुजरातचे मुख्यमंत्री झाल्यावर त्यांनी स्टॅच्यू ऑफ युनिटीचे बांधकाम सुरू केले, जे आता जगभरात प्रसिद्ध झाले आहे. (वृत्तसंस्था)

### देशासाठी एक विचारसरणी

शाह म्हणाले, सरदार पटेल हे केवळ एक व्यक्ती नाही तर देशासाठी एक विचारसरणी आहेत. स्वातंत्र्य चळवळीत त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. १९२८ च्या सत्याग्रहानंतर महात्मा गांधींनी त्यांना सरदार ही पदवी बहाल केली. त्यांनी भारतातील ५६२ संस्थानांना एकत्र करून भारताचे एकीकरण केले. आज भारताचा नकाशा सरदार पटेलांची देणगी आहे. त्यांनी त्या काळात उद्‌भवलेल्या प्रत्येक समस्येचे निराकरण केले. त्यांनी पाकिस्तान कॉरिडॉर प्रकल्पही हाणून पाडला. यावर्षीच्या परेडमध्ये सीआरपीएफचे पाच शौर्य चक्र विजेते आणि बीएसएफचे १६ शौर्य पदक विजेते देखील सहभागी होतील. ■

# इस्रायलच्या हल्ल्यात गाझा बेचिराख

## २४ तासात १४५ नागरिकांचा मृत्यू, दोनशेपेक्षा अधिक जखमी

◆ **रफाह, ३० ऑक्टोबर**

हमास आणि इस्रायलमध्ये झालेल्या युद्धबंदीनंतर गाझात शांतता निर्माण होईल, अशी आशा तेथील नागरिकांना होती, मात्र १७ दिवसांनंतरच इस्रायलने हमासवर युद्धबंदी करार मोडल्याचा आरोप करीत बुधवारपासून जोरदार हल्ले सुरू केले. गेल्या २४ तासात इस्रायली वायुदलाने गाझाच्या पाच शहरात केलेल्या हवाई हल्ल्यात १४५ नागरिकांचा मृत्यू झाला असून, दोनशेपेक्षा अधिक नागरिक जखमी झाले, तर त्याचवेळी चार रुग्णालयांसह अनेक निवासी इमारती जमीनदोस्त झाल्या.

हमासच्या हल्ल्यात इस्रायली सैनिकाचा मृत्यू झाल्यानंतर हमासकडून युद्धबंदी उल्लंघनाचा आरोप करीत इस्रायली पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी गाझा पट्टीवर तत्काळ आणि शक्तिशाली हल्ला करण्याचे आदेश दिले. त्यानंतर गेल्या २४ तासांत इस्रायलने गाझाच्या अनेक भागांवर जोरदार हवाई हल्ले केले, ज्यामध्ये १४५ लोकांचा मृत्यू झाला. गाझा आरोग्य विभागाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, मृतांमध्ये महिला, मुले आणि मदत कामगारांचा समावेश आहे. गाझामधील महिला बालरोगतज्ज्ञ डॉ. अला अल-नज्जर यांच्या नऊ मुली हवाई हल्ल्यात ठार झाल्या. या मुली मदत छावणीत होत्या, जिथे त्या अन्न आणि निवारा शोधण्यासाठी गेल्या होत्या, तेव्हा इस्रायली ड्रोन त्यांच्या घरावर आदळले. मी मुलांना जग वाचवण्याची शपथ दिली होती, पण जगाने त्यांना मारले अशी पोस्ट त्यांनी एक्सवर केली. दरम्यान, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्रायलची बाजू घेत धमकी दिली की, जर हमास सुधारला नाही तर ते



पृथ्वीवरून पुसून टाकले जाईल. विशेष असे की, ट्रम्प यांच्या टिप्पणीनंतर इस्रायलने आपले हल्ले तीव्र केले आहे. (वृत्तसंस्था)

# ड्रग्ज तस्करांसोबत चकमक १२२ जणांचा मृत्यू

### कारवाईविरोधात नागरिकांची निदर्शने

◆ **रिओ दि जानेरो, ३० ऑक्टोबर**

दक्षिण अमेरिकन देश असलेल्या ब्राझीलमध्ये ड्रग्ज तस्करी करणाऱ्या टोळीविरोधात कारवाई करताना पोलिस आणि सुरक्षा दलांसोबत झालेल्या चकमकीत मृतकांची संख्या १२२ वर पोहोचली आहे. यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली असून, गुरुवारी विविध भागात सरकारविरोधात मोठ्या प्रमाणात निदर्शने करण्यात आली.

आंदोलकानी आरोप केला की, पोलिसांच्या छाप्यादरम्यान रिओ दि जानेरोमध्ये हे मृत्यू झाले. पोलिसांना कारवाई करताना विशिष्ट समूहाला लक्ष्य केले. दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यासाठी रस्त्यावर मृतदेह ठेवून निषेध करणयात आला.

यात्प्रकरणाची दखल घेत ब्राझीलच्या सर्वोच्च न्यायालयाने



गव्हर्नर कॅस्ट्रो यांना या कारवाईची सविस्तर माहिती देण्यास सांगितले. सरकारच्या वतीने न्यायालयाला सांगितले की, पेन्हा आणि कॉम्प्लेक्सो दे अलेमाओ येथे सुमारे २,५०० पोलिस आणि सैनिकांनी छापे टाकले.

पोलिसांनी आणि सुरक्षा दलाने हेलिकॉप्टर, चिलखती वाहने आणि पायी चालत ही कारवाई केली. सध्या या घटनेमुळे ब्राझीलमध्ये तणावपूर्ण परिस्थिती आहे आणि शांतता राखण्यासाठी मोठ्या संख्येने पोलिस दल तैनात करण्यात आले आहे. पोलिस कारवाईत इतके लोक कसे मृत्युमुखी पडले याबद्दल सामाजिक संघटना आणि राजकीय पक्षाने आश्चर्य व्यक्त केले. (वृत्तसंस्था)

# २०४७ पर्यंत उभारणार ४०० विमानतळे : नायडू

◆ **नवी दिल्ली, ३० ऑक्टोबर**

भारताने २०४७ पर्यंत देशात ४०० विमानतळ उभे करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे, अशी माहिती केंद्रीय नागरी हवाई वाहतूकमंत्री किंजरापू राममोहन नायडू यांनी दिली. विकास आणि कनेक्टिव्हिटी वाढवण्यासोबतच उच्चतम हवाई सुरक्षा वाढविण्यावर सरकारचा भर असल्याचे त्यांनी सांगितले.



विज्ञान भवन येथे पहिल्या आशिया पॅसिफिक रिजन अपघात तपास गटाच्या बैठकीत नायडू म्हणाले, आशिया-पॅसिफिक क्षेत्रातील सदस्य राष्ट्रांच्या सहकार्यामुळे सुरक्षा देखरेख आणि अपघात प्रतिबंधाच्या बाबतीत उत्तम मानके निश्चित झाली आहेत. भारताने आंतरराष्ट्रीय नागरी हवाई वाहतूक संघटनेची मानके आणि शिफारशींच्या अंमलबजावणीमध्ये उल्लेखनीय प्रगती केली. २०१७ मध्ये ७० टक्के असलेल्या भारताच्या अनुपालन गुणांमध्ये आता ८५ टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे, ज्यामुळे जागतिक क्रमवारीत ११२ वरून ५५ व्या स्थानावर मोठी सुधारणा झाली . (वृत्तसंस्था)

# ३३ वर्षांनंतर अण्वस्त्रांची चाचणी करणार अमेरिका

## ट्रम्प म्हणाले : चाचणी रशिया आणि चीनच्या बरोबरीची असावी

◆ **वॉशिंग्टन डीसी, ३० ऑक्टोबर**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी संरक्षण विभागाला (पेंटॅगॉन) तत्काळ अण्वस्त्र चाचणी पुन्हा सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. त्यांनी म्हटले आहे की ही चाचणी चीन आणि रशियाच्या तुलनेत योग्य पातळीवर असावी. अमेरिकेने शेवटची अण्वस्त्र चाचणी १९९२ मध्ये केली होती.

ट्रम्प यांनी 'ट्रुथ सोशल' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट करत म्हटले की, इतर देशांच्या चाचण्यांच्या पृष्ठभूमीवर त्यांनी युद्ध विभागाला समानतेच्या आधारावर त्वरित अण्वस्त्रांची चाचणी सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.

ट्रम्प यांनी विशेषतः रशिया आणि चीनचे नाव घेत म्हटले की रशिया दुसऱ्या क्रमांकावर आहे आणि चीन तिसऱ्या क्रमांकावर आहे, परंतु



पुढील पाच वर्षांत ते बरोबरी करू शकतात. दक्षिण कोरियामध्ये चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्याशी झालेल्या भेटीच्या एक तासापेक्षा कमी वेळ आधी ट्रम्प यांची पोस्ट आली.

१९९६ मध्ये झालेल्या व्यापक अणुचाचणी बंदी करार अंतर्गत भूमिगत अणुचाचण्यांवर बंदी घालण्यात आली होती हे लक्षात घेण्यासारखे आहे. चीन आणि अमेरिका या दोघांनीही या करारावर स्वाक्षरी केली आहे, परंतु अद्याप त्याला औपचारिक मान्यता दिलेली नाही. (वृत्तसंस्था)

### अणुचाचण्यांची स्पर्धा लागण्याची शक्यता

संपूर्ण अण्वस्त्र चाचणीमध्ये त्याची विध्वंसक शक्ती, किरणोत्सर्गाचे परिणाम आणि तांत्रिक कार्यक्षमता मोजण्यासाठी जिवंत अणुबॉम्बचा स्फोट केला जातो. या चाचणीमध्ये अणुप्रतिक्रिया समाविष्ट असते. अशा चाचण्या सहसा जमिनीखाली किंवा हवेत केल्या जात असत. रेडिएशनच्या जोखमीमुळे यामुळे एक मोठा पर्यावरणीय आणि राजकीय प्रश्न निर्माण झाला. अमेरिकेने शेवटची २३ सप्टेंबर १९९२ रोजी नेवाडा येथे अणुचाचणी केली होती. त्याच वर्षी तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जॉर्ज एच.डब्ल्यू. बुश यांनी भूमिगत अणुचाचण्यांवर बंदी घालण्याची घोषणा केली. १९९० नंतर रशिया आणि चीननेही अशा चाचण्या थांबवल्या. आता ट्रम्प या चाचण्या पुन्हा सुरू करण्याचे आवाहन करत आहेत. ■

# चाबहार बंदर प्रकल्पासाठी अमेरिकेने सवलत वाढवली

## भारताला दिलासा, एप्रिलपर्यंत लागणार नाही निर्बंध

◆ **वॉशिंग्टन, ३० ऑक्टोबर**

अमेरिकेने इराणमधील चाबहार बंदर प्रकल्पासाठी लावलेले निर्बंध एप्रिल २०२६ पर्यंत पुढे ढकलले असून, भारतासाठी सवलत कायम ठेवण्याचा निर्णय राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी गुरुवारी घेतला. यामुळे भारताला मध्य आशिया आणि अफगाणिस्तानशी कनेक्टिव्हिटी योजना राबविण्यात महत्त्वपूर्ण दिलासा मिळाला आहे.

नवीनतम मुदतवाढीमुळे, भारत कोणत्याही तत्काळ अमेरिकन निर्बंधांच्या भीतीशिवाय बंदर चालवणे सुरू ठेवू शकेल. चाबहार बंदर इराणच्या आग्नेय किनाऱ्यावर ओमानच्या आखातावर आहे आणि इराणचे एकमेव महासागराशी जोडलेले बंदर आहे. भारत, इराण आणि अफगाणिस्तानमधील हा एक धोरणात्मक कॉरिडॉर असून, भारताला अफगाणिस्तान आणि मध्य आशियाशी जोडते. भारताने आतापर्यंत चाबहार मार्गे अफगाणिस्तानला गहू आणि युरियाचे अनेक खेप पाठवल्या आहेत.

भारत आणि इराणने मे २०२४ मध्ये १० वर्षांच्या करारावर स्वाक्षरी केली, ज्या अंतर्गत भारताने चाबहारच्या शाहिद बेहेश्ती टर्मिनलच्या विकासात १२० दशलक्ष डॉलर्सपेक्षा जास्त गुंतवणूक केली आहे. या गुंतवणुकीत आधुनिक उपकरणांचा पुरवठा, टर्मिनल अपग्रेड आणि आंतरराष्ट्रीय उत्तर-दक्षिण वाहतूक कॉरिडॉरला जोडणे यासारख्या प्रकल्पांचा समावेश आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी आशियाई देशांना हिंदी महासागराशी जोडणारा हा प्रकल्प प्रवेशद्वार आहे. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### मिथुनच्या सुनेसोबत घडले कास्टिंग काऊच



**मुंबई** : मिथुन चक्रवर्ती यांची सून मदालसा शर्मा हिने वयाच्या १६व्या वर्षी दक्षिण भारतीय इंडस्ट्रीमध्ये तिच्या अभिनय कारकिर्दीला सुरुवात केली. तथापि, ती लवकरच बॉलिवूडमध्ये दाखल झाली. अलिकडेच एका मुलाखतीत मदालसाने खुलासा केला की दक्षिण भारतीय इंडस्ट्रीमध्ये एका अस्वस्थ अनुभवामुळे तिला हा इंडस्ट्री सोडून बॉलिवूडमध्ये जावे लागले. वयाच्या १७ व्या वर्षी तिला कास्टिंग काऊच चा कटू अनुभव वाट्याला आला. यामुळे ती अत्यंत निराश झाली आणि तिने दाक्षिणात्य सिनेसृष्टी सोडण्याचा निर्णय घेतला. मदालसा शर्माने २००९ च्या तेलुगू चित्रपट फिटिंग मास्टर द्वारे तिच्या करिअरची सुरुवात केली. तिने कन्नड आणि तमिळ चित्रपटांमध्येही काम केले आहे. तिने सम्राट अँड कंपनी, दिल साला संकी, कार्तूट आणि द बंगाल फाइल्स सारख्या हिंदी चित्रपटांमध्येही काम केले आहे. तथापि, मदालसाला चित्रपटांपेक्षा अनुपमा या टीव्ही शोमुळे जास्त ओळख मिळाली. ■

### 'बॅटल ऑफ गलवान'मध्ये दिसणार अमिताभ?



**मुंबई** : सलमान खानच्या बहुप्रतिक्षित चित्रपटात अमिताभ बच्चन दिसणार असल्याच्या बातम्या येत आहेत. अलिकडेच एक फोटो समोर आला आहे ज्यामध्ये अमिताभ बच्चन 'बॅटल ऑफ गलवान' चित्रपटाच्या सेटवर चित्रपटाचे दिग्दर्शक अपूर्व लाखिया यांच्यासोबत दिसत आहेत. दिग्दर्शक अपूर्व लाखिया यांनी अलीकडेच त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया अकाउंटवर अमिताभ बच्चन यांच्यासोबतचा एक फोटो शेअर केला आणि लिहिले, अंदाज लावा ते मला काय म्हणत आहे. हा फोटो समोर आल्यानंतर, अमिताभ बच्चन या चित्रपटात सामील झाल्याची चर्चा होऊ लागली. तथापि, अद्याप कोणतेही अधिकृत विधान करण्यात आलेले नाही. जर असे झाले तर हा अमिताभ बच्चन आणि सलमान यांचा एकत्रित चौथा चित्रपट असेल. दोघांनी बाबुल, बागबान आणि गॉड तुस्सी ग्रेट होसारख्या चित्रपटांमध्ये एकत्र काम केले आहे. शिवाय, हॅलो ब्रदर चित्रपटात अमिताभ बच्चन यांनी आवाजाची भूमिका देखील बजावली होती. ■

### शुभमनसोबत नाव जोडल्याने रिद्धिमा अस्वस्थ



**मुंबई** : क्रिकेटपटू शुभमन गिलसोबत आजवर अनेकजणींचे नाव जोडले गेले. त्यातील अभिनेत्री रिद्धिमा पंडित हिने यावर मौन सोडले आहे. रिद्धिमा म्हणाली, कोणीतरी एक क्रिकेटपटू आहे. त्याच्यासोबत मी समोरासमोर कधी बोलली नाही, आमची ओळखही नाही. तरीदेखील माझे नाव त्याच्यासोबत जोडले गेले. ही बाब अतिशय अस्वस्थ करणारी आहे. विशेष म्हणजे, हे सगळे मीच घडवून आणल्याचे भासवले जात आहे. जेव्हा कलाकार आणि क्रिकेटपटूंचे नाव जोडले जाते तेव्हा लोकांना कलाकारच दोषी वाटतात. क्रिकेटपटूंकडे त्यांची सहानुभूती असते. हा सगळा प्रकार अतिशय व्यथित करणारा आहे. ■

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# स्वत:ची(च) काळजी वाहणारी नोकरशाही

भारतात सर्वांत सुरक्षित, सर्वाधिक लाभ मिळविणारा आणि सर्वांत कमी जबाबदारी पाळणारा कोणता वर्ग असेल, तर तो आहे सरकारी कर्मचारी! याला अगदी थोडे लोक अपवाद. एरवी भरपूर सुट्या, उत्तम वेतन, कामाचे निश्चित तास, आरोग्यासह विविध प्रकारच्या सोयीसुविधा आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे नियत वेळी वेतनवाढ मिळणारा हा एकमेव वर्ग. देशभरात केंद्र आणि राज्य सरकारच्या कर्मचाऱ्यांची संख्या फार मोठी आहे. केंद्र सरकारचे कर्मचारी ३५ लाखांवर, तर सर्व राज्य सरकारांचे कर्मचारी पावणे दोन कोटींच्या वर. महाराष्ट्रात राज्य सरकारी कर्मचाऱ्यांची संख्या आहे पावणे पाच लाखांच्या आसपास. सरकार आणि प्रशासन सुरू आहे, याचा अर्थ सरकारी कर्मचारी काम करीत आहेत, असा घेतला जाऊ शकतो. वास्तवात, उच्चपदस्थ कर्मचारी सोडले, तर बहुतांशी कर्मचाऱ्यांना कशासाठीही जबाबदार धरले जात नाही. त्यांच्या कामाचा हिशेब घेण्याची पद्धत नाही. त्यांच्या सुट्या ठरलेल्या, वेतन ठरलेले आणि सन्माननीय अपवाद वगळता बहुतेकांची उदासिनताही ठरलेली. अशा वर्गाकडे सरकारी कमाईचा अर्थात करदात्यांच्या खिशातून येणाऱ्या पैशाचा मोठा वाटा वेतनवाढीच्या स्वरुपात दिला जातो. सरकारी भाषेत याला 'कमिटेड एक्सपेंडिचर' अर्थात् अपरिहार्य असे खर्च म्हणतात. वेतन, पेन्शन आणि कर्जावरील व्याज हा अपरिहार्य खर्च एवढा मोठा असतो, की विकास प्रक्रियेसाठी फारसा पैसा ऊरत नाही. केंद्र सरकारने आठव्या वेतन आयोगाचे सूतोवाच केले आहे. हा आयोग आधी केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांना व नंतर राज्याच्या कर्मचाऱ्यांना लागू होणार आहे. आतापर्यंतच्या सर्व आयोगांचे कामकाज पाहिले, तर त्यात एक साम्य दिसते आणि ते म्हणजे पगारवाढ हा कर्मचाऱ्यांचा अधिकार असल्याचे तत्त्व मान्य करणे. वाढत्या महागाईसोबत पगारवाढ व्हायलाच हवी, यात वाद नाही. पण, ती किती, कशी व कोणत्या मुद्यावर करायची, हे आता तरी ठरले पाहिजे. वर्तमानात खाजगी क्षेत्रात वरिष्ठ व्यवस्थापकीय पदांवर काम करणाऱ्यांचे वेतन देखील केंद्र सरकारातील चपराशांच्या वेतनापेक्षा कमी आहे, हे विसंगतीचे एक साधे उदाहरण. १२ महिने राबणाऱ्या शेतकऱ्याला सरकारमधील बाबूपेक्षा कमी उत्पन्न मिळते, हे दुसरे उदाहरण. अशी उदाहरणे असंख्य देता येतील. आठव्या वेतन आयोगानंतर केंद्र सरकारचा वेतन व पेन्शन खर्च दीड पटीहून अधिक वाढणार आहे. स्वाभाविकच राज्य सरकारांना हा खर्च काही ना काही करून करावाच लागेल. महाराष्ट्र, तामिळनाडू, केरळ, पश्चिम बंगाल यासारख्या राज्यांमध्ये ७५ टक्के महसूल हा पगार, पेन्शन व व्याजावर खर्च होतो. विकासासाठी उरतात फक्त १५ ते २० टक्के. त्यातून सिंचन प्रकल्प करायचे, शाळा दुरुस्त करायच्या, मास्तर नेमायचे की दवाखाने अपग्रेड करायचे की पाणीपुरवठ्याच्या योजना करायच्या?

एका सर्वेक्षणानुसार, खाजगी क्षेत्रातील सरासरी मासिक उत्पन्न २७,००० ते ३५,००० रुपये आहे, तर केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांचा सरासरी पगार ८५,००० रुपये आहे. उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचा पगार २ ते २.५ लाख रुपये मासिक आहे. अगदी चपराशापासून सुरुवात केली तरी त्याला महिन्याकाठी ३० ते ४० हजार रुपये सहज मिळतात. हा साराच अनुत्पादक खर्च आहे, असे सरसकट म्हणणे योग्य नाही. परंतु, सरकारी कर्मचारी खरोखर किती काम करतात, हा प्रश्न विचारणे गैर नाही. उत्पादनक्षमता, जबाबदारी, कार्यप्रदर्शन यांच्या कसोट्यांवर त्यांचे योगदान किती, या प्रश्नाचे साधे उत्तर 'अत्यल्प' असे आहे. खाजगी क्षेत्रात एखादी चूक झाल्यास थेट नोकरी जाते. सरकारी क्षेत्रात मात्र काम येत नाही किंवा काम करीत नाही, या मुद्यावर कुणाचीच नोकरी जात नाही. सरकारी कार्यालयातली फाईल वजन ठेवल्याखेरीज हलत नाही, तरीही सरकारी कर्मचाऱ्यांना लाडावले जाते. कारण हे कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबीय मिळून एक प्रचंड मतदारसंख्या तयार होते. त्यामुळे कोणतेही सरकार त्यांना नाराज करायचे धाडस करीत नाही. व्यवस्थित वेतन सरकारी कर्मचाऱ्यांना, महागाई भत्ता सरकारी कर्मचाऱ्यांना, पेन्शन सरकारी कर्मचाऱ्यांना. जणू, इतरांना महागाईची झळ बसत नाही आणि इतर कुणाला पेन्शनची गरजच नसते. महागाई भत्ता हे तर 'स्वयंचलित वेतनवाढ यंत्र' आहे. कार्यक्षमता आणि उत्पादन वाढो अथवा घटो, करसंकलन कमी पडो, तरी तो आपोआप वाढत असतो. सरकारी कर्मचाऱ्यांचा वर्ग आता केवळ आर्थिक नव्हे, तर सामाजिकदृष्ट्याही स्वतंत्र 'क्लास' बनला आहे. त्यांना शासकीय क्वार्टर्स, आरोग्य विमा, प्रवास भत्ता, निवृत्तीनंतर पेन्शन असे सर्व काही मिळते. करदाते हा खर्च सोसत राहतात. काही वेळा असेही म्हटले जाते की, नागरिकांना चांगली सेवा मिळावी, लाचखोरी कमी व्हावी आणि कार्यक्षमता वाढावी म्हणून वेतनवाढ दिली जाते. यातले काहीही आतापर्यंतच्या वेतनवाढीतून साध्य झालेले नाही. लाचखोरी सतत वाढते आहे आणि कार्यक्षमतेत वाढ होताना दिसत नाही. यामुळे देशात नवी विषमता तयार झाली आहे. ती अशी की, एक वर्ग सतत कर देतो आणि दुसरा त्या करावर सतत जगत असतो. ही विषमता नैतिकदृष्ट्या अत्यंत धोकादायक आहे. ती परिश्रमाचे मूल्य कमी करणारी आहे. ही व्यवस्था एकप्रकारे जनतेच्या परिश्रमाचा उपभोग घेण्याचा अधिकार सरकारी कर्मचाऱ्यांना देणारी आहे. सरकारी कर्मचाऱ्यांचे वेतन आणि पेन्शन यामुळे सरकारची आर्थिक शिस्त बिघडत असल्याचा इशारा अनेक अर्थतज्ज्ञांनी यापूर्वी दिला आहे. काही अर्थतज्ज्ञ असे म्हणतात की, वेतनवाढीचे हे चक्र असेच सुरू राहिले, तर केंद्र व राज्यांचा एकत्रित वेतन खर्च सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या १२ टक्क्यांहून अधिक होईल. म्हणजे शिक्षण, आरोग्यासारख्या मूलभूत व्यवस्था राहिल्या बाजूला. असेच होत राहिले तर सरकार किंवा प्रशासन म्हणजे सरकारी कर्मचाऱ्यांनी, सरकारी कर्मचाऱ्यांसाठी सरकारी व्यवस्थेच्या माध्यमातून चालविलेली लाभ उकळणारी राजवट असे चित्र निर्माण होईल. जगातील बहुतांश प्रगत देशांनी सरकारी क्षेत्रात कामगिरी-आधारित (परफॉर्मन्स बेस्ड) वेतनपद्धती लागू केली आहे. ब्रिटनमध्ये पीआरपी अर्थात् परफॉर्मन्स रिलेटेड पे पद्धत आहे. तेथे कर्मचाऱ्याला उद्दिष्ट दिले जाते व त्यानुसार त्याचा पगार ठरतो. सिंगापूरमध्ये प्रत्येकाला 'की रिझल्ट एरियाज' दिले जातात, म्हणजे नेमके कोणते काम किती प्रभावीपणे करायचे आहे, हे सांगितले जाते. ऑस्ट्रेलियात दरवर्षी कर्मचाऱ्यांचे मूल्यमापन करून बढती-वेतनवाढ ठरविली जाते. भारतात मात्र असा विचार राजकीयदृष्ट्या 'धोकादायक' मानला जातो. कारण, तो नोकरशाहीची मक्तेदारी संपविणारा अर्थात् मतदारांना नाराज करणारा ठरू शकतो. पण, देशाला खरोखर उत्पादकता वाढवायची असेल, तर असा बदल करणे अपरिहार्य आहे. भारतात सुमारे ७ कोटी लोक नियमितपणे आयकर भरतात. १४० कोटींच्या देशात फक्त ५ टक्के जनता सरकारला थेट आर्थिक योगदान देते आणि त्या ५ टक्के लोकांच्या पैशातून नोकरशाहीचा पगार दिला जातो. करदात्याला ना निर्णय प्रक्रियेत स्थान आहे, ना त्याच्या पैशाच्या वापरावर त्याचे नियंत्रण आहे. अशा स्थितीत सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीचा विषय नव्या नजरेतून पाहिला जाण्याची गरज आहे. वेतन आयोगाची संकल्पना निकालात काढण्याची गरज नाही. पण, प्रत्येक कर्मचाऱ्याला कामानुसार पगार, भत्ते, बोनस मिळेल, अशी व्यवस्था निर्माण केली गेली पाहिजे. लोकशाहीतील महत्त्वाचा स्तंभ असलेल्या नोकरशाहीकडून उत्तरदायित्व अपेक्षित आहे. पण, त्याचा लवलेशही नोकरशाहीत आढळत नाही. सदैव स्वतःची काळजी वाहणारा वर्ग असेच नोकरशाहीचे स्वरूप आहे. प्रश्न आठव्या वेतन आयोगाचा नाही. पगारवाढीला विरोध करण्याचा किंवा पगारवाढीचे महत्त्व नाकारण्याचाही नाही. प्रश्न आहे तो सरकारी कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या लाभांच्या तुलनेत अत्यंत असमाधानकारक असलेल्या त्यांच्या कामगिरीचा आणि तरीही सरकारकडून होत असलेल्या त्यांच्या लाड-कौतुकाचा. हे लाड-कौतुक कामगिरीच्या नजरेने पाहण्याचा विवेक शासकांमध्ये येईल तोच सुदिन!

## प्रासंगिक

**विनोद देशमुख**

# सरदार पटेल नसते तर... आम्ही पाकिस्तानी असतो!

भारताचे पहिले उपपंतप्रधान आणि गृहमंत्री लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचे नाव उच्चारताच निझामग्रस्त राजुरा तालुका, वऱ्हाडचा काही भाग आणि मराठवाडा येथील जनतेची मान आजही कृतज्ञतेच्या भावनेने झुकते, इतके त्यांचे आमच्यावर उपकार आहेत. कारण, सरदारांनी निझाम स्टेट बरखास्त करून स्वतंत्र भारतात विलीन करण्यासाठी पोलिस ॲक्शन (ऑपरेशन पोलो) केली नसती तर, वरील भागातील आम्ही लोक आज (दक्षिण) पाकिस्तानचे नागरिक राहिलो असतो आणि हिंदू अल्पसंख्यक म्हणून आमची दैनाच झाली असती, यात संशय नाही. यातून आम्ही वाचलो, हे निव्वळ पटेलांचे उपकार. ते आमच्या पुढच्या पिढ्यांनाही कधीही न विसरता येण्यासारखेच आहेत. त्यासाठी आम्ही सारे माजी निझाम स्टेटवाले सरदार पटेलांच्या कायम ऋणात राहू इच्छितो आणि आज त्यांच्या १५० व्या जन्मदिनी त्यांच्या स्मरणार्थ नतमस्तक होत आहोत.

शेवटचा निझाम मिर उस्मान अली खान अतिशय धूर्त होता. अखंड भारताच्या फाळणीच्या वेळी त्याला भारतात विलीन व्हायचे नव्हते. परंतु, आपले राज्य भारताच्या मध्यस्थानी असल्याने ही गोष्ट सहजशक्य नाही, याचीही त्याला कल्पना होती. म्हणून त्याने आधीच मुस्लिम युवकांचे निमलष्करी दल (रझाकार) उभारण्यास प्रोत्साहन देऊन हिंदू जनतेवर अत्याचार सुरू केले. याच्या विरोधात काँग्रेस नेते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वात जनतेने गावोगावी लढा दिला, सशस्त्र संघर्ष करून रझाकारांचा कडवा प्रतिकार केला. त्यामुळे निझामाला शरणागती पत्करणे शेवटी भाग पडले.

या यशाचा अंतिम अंक मात्र सरदार पटेलांनी लिहिला, हे आता ऐतिहासिक सत्य आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारतात सामील व्हायला निझाम तयार नव्हता आणि रझाकारांना मदत करीत निझाम स्टेटमध्ये अत्याचारांचा नंगानाच घालत होता. परंतु, भारतीय नेते काहीही करू शकत नव्हते. कारण, ब्रिटिश गव्हर्नर जनरल लॉर्ड माऊंटबॅटन, पंडित नेहरू आणि बॅ. जिना यांचे एकमत होत नव्हते. शेवटी निझाम स्टेट, काश्मीर आणि जुनागढ या तीन संस्थानांचा प्रश्न अधांतरी ठेवून १४-१५ ऑगस्टला भारत-पाकिस्तान वेगळे करण्यात आले.



स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्रिपद सरदार पटेल यांच्याकडे आल्यानंतर त्यांनी वरील तीनही संस्थानांचा प्रश्न प्राधान्याने हाती घेतला. काश्मीरचे महाराजा हरिसिंग यांनी भारतात येण्याचे मान्य केले. परंतु, जुनागढच्या नवाबाने पाकिस्तानमध्ये जाणे पसंत केले होते. त्यावर पटेलांनी जुनागढ ताब्यात घेऊन तेथे जनमताचा कौल भारताच्या बाजूने मिळवून घेतला. प्रश्न राहिला निझामाचा. कासीम रिझवीच्या पाठिंब्यावर निझाम नकारघंटा वाजवत होता. यावर तोडगा काढण्यासाठी निझामाशी चर्चा करण्यावर नेहरूंचा भर होता, तर पटेल मात्र लष्करी कारवाईच्या मूडमध्ये होते. तशी संधी त्यांना एक वर्ष उलटल्यानंतर मिळाली आणि त्याच्या परिणामी आम्ही उशिरा का होईना, स्वतंत्र होऊन भारताचे नागरिक बनू शकलो.

सप्टेंबर १९४८ मध्ये नेहरू परदेश दौऱ्यावर गेले आणि ही संधी साधून पटेलांनी पोलिस ॲक्शन करीत चार दिवसांत (१३ ते १७ सप्टेंबर) निझाम स्टेटवर ताबा मिळविला अन् ते भारतात विलीनही करून घेतले. बहुतांश भारताचा स्वातंत्र्यदिन १५ ऑगस्टला साजरा होत असताना माजी निझाम स्टेटमध्ये (महाराष्ट्राचे वरील तीन भाग, तेलंगणा, आंध्रप्रदेश, कर्नाटकचा काही भाग) मात्र स्वातंत्र्यदिन १७ सप्टेंबरला होतो, तो यामुळेच. याला हैदराबाद मुक्ती दिन, मराठवाडा मुक्ती दिन, राजुरा मुक्ती दिन असे संबोधले जाते, तर या स्वातंत्र्यासाठी झालेल्या जनतेच्या लढ्याला त्या-त्या भागातील मुक्ती संग्राम म्हणतात.

हे शक्य झाले सरदार वल्लभभाई पटेल यांच्यासारख्या कणखर, प्रसंगावधानी अन् दूरदृष्टीच्या नेत्यामुळेच. भारत आधी स्वतंत्र झाल्यामुळे निझाम स्टेटमध्ये लष्करी कारवाई करणे नव-भारताला शक्य नव्हते. कारण, आंतरराष्ट्रीय नियमानुसार, तो निझाम स्टेटवर हल्ला ठरला असता आणि प्रश्न चिघळून हाताबाहेर गेला असता. तसे होऊ नये म्हणून पटेलांनी पूर्ण काळजी घेतली. या कारवाईला त्यांनी पोलिस ॲक्शन असे नाव दिले आणि जनतेलाही सोबत घेत प्रत्यक्षात लष्कराचाच वापर केला! या डावपेचामुळे निझामाची गोची होऊन त्याला शेवटी पटेलांपुढे नाक घासावे लागले!!

एकूण, सरदार पटेलांच्या दृढ निश्चयामुळेच आज आम्ही भारतात आहोत आणि मानाने जगत आहोत. अन्यथा, बांगलादेशासारखे तिसरे पाकिस्तान आमच्या नशिबी आले असते आणि कायमचे हाल झाले असते. त्यातून आम्हाला वाचविणाऱ्या या लोहपुरुषाला आज दीडशेव्या जयंतिदिनी कोटी कोटी प्रणाम.

९८५०५८७६२२

## वेध

**रेवती जोशी-अंधारे**

# आता ट्रेंड स्नॅक्स टूरिझमचा!

'नित्य नूतन हिंडावे, उदंड देशाटन करावे' समर्थ रामदास स्वामींची ही उक्ती आजचे मिलेनियल्स आणि जेन झी खऱ्या अर्थाने सार्थ ठरवित आहेत. देश-विदेशात फिरून मनुष्याला येणारा विवेक त्याला सुजाण बनवितो, ही मान्यता! पर्यटन कशासाठी तर शिक्षणासाठी, निसर्गसौंदर्यासाठी, प्राचीन वास्तूंच्या अभ्यासासाठी, आरामासाठी आणि क्वचित वैद्यकीय उपचारांसाठी सुद्धा! पण, आता ठिकठिकाणचे स्नॅक्स खाण्यासाठी पर्यटनाचा ट्रेंड आला आहे. 'फिरायला जाणे' यामागची संकल्पनाच बदलून गेली आहे. प्रत्येक १० मैलांवर भाषा बदलते, तशी खाद्य संस्कृतीही बदलते. फिरायला गेल्यानंतर एखाद-दुसरा स्थानिक पदार्थ चाखायचा, ही रूढी मोडित काढून, कुठे आणि काय चांगले खायला मिळते? तिथे फिरायला जायचा ट्रेंड आहे. सोशल मीडियावर व्हायरल रिल्स, स्नॅक्स बनवितानाचे किंवा त्यांचे अन बॉक्सिंग करतानाचे व्हिडीओज् कल्पनेपलीकडे लोकप्रिय आहेत. एका ताज्या आकडेवारीनुसार, परदेशात पर्यटनाला जाण्यापूर्वी ४७ टक्के पर्यटक, स्थानिक पेय-पदार्थ आणि स्नॅक्सच्या पर्यायांचा प्राधान्याने विचार करतात. त्यात स्वित्झर्लंडचे चॉकलेट बुटीक, जपानचे किटकॅट, कोरियाई हनी बटर चिप्स, इटालियन ट्रफल क्रिस्प्स, थायलॅण्डचे प्रिंगल्स, तायवानचा बबल टी, टोकियोतील विविध चवींचे सकुरा, सेऊलच्या पेस्ट्री, दुबईचे कुनाफा चॉकलेट, फ्रूट आईस्क्रीम अशी ही यादी न संपणारी आहे.

एखाद्या ठिकाणी फिरायला गेल्यावर काय बघायचं? तिथली वनराई, जंगल सफारी, संग्रहालय, ऐतिहासिक वास्तू, प्राणी संग्रहालय, गगनचुंबी इमारती आणि तारांकीत हॉटेल्स? नाही! एखाद्या लहानशा गल्लीत मिचमिच्या डोळ्यांच्या आजीबाईने बनवलेली पेस्ट्री, रस्त्याच्या कडेला उभ्या हातगाडीवर बनविलेला पास्ता, एखाद्या सुपर मार्केटमध्ये मिळणारी स्थानिक फळांपासून बनविलेला खमंग चवीचा एखादा पदार्थ हे नव्या काळातील 'ट्रॅव्हल गोल' आहे.

एखाद्या चॉकलेट किंवा विशिष्ट सॅण्डविचसाठी परदेश प्रवास करण्यासाठी तयार असलेली आताची पिढी, खाण्याच्या अनुभवातून त्या ठिकाणच्या संस्कृतीशी जोडली जाण्यास उत्सुक आहे. ही खऱ्या अर्थाने 'वसुधैव कुटूंबकम्'ची सुरुवात आहे. देशोदेशीच्या प्रस्थापित पर्यटनस्थळांऐवजी स्थानिक खाद्यपदार्थ आता टुरिस्ट डेस्टिनेशन 'ठरवत' आहेत. यात जेन झीसोबतच मिलेनियल्स म्हणजे गेल्या शतकातील ८०च्या दशकात जन्मलेली मंडळीसुद्धा पुढे आहेत. दहापैकी ६ पर्यटक स्थानिक व्यंजनांच्या माहितीवर त्या पर्यटन स्थळी जायचं किंवा नाही, हे ठरवितात. जवळपास ७० टक्के पर्यटक असे खास पदार्थ विकत घेण्यासाठी वेगळं बजेटसुद्धा प्लॅन करतात. जास्त शेल्फ लाईफ असलेले पदार्थ विकत घेऊन, मायदेशी भेट म्हणून देण्याकडेही पर्यटकांचा कल वाढला आहे.

रस्त्याच्या कडेला उभ्या असणाऱ्या हातगाड्यांप्रमाणेच स्थानिक सुपरमार्केट किंवा लहान खाणावळींनाही पर्यटक आवर्जून भेट देत आहेत. 'बिल्डींग बघण्यापेक्षा बर्गर महत्त्वाचा' असा ट्रॅव्हल फंडा आहे. पॅरीसमध्ये जाऊन आयफेल टॉवर बघितला नाही तर काय बघितलं? हे मानणारी पिढी आता संपतेय्. एकूण जेन झी पर्यटकांपैकी ३८ टक्के, आयफेल टॉवर बघण्यापेक्षा, खास आणि अस्सल चवीचे फ्रेंच पदार्थ खायला प्राधान्य देतात. व्हायरल व्हिडीओज बघून त्या ठिकाणी पोहचलेले हे पर्यटक त्या स्नॅक्ससाठी अगदी रांगा लावून उभे राहतात.

महागडी हॉटेल्स आणि तिथलं जेवण पर्यटकांच्या पसंतीक्रमातून हद्दपार झालं आहे. दक्षिण आशियातील गल्लीबोळात '७ इलेव्हन' नावाची स्थानिक खाणावळ शोधत भटकणाऱ्या आणि दुबईच्या कुनाफाची चव सांगताना न थकणाऱ्या 'हिस्टेरिक' पर्यटकांचे व्हिडीओज एका क्लिकवर आहेत. पर्यटनाचे निमित्त आता निसर्गसौंदर्याची विहंगम दृश्ये नसून, देशी चवीचे पदार्थ झाले आहेत. सोशल मीडियावरील व्हायरल व्हिडीओजमुळे ही क्रेझ निर्माण झाल्याचं तज्ज्ञांचे मत असले, तरी पर्यटकांच्या मनापर्यंतचा मार्गही आता त्यांच्या पोटातून जातो, ही नवी संकल्पना मूळ धरत आहे. येणाऱ्या दशकात 'स्नॅक टुरिझम' हा ट्रॅव्हल इंडस्ट्रीचा ट्रेंड सेटर ठरणार आहे.


९८५०३३९२४०

## दखल

**मोरेश्वर बडगे**

# गृहमंत्र्यांच्या वक्तव्याचा अर्थ

देशाचे गृहमंत्री अमित शाह यांना 'चाणक्य' म्हणून देश ओळखतो. त्यांनी भाजपाचे काम देशभर वाढवले. शतप्रतिशत, पंचायत ते पार्लमेंट हा विषय त्यांनीच मांडला. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष झाल्यानंतर त्यांनी घेतलेल्या परिश्रमातूनच भाजपा आज दिसतो त्या स्वरूपात उभा आहे. अमित शाह नुकतेच मुंबईत येऊन गेले. तेथे त्यांनी केलेल्या एक वक्तव्याची चर्चा आहे. 'चाणक्य'चे बोलणे-वागणे हलक्यात घ्यायचे नसते. तो बोलतो त्याच्या प्रत्येक शब्दाकडे गंभीरपणे बघायचे असते. पण समोरचा माणूस काहीही बोलला तरी त्याचा विपर्यास करून सांगणं ही अनेकांची हौस फिटत नसते. 'शिल्लक शिवसेने'चे अध्यक्ष उद्धव ठाकरे, त्यांचे हनुमान खासदार संजय राऊत हे त्यातलेच. प्रदेश भाजपाच्या मुंबईतल्या नव्या कार्यालय इमारतीच्या भूमिपूजनाला शाह आले होते. त्यावेळी केलेल्या भाषणात 'महाराष्ट्रात भाजपाला आता कोणत्याही कुबड्यांची गरज उरलेली नाही' असे वक्तव्य शाह यांनी केले. त्यांच्या या वक्तव्याचा काहींनी विपर्यास केला. उपमुख्यमंत्रिद्वय एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना उद्देशून त्यांचे वक्तव्य होते का? अशी चर्चाही राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. त्यामुळे हा संभ्रम प्रथम दूर करणे आवश्यक आहे. 'कुबड्यांची गरज नाही' याचा अर्थ एकनाथ शिंदे किंवा अजितदादा यांची गरज उरली नाही, असा अजिबात नाही. शिंदे किंवा दादा हे कुबड्या नाहीत. तसे पाहिले तर भाजपाचे आज १३३ आमदार आहेत. आणखी १०-१२ जमवले तर सरकार चालवण्यासाठी पुरेसे आहेत. भाजपाला ते करायचे नाही. अजितदादांना सोबत घेणे भाजपामधल्या अनेकांना आवडले नाही. पण शरद पवारांची 'कुबडी' काढून घेण्यासाठी ते आवश्यक होते, हे 'चाणक्य'च ओळखू शकतो. उद्धव ठाकरे यांची मस्ती जिरवण्यासाठी एकनाथ शिंदेंचे राजकीय महत्त्व शाहच ओळखू शकतात. पण कुबड्या नकोत म्हणजे 'शिंदे-दादा आऊट' असा अर्थ सांगितला जात आहे. तसे वास्तव नाही, हे स्पष्ट केले पाहिजे. 'शिवसेनेची कुबडी घेऊन भाजपा उभा राहिला. शिवसेनेचं बोट पकडलं म्हणून भाजपा उभा होऊ शकला' असे उद्धव ठाकरे नित्यनियमाने सांगत असतात. ते वास्तव नाही. भाजपा आज जो दिसतो त्यामागे २०-२५ वर्षांची हजारो कार्यकर्ते-नेते यांची तपश्चर्या आहे. उद्धव ठाकरेंनी काय केले? पिताश्रींची स्वयंभू संघटना उद्धव यांनी पार पंगू करून टाकली. मुख्यमंत्री होण्याच्या हव्यासापोटी त्यांनी वडिलांच्या पक्षाचे मातेरे केले. काय मिळवले? अडीच वर्षांतच घरी बसावे लागले. राष्ट्रवादी आणि काँग्रेसची कुबडी घेतल्याशिवाय त्यांना आज चालता येत नाही. राज ठाकरे या २० वर्षांपूर्वी वेगळ्या झालेल्या आपल्या चुलत भावाला उद्धव जवळ करत आहेत. हीच ती मनसे आहे, जिच्यावर बोलताना, 'संपलेल्या पक्षाबद्दल आपण बोलत नाही' असे आदित्य ठाकरे म्हणाले होते. तरीही टेन्शन आहेच. भाऊ अजून तोंड उघडायला तयार नाही. युतीचं बोलत नाही. दुसरे म्हणजे राज यांना जवळ घेतले तर काँग्रेसची हुकमी मतं हातची जातील, मुस्लिम मतंही दूर जातील, हे उद्धव यांना मोठे टेन्शन आहे. १९८५ मध्ये स्वबळावर मुंबई महापालिका स्वबळावर जिंकणारी ठाकरेंची शिवसेना आज कुबड्यांच्या शोधात आहे. आपण लंगडे झालो आहोत, आपण का लंगडे झालो, आपल्याला कोणी लंगडे केले हे समजून घ्यायचे सोडून अमित शाह यांच्या वक्तव्याचा विपर्यास करायचा हट्ट उद्धव यांच्याकडून सोडवत नसेल तर हेच होणार.





उद्धव ठाकरे यांनी अमित शाह यांना 'ॲनाकोंडा' म्हटले. या नावाचा महाभयंकर साप आहे. तो समोरच्याला गिळून टाकतो. त्या हिशोबाने ठाकरेंनी शाहांना 'ॲनाकोंडा' म्हटले. पण भाजपाने किंवा अमित शाह यांनी कोणत्या पक्षाला गिळले, याचे एकही उदाहरण ठाकरे देऊ शकले नाहीत. कसे देतील? असेल तर देतील ना. १९८० मध्ये भाजपाने गुजरातमध्ये उठायला सुरुवात केली. गुजरातमध्ये कित्येक वर्षे भाजपाची सत्ता आहे. तिथे भाजपाने कोणाला गिळले? ११ वर्षांपासून भाजपाची देशावर सत्ता आहे. नरेंद्र मोदींनी कोणाला गिळले? भाजपाने गिळले असा एक पक्ष सांगा. जून २०२२ मध्ये हे होऊ शकलं असतं. एकनाथ शिंदे ४० आमदार घेऊन फुटले होते, त्यांना सहज खिशात टाकता आलं असतं, पण भाजपा त्या मोहात गेली नाही. गुजरातमध्ये नितीशकुमार यांचा जनता दल युनायटेड भाजपाला सहजपणे गिळता आला असता. पण भाजपा त्या भानगडीत पडला नाही. याउलट, काँग्रेसचा काय रेकॉर्ड आहे? काँग्रेसने अर्धा डझन पक्ष गिळले आहेत. हे सांगताना हरयाणाचे उदाहरण प्रामुख्याने दिले जाते. तेथे भजनलाल यांचा संपूर्ण पक्ष काँग्रेसने गिळंकृत केला होता. उद्धव ठाकरेंची अडचण वेगळी आहे, त्यांना जिंकायचं कसं? ते अजून कळलेले नाही. वडिलोपार्जित पक्ष होता. त्या पुण्याईवर तब्बल २५ वर्षे मुंबई ठाकरे कुटुंबाकडे राहिली. ती पुण्याई आता सरत आली आहे. उद्धव ठाकरे यांना तर मुळात राजकारण किती कळतं? हाच प्रश्न आहे. त्यांना जिंकायचं कळत नाही. मात्र पक्ष कसा संपवायचा? हे छान कळते. त्यासाठी जे जे करता येईल ते ते करण्याचा चंग उद्धव यांनी बांधला आहे, असे अलिकडच्या त्यांच्या वर्तनावरून ध्यानात येते.

महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत. कुठल्याही परिस्थितीत त्या येत्या ३१ जानेवारीपूर्वी उरकून घ्या, असा दम सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. त्या हिशोबाने निवडणूक आयोग कामाला लागला आहे. सारे राजकीय पक्षही तयारीला भिडले आहेत. त्यामुळेच सध्या राजकारण तापलेले दिसते. खरी हाणामारी महापालिका निवडणुकांमध्ये होईल. २७ महापालिकांच्या निवडणुका सर्वात शेवटी घेण्याचे ठरले आहे. त्या हिशोबाने महापालिकांच्या निवडणुकीला नववर्ष उजाडेल. महापालिकांमध्ये मुंबईची निवडणूक सर्वाधिक चुरशीची होईल. एकदम 'करो वा मरो.' ठाकरेसेनेचे प्राण मुंबईमध्ये आहेत. राज्यातली ही सर्वात श्रीमंत महापालिका गेली २५ वर्षे त्यांच्या ताब्यात होती. पुढेही ती राहावी यासाठी उद्धव यांनी कंबर कसली आहे. गेल्या निवडणुकीत शिवसेना अखंड होती. सरकारमध्ये हे दोघे युतीत असतानाही शिवसेना आणि भाजपा आमनेसामने लढले. शिवसेनेला ८४ ते भाजपाला ८२ जागा मिळाल्या. महापालिका ठाकरेंकडे गेली. यावेळी कुठल्याही परिस्थितीत मुंबई जिंकायचीच ह्या जिद्दीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस भिडले आहेत. महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा सामना अपेक्षित आहे. यावेळी राज ठाकरे यांना सोबत घेण्याची रणनीती उद्धव यांनी आखली आहे. पण काँग्रेसला राज ठाकरे चालतील का? त्यावर सारा खेळ आहे. १४ नोव्हेंबरला बिहारच्या निवडणुकीचा निकाल आहे. त्यानंतर काँग्रेस आपले पत्ते खुले करील. मुंबईच्या निवडणुकीत विरोधकांचे नेतृत्व मनसे सुप्रीमो राज ठाकरे यांनी हायजॅक केले आहे. 'मतदार याद्यांमधल्या त्रुटी दूर केल्याशिवाय निवडणूक होऊ देणार नाही' अशी घोषणा राज ठाकरेंनी मागेच केली आहे. मात्र किती विरोध पक्ष या मुद्यावर त्यांच्या पाठीशी राहतात हा प्रश्नच आहे. निवडणुकाच लढायच्या नाहीत हा मुद्दा विरोधी पक्षांच्या किती पचनी पडेल ते पाहायचे. निवडणूक न लढवणे राज ठाकरेंना परवडू शकते. इतरांना ही चैन मानवेल काय? विरोधी पक्ष राज यांच्या मागे फरफटत जातात काय? मुंबईच्या निवडणुकीत बरेच काही घडणार आणि बिघडणार आहे.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## विद्यामंदिर की भ्रष्टाचाराचा अड्डा?

नागपूर जिल्ह्यातील बारा शाळांनी तीन कोटींचे अनुदान घेऊन सरकारची फसवणूक केली. बालक मंदिर, शाळा, महाविद्यालये हे पवित्र विद्यामंदिर आहे. पूर्वी वर्गात प्रवेश करण्यापूर्वी पायातील चप्पल, बूट काढून नंतर वर्गात प्रवेश व्हायचा. या मंदिरातच खोटे बोलू नका, चोरी करू नका, वडील माणसाला मान द्या, हे जीवनाचे प्राथमिक शिक्षण मिळे.



परंतु आता शिकवणारेच भ्रष्टाचारी झाले आहेत. बहुतेक ठिकाणी लाच घेऊन प्रवेश देतात. त्यामुळे गरीब मुलांचे नुकसान होते. हे शिक्षणाच्या बाबतीत उदासीन असतात. नीट, यूजीसीच्या परीक्षेत एक कोटी रुपयांपर्यंत पैसे घेऊन गुण वाढविल्याचे ऐकले होते. बुद्धीपेक्षा पैसा श्रेष्ठ झाला आहे. नीतिमत्ता शिकविणारे अनीतीने वागतात. मग मुलांना योग्य शिक्षण, संस्कार कुठे मिळणार? विद्या क्षेत्रात तरी भ्रष्टाचाराला स्थान नको. ज्यांनी भ्रष्टाचार केला त्यांचे नाव जाहीर करावे, त्यांची संपत्ती सरकारजमा करावी, त्यांना तुरुंगात टाकावे. तेथे श्रीमंत, प्रतिष्ठित वगैरे बघू नये.

**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

## वाचक पत्रे

### आवळा नवमीचे महत्त्व

आपली भारतीय संस्कृती ही निसर्गाशी घट्ट जोडलेली आहे. हिंदू धर्मात निसर्गाला देवत्व दिलं गेलं आहे. झाडं, नद्या, पर्वत, प्राणी, सूर्य, चंद्र या सगळ्यात देवाचं दर्शन घडतं. अशाच निसर्गाशी निगडित सणांपैकी एक म्हणजे आवळा नवमी, जी ऑक्टोबर महिन्यातील कार्तिक शुक्ल नवमी या दिवशी साजरी केली जाते. या दिवसाला कुष्मांड नवमी असेही म्हणतात. 'आवळा म्हणजे पृथ्वीवरील अमृत!' असे आयुर्वेदात म्हटले जाते. तो शारीरिक, मानसिक त्रास दूर करणारा आहे; म्हणूनच त्याला 'औषधांचा राजा' म्हणतात. थंडीच्या दिवसांत आवळ्याचे सेवन केल्याने रोगप्रतिकारकशक्ती वाढते. आयुर्वेदाच्या तत्त्वानुसार आवळा पित्त, बद्धकोष्ठता, त्वचारोग, केस गळणे, अकाली केस पिकणे आणि जीवनसत्त्व 'सी'ची कमतरता या सर्वांवर रामबाण उपाय आहे. आमला एकादशीच्या दिवशी भगवान श्रीविष्णूला आवळा अर्पण करतात आणि तुळशी विवाहातही आवळ्याचा वापर करतात. कारण आवळ्यात विष्णुतत्त्व मुबलक प्रमाणात असते. आवळा पूजनाची पौराणिक कथा आहे. एकदा देवी लक्ष्मी पृथ्वीवर भ्रमण करत असताना त्यांनी भगवान विष्णू आणि भगवान शिव या दोघांची एकत्र पूजा करण्याची इच्छा व्यक्त केली. ते कसे शक्य आहे, असा विचार करताना त्यांना लक्षात आले की तुळशी (विष्णूला प्रिय) आणि बेलपत्र (शिवाला प्रिय) या दोन्हींचे गुणधर्म आवळ्याच्या झाडात एकत्र आढळतात. म्हणून देवी लक्ष्मीने आवळ्याच्या झाडाची पूजा केली. या पूजेमुळे भगवान विष्णू आणि भगवान शिव दोघेही प्रसन्न होऊन प्रकट झाले. देवी लक्ष्मीने आवळ्याच्या झाडाखाली त्यांना अन्न अर्पण केले. त्या दिवसापासून म्हणजेच कार्तिक शुक्ल नवमीपासून आवळ्याची पूजा करण्याची परंपरा सुरू झाली. आवळा नवमी पूजेचा विधी असा आहे. या दिवशी सकाळी स्नान करून व्रताचा संकल्प करावा. त्यानंतर आवळ्याच्या झाडाखाली पूर्वाभिमुख बसून 'ॐ धात्र्यै नमः' हा मंत्र म्हणावा. झाडाच्या मुळाशी दूध, पाणी, फुले, अक्षता अर्पण करून कापूर आणि तुपाचा दिवा लावावा. आरती करून झाडाला पिवळा धागा बांधत प्रदक्षिणा घालावी. गोड पदार्थांचा नैवेद्य दाखवतात, काही ठिकाणी झाडाच्या सावलीत ब्राह्मण भोजन दिले जाते. आवळा नवमी हा केवळ एक धार्मिक सण नाही, तर तो निसर्ग, आरोग्य आणि अध्यात्म यांचा सुंदर संगम आहे.



**रमा देशमुख**/नागपूर

## आजचे संघगीत-२८

शुक्रवार, ३१ ऑक्टोबर २०२५

### मी युग नव निर्मीन

मी युग नव निर्मीन मी युग नव निर्मीन ॥धृ.॥

रुखल्या सुखल्या भूमीवरती सद्‌भावाने करुनी वसती
संस्कारांचे जल सिंचुनिया सोनमळे पिकवीन ॥१॥

शांत सागरा जवळी जाउन वडवाग्नीची ओळख सांगुन
सत्कार्याच्या प्रचंड लाटा उसळत मी ठेवीन ॥२॥

येता कल्पांताची चाहुल, जन होती भयकंपित व्याकुळ
जनशक्तीला जागृत करुनी गोवर्धन उचलीन ॥३॥

कोटि कोटि मम बाहू उभवुन नभ कोसळते अलगद झेलुन
विश्वासाचे उषः किरण दिग् दिगंतरी उधळीन ॥४॥

ज्या एका स्वप्नाचा औरस भारतीय मी म्हणुनी
वारस पुन: जगाच्या जीवनात साक्षात्कार बघेन ॥५॥

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

शुक्रवार, ३१ ऑक्टोबर २०२५



## HEALTH DEPARTMENT
## GOVERNMENT OF MAHARASHTRA
## TENDER NOTICE 2025-26
## CIVIL SURGEON SOLAPUR

Rate Contract of Supply & Refilling of Medical Oxygen in Cylinder, Tank & PESO Certificate Renewal

**Tender Reference No. CSS/Med.Store/Medical Oxygen/ E Tender-04/25-26**

Civil Surgeon, Solapur invites proposals from reputed and experienced companies, Recognized Manufacturers, Authorized supplier to participate in the competitive bidding process to Rate Contract of Supply & Refilling of Medical Oxygen in Cylinder, Tank & PESO Certificate Renewal..

For the detailed tender documents, interested bidders should visit **http://www.maharashtra.gov.in/tenders.**

Tender submission would be online and the deadline to submit the proposals is 07/11/2025 (05.00 PM)

Sd/-
Civil Surgeon, Solapur

Aryan Creation

## जाहीर नोटीस

दि. ३०/१०/२०२५

तांदुळवाडी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. तांदुळवाडी, ता. बार्शी जि. सोलापूर या सहकारी संस्थेच्या सभासदांना सुचित करण्यात येते की, आपल्या सहकारी संस्थेच्या संचालक मंडळामध्ये सर्वसाधारण या मतदार संघातील रिक्त झालेल्या एक जागा भरण्यासाठी अध्यासी अधिकारी म्हणून सौ. एस. के. मुंढे सहकारी अधिकारी श्रेणी-२, अधिन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, बार्शी यांचे अध्यक्षतेखाली दिनांक :- ०६/११/२०२५ रोजी सकाळी ठीक ११:३० वाजता संस्थेच्या कार्यालयात संचालक मंडळाची सभा आयोजित करण्यात आलेली आहे.

तरी सर्व संचालकांना संचालक मंडळाच्या सभेस हजर राहण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे.

**सही/-**
**( सौ.एस.के. मुंढे)**
**अध्यासी अधिकारी तथा सहकारी श्रेणी-२ अधिन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, बार्शी**

**सही/-**
**सचिव**
**तांदुळवाडी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. तांदुळवाडी, ता. बार्शी जि. सोलापूर**

## जाहीर प्रसिध्दीकरण

सि. कि. अर्ज नं. २६२/२०२५
नि. ७

### सोलापूर येथील मे. जिल्हा न्यायाधीश सारे यांचे कोर्टात

१. शिरीन आसिफ सय्यद इनामदार
वय - ३७ वर्ष, धंदा-घरकाम
२. सरिना आसिफ सय्यद इनामदार — **-- अर्जदार**
वय-१४ वर्षे, धंदा-शिक्षण
तर्फे अज्ञानपालनकर्ता अर्जदार नं. १
दोघे रा. ब्लॉक नं. १८. साई होम्स, आदित्य नगर शेजारी, विजापूर रोड, सोलापूर

**विरुध्द**

**महाराष्ट्र सरकार**
(समन्सची बजावणी मा. जिल्हा सरकारी वकील कार्यालय यांचेवर करण्यात यावी) — **-- सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदाराने खालील नमूद वर्णनाची अर्जदार व अज्ञानाचे संयुक्त नावे असलेली मिळकत विक्री करणेसाठीची परवानगी मिळणेकामी अर्ज हा मे. न्यायालयात सदर मिळकत विक्रीसंबंधी कोणाची काही हरकत असल्यास ही नोटीस दाखल केला आहे. प्रसिध्द झालेपासून तीस दिवसाचे आत अथवा नेमली तारीख ०३/१२/२०२५ रोजी स्वतः अथवा योग्य माहीतगार ईसमामार्फत अथवा वकिलांमार्फत हजर होवून लेखी म्हणने सादर करावे. वरील मुदतीत कोणाची काही तक्रार वा हरकत न आलेस मे. न्यायालय पुढील योग्य ते हुकूम करतील त्यानंतर कोणाचीही तक्रार, हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. मिळकतीचे वर्णन - डिस्ट्रीक्ट व सब डिस्ट्रीक्ट सोलापूर पैकी उत्तर सोलापूर, पैकी शहर सोलापूर येथील सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीमधील, नेहरूनगर येथील सर्व्हे नं. २८/१/१/३, यापैकी प्लॉट नं. १८, यांसी ०.९२.९६ आर चौ मी. व त्यावरील आरसीसी बांधकाम यासी चतुःसीमा पूर्वेस प्लॉट नं. १९, दक्षिणेस - ६ मी. रोड, पश्चिम - प्लॉट नं. १७ उत्तर-ओपन स्पेस. ता. २८/१०/२०२५

शिक्का

**सही/-**
**अधिक्षक**
**जिल्हा न्यायालय सोलापूर**

## CHANGE IN NAME

I Hereby Declare that My Old Name **SAHERA BANO MUSTAQ ALI SIDDIQUI** has been changed to **SAHERA MUSTAQ ALI SIDDIQUI**

Resi. - 108 A, Sahara Nagar,Hotgi Road,Solapur - 413003

**Kindly Note the same**

**(Affi. 47977 Dtd. 07.10.2025)**

## जामश्री रिअलटी लिमिटेड

सीआयएन: L17111PN1907PLC000258
नोंदणीकृत कार्यालय: फतेहचंद दमाणी नगर, स्टेशन रोड, सोलापूर, महाराष्ट्र – ४१३ ००१
इमेल आयडी: jammill1907@gmail com

### सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक बुधवार दि. ५ नोव्हेंबर २०२५ रोजी ६०१–बी, ६वा मजला, मोतीमहल, १९५ जे. टी. रोड, चर्चगेट, मुंबई ४०००२० येथे संध्याकाळी ५.०० वाजता (भाप्रवे) इतर गोष्टीसह ३० सप्टेंबर २०२५ रोजी संपलेल्या दुसऱ्या तिमाही आणि अर्ध वर्षा च्या कालावधी करीताचा कंपनीचे अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष ग्राह्य धरण्यासाठी आणि संमत करण्यासाठी घेण्यात येणार आहे.

**जामश्री रिअलटी लिमिटेड करिता**
**सही/-**
**राजेश दमाणी**
**संयुक्त व्यवस्थापकीय संचालक**

तारीख : ३०.१०.२०२५
ठिकाण : सोलापूर

## मध्य रेल्वे
### सोलापूर विभाग
### केटरिंग स्टॉल्सच्या कामकाजासाठी कराराचे वाटप

**निविदा सूचना क्रमांक.**SUR-CATG-25-24 आणि SUR-WVM-25-13 तारीख: 28.10.2025

क्रमांक १. लिलाव कॅटलॉग क्रमांक: SUR-CATG-25-24 लिलाव सुरू होण्याची तारीख आणि वेळ: सकाळी १०.०० वा. १३.११.२०२५ बंद होण्याची तारीख आणि वेळ: सकाळी ११.४० वा. १३.११.२०२५ स्थानकांचे नाव: १. मोहोळ येथील चहाच्या स्टॉलचा ई-लिलाव २. दुधनी ३. माढा ४ आराग ५. मोडनिंब ६. लातूर ७. भिगवन ८. कुर्डुवाडी क्रमांक २. लिलाव कॅटलॉग क्रमांक: SUR-WVM-25-13 लिलाव सुरू होण्याची तारीख आणि वेळ : सकाळी १०.०० वा. १४.११.२०२५ बंद - सकाळी १०.४० वा. १४.११.२०२५ स्थानकांचे नाव: पाणी विक्री यंत्रे - क्लस्टर आधारावर १. वाडी २. कुर्डुवाडी पद्धत: ireps-e लिलावाद्वारे ई-लिलाव (लीज मॉड्यूल) निविदा कालावधी: ५ वर्षे वार्षिक परवाना शुल्क आणि चौथ्या आणि पाचव्या वर्षासाठी १०% वाढीसह. वेबसाइट पत्ता: - सर्व ई-लिलाव तपशील, संबंधित माहिती आणि कागदपत्रे मध्य रेल्वे/भारतीय रेल्वे पोर्टलवर उपलब्ध आहेत http://www.ireps.gov.in सहभागींना अर्ज करण्यापूर्वी वेबसाइटला भेट देण्याची विनंती आहे.

71

**अनाधिकृत रूप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है**

## जाहीर नोटीस

सर्वत्रास विशेषतः शहर व तालुका बार्शी येथील लोकांस, जाहीर नोटीस देणेस सांगितलेवरून, जाहीर नोटीस देणेत येते की,

डी. सोलापूर, सब डी व ता. बार्शी पैकी शहर बार्शी म्यु. पल हद्दीतील अकृषीक प्लॉटस गट नं. १३४०/१/२/५० क्षेत्रफळ १०२.४२ चौ.मी व गट नं. १३४०/१/२/५१ क्षेत्रफळ ९९.१९ चौ. मी. याची एकत्रित चतुःसीमा पूर्वेसः ९ मी. रुंदीचा रस्ता, दक्षिणेसः गट नं. १३४०/१ पैकी प्लॉट नं. ५७, पश्चिमेसः प्लॉट नं. ४८ व ४९, उत्तरेसः प्लॉट नं. ५२ येणेप्रमाणे चतुःसीमापूर्वक खुले प्लॉटस् तदंगभूत वस्तू वहीवाटीचे हक्कासह.

वरील प्लॉटसचे मालकाने ते विक्रीस काढले. आमचे अशील व त्यांचेमध्ये प्लॉटचे खरेदीविषयी बोलणी होऊन तसा ठराव, करार झालेला आहे. त्याप्रमाणे आमचे अशील पुढील दोन दिवसांत प्लॉटची रजि, खरेदी करणार आहेत.

तरी वर नमूद दोन्ही प्लॉटचे मालकी, कब्जे, वहिवाट, बँक व खाजगी कर्जबोजा, दान, गहाण, टाच, लीन, लीज, भाडेपट्टा, बक्षीसपत्र, मृत्यूपत्र इ. किंवा तत्सम स्वरुपात कोणाचेही कसलेही कायदेशीर हक्क, अधिकार असतील त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसांचे आत त्यांचे कायदेशीर हक्क, अधिकाराची कागदपत्र पुराव्यानिशी खातरजमा करून द्यावी नसता सदर दोन्ही प्लॉट हे निर्वेध, निजोखमी, बिनबोजाचे आहेत, त्याबद्दल कोणाचेही कसलेही हक्क अधिकार नाहीत, असलेस त्यांनी ते स्वतःहून कायमस्वरूपी सोडून दिले आहेत, असे समजून खरेदी व्यवहार पूर्ण करतील मग नमूद मुदतीनंतर कोणाचीही कसलीही हरकत, तक्रार चालणार नाही, विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. कळावे, ही जाहीर नोटीस दिली. ता. ३१/१०/२०२५

**सही/-**
**ॲड. श्री. कोकाटे एस. एस** (ॲडव्होकेट व नोटरी),
**ॲड. श्री. घेवारे केदार एन्.**
**जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी, ता. बार्शी जि. सोलापूर.**

## जाहीर प्रसिध्दीकरण

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ११/२०२५

### अक्कलकोट येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो, कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात

१. सौ. ज्योती जगदिश तंबाके (लग्नानंतरचे नाव)
ज्योती अशोक मंदा (लग्नापूर्वीचे नाव)
२. सौ. योगिता सुरेश जलदे (लग्नानंतरचे नाव)
योगिता अशोक मंथा (लग्नापूर्वीचे नाव) — **-- अर्जदार**
३. सौ. सुजाता सचिन मेंथे (लग्नानंतरचे नाव)
सुजाता अशोक मंधा (लग्नापूर्वीचे नाव)
४. गोल्लप्पा अशोक मंथा

**विरुध्द**

**कोणीही नाही** — **-- सामनेवाला**

ज्याअर्थी अर्जदार यांनी अक्कलकोट येथील दिवाणी कोर्टात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ३ प्रमाणे वारसा दाखला (हेअर सर्टीफिकेट) मिळणेसंबंधीचा अर्ज दाखल केला आहे. यातील अर्जदार नं.१ ते ४ अशोक गुरुशांतप्पा मंथा हे दि. ०८/०३/२०२५ रोजी H. No. 8-11-182/ Panchmukhi Colony Raichur (D) Karnatak येथे अपघातामध्ये मयत अशोक गुरुशांतप्पा मंथा यांची पत्नी नागूबाई अशोक मंधा ही दि. १६/०६/२०२४ रोजी दुधनी, ता. अक्कलकोट येथे राहत्या घरी मयत झालेले आहेत. त्यांच्या मृत्यू पश्चात अर्जदार नं.१ ते ४ हे नात्याने मुले व मुली म्हणून त्यांचे कायदेशीर वारसदार अर्जदार नं.१ ते ४ यांची आई कै. नागूबाई अशोक मंथा यांचे नावे विकास ग्रामीण बँक शाखा मुधोळ कर्नाटक या बँकेमध्ये खालील तपशिलात नमुद केल्याप्रमाणे दोन फिक्सड डिपॉझिटच्या रक्कमा आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे,

| अ. क्र. | खाते नंबर | रक्कम |
|---|---|---|
| १. | ०००००८९१५७०२४९१९ | ११४७६/- |
| २. | ०००००८९१५०४८९६२१ | १,८५,७६९/- |

येणेप्रमाणे एकूण रक्कम रुपये १९७२४५/- वर नमुद बँकात अर्जदार यांची आई कै. नागूबाई अशोक मंथा यांचे नावे जमा आहेत. अर्जदार हे मयताचे मृत्यूपश्चात वारसा दाखला (हेअरसर्टिफिकेट) मिळणेबाबत सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थ तमाम लोकांना जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे कळविण्यात येते की, वर नमुद अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ३ प्रमाणे वारसा दाखला (हेअर सर्टिफिकेट) देणेबाबत कोणाचेही कसलीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत अथवा उक्त नेमलेल्या तारखेस दिनांक ३१/१०/२०२५ रोजी मे. कोर्टात स्वतः अगर वकीलांमार्फत हजर राहून लेखी हरकत दाखल करावी, अन्यथा मे. कोर्ट कोणाचीही हरकत नाही, म्हणून अर्जदाराच्या मागणीप्रमाणे वारस जाहीर करुन देण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

ही जाहीर प्रसिध्दीकरण केले. दिनांक ३०/१०/२०२५

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, अक्कलकोट**

## सांगोले नगरपरिषद सांगोले
## जि. सोलापूर

जा. क्र./सानप/०१/५०५८ — दि. ३० ऑक्टो. २०२५

## अंतिम आरक्षण जाहीर सूचना

सांगोला नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ सदस्य पदासाठी दिनांक ०८ ऑक्टोबर रोजी सोडत काढण्यात आली होती. सदर आरक्षणावर विहित मुदतीत एकही हरकत अथवा सूचना प्राप्त न झालेने सदर आरक्षणास मा. जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेमार्फत अंतिम मंजुरी करीता मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांना पाठविले असता त्यास दिनांक २४ ऑक्टोबर २०२५ रोजी अंतिम मान्यता प्राप्त झाली आहे. त्यास अनुसरुन सांगोला नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ सदस्य पदाचे आरक्षणाचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | प्रभाग क्रमांक | जागा क्रमांक | आरक्षण |
|---|---|---|---|
| १ | १ | अ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला |
| | | ब | सर्वसाधारण |
| २ | २ | अ | अनुसूचित जाती |
| | | ब | सर्वसाधारण महिला |
| ३ | ३ | अ | अनुसूचित जाती महिला |
| | | ब | सर्वसाधारण |
| ४ | ४ | अ | सर्वसाधारण महिला |
| | | ब | सर्वसाधारण |
| ५ | ५ | अ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग |
| | | ब | सर्वसाधारण महिला |
| ६ | ६ | अ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला |
| | | ब | सर्वसाधारण |
| ७ | ७ | अ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग |
| | | ब | सर्वसाधारण महिला |
| ८ | ८ | अ | अनुसूचित जाती महिला |
| | | ब | सर्वसाधारण |
| ९ | ९ | अ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग |
| | | ब | सर्वसाधारण महिला |
| १० | १० | अ | सर्वसाधारण महिला |
| | | ब | सर्वसाधारण |
| ११ | ११ | अ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला |
| | | ब | सर्वसाधारण महिला |
| | | क | सर्वसाधारण |

**सही/-**
**(डॉ. सुधीर गवळी)**
**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद सांगोला**

## महाराष्ट्र शासन
## कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
**सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर**
**सात रस्ता, कारीगर पेट्रोल पंपासमोर, सोलापूर ४१३००३**
**ई-निविदा सुचना क्रमांक २८ सन २०२५-२६ (ऑनलाईन)**
**"बी-१ निविदा"**
**(सोलापूर जिल्हयातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त)**

**संदर्भः- महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२२/प्र.क्र.१०४/इमा-२/मंत्रालय मुंबई-०३२ दि.१४/०२/२०२५**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर-४१३००३ निविदा पत्रात नमुद केलेले पात्रतेचे निकष पूर्ण करीत व सा.बां. विभागाकडून नोंदणीकृत असलेल्या **(सोलापूर जिल्हयातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त)** यांचेकडून खालीली कामा करिता "**बी-१**" नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहोत. निविदा कागदोपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर, ४१३००३ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्रं. | कामाचे नाव | निविदेचा प्रकार | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. | ठेकेदाराचा अधीकृत वर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | तुळजापूर इटकळ हन्नूर चपळगाव अक्कलकोट अक्कलकोट स्टे. नागनसूर गाणगापूर राज्य मार्ग क्र. रा. मा. २०८ किमी ३९/00 ते ४२/५०० ता. अक्कलकोट जि. सोलापूर | बी-१ निविदा | १०.८० | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| २ | हन्नूर-किणी-बोरगांव-वागदरी राज्यसिमा (आळंद) राज्यमार्ग क्र २३० सा. क्र. ६/000 ते २५/000 मध्ये देखभाल दुरुस्ती करणे. ता. अक्कलकोट जि. सोलापूर. | बी-१ निविदा | २७.१४ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग अ |
| ३ | रा.म.क्रं ९ ते मुळेगांव दर्गनहळ्ळी धोत्री बोरगांव हन्नूर ते सुलतानपूर ते किणी काजी काणबस ते नळदुर्ग (जिल्हाहद्द) प्रजिमा के ४३ सा.क्र. १९/८०० ते ४६/000 मध्ये देखभाल दुरुस्ती करणे. ता. अक्कलकोट जि. सोलापूर | बी-१ निविदा | ३०.६ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग अ |
| ४ | कणबस करजगी घुंगरेगांव ते शावळ प्रजिमा ४६ सा. क्र/९००० ते १४/५०० मध्ये देखभाल दुरुस्ती करणे. ता. अक्कलकोट जि. सोलापूर | बी-१ निविदा | ११.४८ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| ५ | सुलेरजवळगे केगाव (बु) मुंढेवाडी अंकलगी रस्ता प्रजिमा क्रमांक ४९ सा. क्र. १४/000 ते २९/२०० मध्ये देखभाल दुरुस्ती करणे. ता. अक्कलकोट जि. सोलापूर, | बी-१ निविदा | १२.३८ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| ६ | सुलेरजवळगे मंगरुळ ते देवीकवठे प्रजिमा ५१ सा. क्र. 0/000 ते १३/४०० मध्ये देखभाल दुरुस्ती करणे. ता. अक्कलकोट जि. सोलापूर. | बी-१ निविदा | १३.८२ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| ७ | रा.मा.-२०४ ते रुध्देवाडी तळेवाड सातनदुधनी उटगी-कडबगांव अक्कलकोट स्टेशन जेऊर हंजगी कर्जाळ हाळहळ्ळी ते चप्पळगाववाडी चप्पळगांव मोटयाळ साफळे ला मिळणारा प्रजिमा ५२. किमी.सा.क्र. 0/000 ते २३/४०० मध्ये देखभाल दुरुस्ती करणे, ता. अक्कलकोट जि. सोलापूर | बी-१ निविदा | १३.१४ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| ८ | किणी बादोले बुद्रुक शिरवळ सदलापूर सलगर तोरणी ते मैंदर्गी सातनदुधनी बोरोटी (खु) बारोटी (ब) बबलाद दुधनी ते दुधनी ग्रामिण ते अर्जूनगी प्रजिमा क्रं ५४ किमी. 0/000 ते १४/000 मध्ये देखभाल दुरुस्ती करणे ता. अक्कलकोट जि. सोलापूर | बी-१ निविदा | ९.९० | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| ९ | अक्कलकोट निमगांव हत्तीकणबस चिक्केहळ्ळी सलगर भोसगी ते हिप्परगा राज्यहद्दीपर्यंत प्रजिमा क्र.१५६ सा. क्र. 0/000 ते २०/000 मध्ये देखभाल दुरुस्ती करणे. ता. अक्कलकोट जि. सोलापूर | बी-१ निविदा | १८.00 | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| १० | सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील अक्कलकोट कंटेहळ्ळी गळोरगी उडगी कल्लप्पावाडी रस्ता प्रजिमा-१५७ सा. क्र. 00/00 ते १८/00 मध्य सुधारणा करणे. | बी-१ निविदा | १२.१५ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| ११ | लांबोटी रानमसले वडाळा रस्ता प्रजिमा ३५ कि. मी. १८/८00 ते २७/९00 मध्ये वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. ता उत्तर सोलापूर जि. सोलापूर | बी-१ निविदा | २४.३० | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| १२ | बाळे देगाव बेलाटी रस्ता प्रजिमा- १८६ कि. मी 0/00 ते ७/00 मध्ये वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. ता. उत्तर सोलापूर जि. सोलापूर | बी-१ निविदा | १५.३० | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| १३ | कौठाळी ते मुंगशी रस्ता (प्र.जि.मा. २५) किमी 0/00 ते ३/00, खुनेश्वर ते रानमसले रस्ता (प्र.जि.मा. १४२) किमी १0/00 ते १९/४00 व शेळगाव ते कौठाळी रस्ता (प्र.जि. मा. १0७) किमी 0/0 ते ३/000 मध्ये देखभाल दुरुस्ती करणे ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर | बी-१ निविदा | १९.८० | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| १४ | नरखेड ते वडाळा रस्ता (प्र.जि.मा. ३४) किमी १0/00 ते १९/४00 मध्ये देखभाल दुरुस्ती करणे ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर | बी-१ निविदा | २१.०६ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| १५ | सादेपूर निंबर्गी कदलगांव गावडेवाडी मनगोळी प्रजिमा ४१ कि.मी. 0/0 ते २४/0 मध्ये देखभाल दुरुस्ती करणे. ता दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर | बी-१ निविदा | १४.४० | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| १६ | बोराळे सिध्दापूर वडापूर-अंत्रोळी-कंदलगांव गुंजेगांव ते प्रामा ६ ला जोडणारा रस्ता प्रजिमा ६३ कि.मी. ८/५00 ते ३२/५00 मध्ये देखभाल दुरुस्ती करणे. ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर | बी-१ निविदा | २२.८६ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| १७ | शेळगी दहिटणे बक्षीहिप्परगे वडजी ते जिल्हा हद रस्ता प्रजिमा-१४७ कि.मी. ३/00 ते १२/८00 मध्ये देखभाल दुरुस्ती करणे. ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर | बी-१ निविदा | १०.८० | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| १८ | बोळकवठे-औराद-होनमुर्गी ते रा.मा. १३ ला जोडणारा रस्ता प्रजिमा १५0 कि.मी. 0/0 ते १४/५00 मध्ये देखभाल दुरुस्ती करणे, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर | बी-१ निविदा | १८.९० | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| १९ | भोगांव मार्डी होनसळ रस्ता प्रजिमा- ३९ कि. मी. 0/00 ते १६/९00 मध्ये वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. ता. उत्तर सोलापूर जि. सोलापूर | बी-१ निविदा | ३४.२ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग अ |
| २० | होटगी स्टेशन-आहेरवाडी बंकलगी-सुलेरजवळगे मुंढेवाडी-अंकलगी रस्ता प्रजिमा ४९ कि.मी. 0/00 ते १४/00 मध्ये देखभाल दुरुस्ती करणे. ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर | बी-१ निविदा | १९.३५ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| २१ | मंद्रुप-निंबर्गी भंडारकवठे रस्ता प्रजिमा ६0 कि.मी. 0/0 ते १६/४00 मध्ये देखभाल दुरुस्ती करणे. ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर | बी-१ निविदा | २५.२ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| २२ | कुंभारी-कर्देहळ्ळी-तोगराळी-यत्नाळ-होटगी मद्रे रस्ता प्रजिमा १४८ कि.मी. 0/0 ते २४/00 मध्ये देखभाल दुरुस्ती करणे, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर | बी-१ निविदा | १३.२३ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| २३ | भंडारकवठे माळकवठे औज (मंद्रूप) ते तद्देवाडी रस्ता प्रजिमा १९९ कि.मी. 0/00 ते २२/६00 मध्ये देखभाल दुरुस्ती करणे, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर | बी-१ निविदा | १५.७५ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| २४ | औज-हिपळे-वळसंग-तिर्थ रस्ता प्रजिमा १४९ कि.मी. 0/0 ते १८/५00 मध्ये देखभाल दुरुस्ती करणे, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर | बी-१ निविदा | १९.०४ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| २५ | टाकळी चिंचपूर बरुर हत्तरसंग कुडल रस्ता प्रजिमा २०२ कि. मी. 0/00 ते ११/00 मध्ये देखभाल दुरुस्ती करणे, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर | बी-१ निविदा | १०.५ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| २६ | (प्रजिमा-४६) ते कुडल देवीकवठे म्हैसलगी खानापूर अंकलगे गुडेवाडी आळगे शेगांव ने मुंढेवाडी प्रजिमा क्र ४९ ला मिळणारा प्रजिमा क्र. ५९ सा.क्र. 0/000 ते ३३/000 मध्ये देखभाल दुरुस्ती करणे. ता. अक्कलकोट जि. सोलापूर | बी-१ निविदा | ११.२५ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| २७ | किणी कुरनूर मोटयाल रस्ता प्रजिमा-१५३ किमी. 0/00 ते १२/00 मध्ये देखभाल दुरुस्ती करणे. ता. अक्कलकोट जि. सोलापूर. | बी-१ निविदा | ११.२५ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| २८ | लवंगी कारकल औज (मंद्रूप) ते कुरघोट रस्ता प्रजिमा १५२ कि.मी. 0/0 ते १४/६00 मध्ये देखभाल दुरुस्ती करणे ता.दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर. | बी-१ निविदा | १८.00 | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग ब |
| २९ | रा.मा. २०५ ते नागोरे इब्राहिमपुर मुगळी ते रा.म. २०५ प्रजिमा क्र.५५ किमी 0/00 ते १३/७00 मध्ये देखभाल दुरुस्ती करणे. ता. अक्कलकोट जि. सोलापूर | बी-१ निविदा | २७.९ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग अ |
| ३० | रा.मा.२०८ ते ब-हाणपूर ते डॉबरजवळगे बोरगांव दर्शनाळ अरळी ते नन्हेगांव हन्नूर चुंगी ते प्रजिमा ५५३ ला मिळणारा प्रजिमा के १५४ सा.क्र.0/000 ते ३0/000 मधी देखभाल दुरुस्ती करणे. ता. अक्कलकोट जि. सोलापूर | बी-१ निविदा | ३६.९९ | सोलापूर जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्था यांचेसाठी फक्त - वर्ग अ |

| | | |
|---|---|---|
| निविदा उपलब्ध कालावधी | :- | दि. ३१/१०/२०२५ (वेळ सकाळी १०.०० वा. पासून) ते ०७/११/२०२५ (सायं.१८.१५ पर्यंत) |
| निविदा पूर्व बैठक | :- | -------------निरंक---------------- |
| तांत्रिक व आर्थिक निविदा सादर करणेचा अखेरचा दिनांक | :- | दि ०७/११/२०२५ (सायं. १८.१५ पर्यंत) |
| मूळ दस्तऐवज सादर करण्याचा अंतिम दिनांक (निविदा शर्त ८.१) | :- | ई-निविदा पोर्टलवर 'बीड लॉक' झाल्यानंतर ७२ तासात 'हार्ड कॉपी' १ प्रतीत कंत्राटदारांनी खालील कार्यालयामध्ये सादर करणे अनिवार्य आहे. **१. मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर** |
| निविदा उघडण्याचा कालावधी ठिकाण व वेळ. | :- | दि. ०८/११/२०२५ मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापुर यांचे कार्यालयात सकाळी ११.०० वाजता. |

१. निविदा सुचनाबाबतची सविस्तर माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
२. कंत्राटदारानी निविदा भरताना लेबर फेडरेशन कडून ना हरकत प्रमाणपत्र घेऊन ऑनलाईनवर अपलोड करणे अनिवार्य आहे. अन्यथा आर्थिक लखोटा उघडणेत येणार नाही.
१) www.mahapwd.gov.in २) www.mahatenders.gov.in
(सदर निविदेसुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर ४१३००३ कार्यालयात सुचना फलक

**सही/-**
**(मनोज रा. ठाकरे)**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर**

## महत्त्वाचे

### मिताली राज, करीना कपूरने केले ट्रॉफी वॉकआउट



**मुंबई** : भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक २०२५ च्या दुसऱ्या उपांत्य सामन्याच्या सुरुवातीला भारताची माजी कर्णधार मिताली राज आणि युनिसेफ इंडियाची राष्ट्रीय राजदूत अभिनेत्री करीना कपूर खान यांनी ट्रॉफी वॉकआउटचे नेतृत्व केले. त्यांच्यासोबत लुब्ना शाह, गौरव शर्मा आणि युनिसेफ इंडिया प्रतिनिधी सिंथिया मॅकक्रॅफ्रे ही दोन मुले होती. आयसीसी-युनिसेफ जागतिक भागीदारी शिक्षण, आरोग्य, पोषण, सुरक्षित पाणी आणि हिंसाचारापासून संरक्षण या सर्व मुलांच्या हक्कांचे, विशेषतः सर्वात असुरक्षित मुलींसाठी, समर्थन करण्यासाठी जगभरातील क्रिकेटच्या पोहोचाचा फायदा घेते. प्रॉमिस टू चिल्ड्रन डिजिटल मोहीम सप्टेंबर २०२५ मध्ये आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषकासाठी सुरू करण्यात आली. भारत आणि कोलंबोमधील सामन्यांच्या ठिकाणी वाढणारी ही मोहीम क्रिकेट चाहते, खेळाडू आणि प्रेक्षकांना सुरक्षित, शिक्षित आणि सक्षम होण्याच्या प्रत्येक मुलाच्या अधिकाराचे समर्थन करण्यासाठी युनिसेफसोबत उभे राहण्याचे आवाहन करते.

### भारत, ऑस्ट्रेलियन खेळाडूंनी दिली ऑस्टिनला श्रद्धांजली

**नवी मुंबई** : भारत आणि ऑस्ट्रेलियाच्या खेळाडूंनी गुरुवारी महिला विश्वचषक उपांत्य सामन्यादरम्यान किशोरवयीन क्रिकेटपटू बेन ऑस्टिनला श्रद्धांजली म्हणून काळ्या हाताच्या पट्ट्या बांधल्या. सराव दरम्यान चेंडू लागून निधन झालेल्या बेन ऑस्टिनला श्रद्धांजली. मंगळवारी मेलबर्नच्या उपनगरातील फर्न्ट्री गली क्रिकेट क्लबमध्ये फलंदाजी करताना १७ वर्षीय ऑस्टिनच्या मानेला दुखापत झाली. त्याने त्याच्या क्लबसाठी सराव करताना हेल्मेट घातले होते ज्यामध्ये नेक गार्ड नव्हता आणि साइड-आर्मने फेकलेल्या चेंडूमुळे तो जखमी झाला. टी-२० सामन्यापूर्वी ऑस्टिन नेटमध्ये वेगवान गोलंदाजांविरुद्ध फलंदाजी करत असताना त्याच्या सहकाऱ्यांसमोर त्याला प्राणघातक झटका बसला.

### पंजाब एफसीने पटकावले पीएसएलचे विजेतेपद

**मोहाली** : पंजाब एफसीने गुरुवारी पंजाब स्टेट सुपर फुटबॉल लीग २०२५ चे विजेतेपद जिंकले. पंजाब एफसीच्या जवळचा प्रतिस्पर्धी शेर-ए-पंजाब स्पोर्ट्स क्लबने सीमा सुरक्षा दल फुटबॉल क्लब विरुद्धच्या आपल्या शेवटच्या सामन्यात गुण गमावले. १७ सामन्यांनंतर पंजाब एफसीचे ३९ गुण आहेत, तर शेर-ए-पंजाब स्पोर्ट्स क्लबचे तेवढ्याच सामन्यांमध्ये ३४ गुण आहेत, ज्यामुळे इतर कोणत्याही संघाला शेर्सच्या बरोबरी करणे अशक्य झाले आहे. हे क्लबचे दुसरे पंजाब स्टेट लीग जेतेपद आहे. यापूर्वी, त्यांनी २०२२-२३ मध्ये आपले पहिले विजेतेपद पटकावले होते. ते २०२४-२५ हंगामात उपविजेतेपदावर राहिले. त्यांच्या विजेतेपदाच्या मालिकेतील एक महत्त्वाचा घटक म्हणजे संघाचा भक्कम बचाव, १७ सामन्यांमध्ये १२ क्लीन शीट्स नोंदवल्या गेल्या आहेत.


### सरदार वल्लभभाई पटेल जयंतीनिमित्त बार्शीत आज 'रन फॉर युनिटी' एकता दौड

**बार्शी, दि. ३० ऑक्टोबर-**

भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त बार्शी शहर पोलीस ठाणे आणि सोलापूर ग्रामीण पोलीस यांच्यावतीने 'रन फॉर युनिटी' एकता दौड स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. हा उपक्रम राष्ट्रीय एकता दिनाच्या औचित्यावर राबविण्यात येत असून, समाजात बंधुत्व, राष्ट्रप्रेम व एकात्मतेचा संदेश देण्याचा उद्देश आहे. ही स्पर्धा शुक्रवार, दि. ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी ७ वाजता बार्शी शहर पोलिस ठाणे येथे आयोजित केली असून या उपक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांच्यावतीने करण्यात आले आहे.

### कासेगावचा पैलवान जयराज चौगुलेला कांस्य

**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**



बेळगाव येथे झालेल्या मिसन ऑलिंपिक फेडरेशन ऑफ इंडियाच्या राष्ट्रीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेत कासेगावच्या जयराज भिमराव चौगुले याने कांस्य पदक संपादिले. त्याचे कासेगाव ग्रामस्थांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

# दक्षिण आफ्रिका अ २ बाद २९९

### जॉर्डन, झुबायर, रुबीनची अर्धशतके




♦ **बंगळुरू, ३० ऑक्टोबर**

येथे गुरुवारपासून भारत अ संघाविरुद्ध सुरु झालेल्या पहिल्या अनाधिकृत कसोटी क्रिकेट सामन्याच्या पहिल्या दिवशी सलामीवीर जॉर्डन हर्मन (७१), झुबायर हामझा (६६) व रुबीन हर्मन (५४) यांच्या अर्धशतकी खेळीच्या बळावर दक्षिण आफ्रिका संघाने पहिल्या डावांत ८५.२ षटकांत ९ बाद २९९ धावा उभारल्या.

भारत अ संघाचा कर्णधार ऋषभ पंतने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. कर्णधाराचा निर्णय योग्य ठरवित भारताच्या मध्यम गती वेगवान गोलंदाज अंशुल कम्बोजने डावाच्या प्रारंभी चौथ्या षटकांत दक्षिण आफ्रिकेला पहिला धक्का दिला. तनुषने सलामी जोडीदार लेसेगो सेनोक्वानेला भोपळा न फोडू देताच तंबूत परत पाठविले. सहा धावांतच पहिला गडी गमावल्यानंतर दक्षिण आफ्रिकेने जोरदार मुसंडी मारली. सलामीवीर जॉर्डन हर्मन व झुबायर हामझाने आपापले अर्धशतक साजरे करत दुसऱ्या गड्यासाठी १३२ धावांची भागीदारी केली. गुरनूर ब्रारने झुबायरला यष्टिमागे झेल देण्यास भाग पाडले. झुबायरने १०९ चेंडूंत ९ चौकार व एका षट्कारासह ६६ धावांची खेळी केली. पुढे जॉर्डनने कर्णधार मार्कीस एकरमन (१८) याच्यासोबत तिसऱ्या गड्यासाठी ३२ धावांची भागीदारी केली. फिरकीपटू तनुष कोटियानने मार्कीसला बाद केल्यानंतर जॉर्डन हर्मनला पायचित करून त्याची घोडदौड रोखली. जॉर्डनने १४१ चेंडूंचा सामना करत ८ चौकारांसह ७१ धावांचे योगदान दिले. पुढे रूबीन हर्नमन व तियान व्हॅन वुरेनने सहाव्या गड्यासाठी ७२ धावांची भागीदारी केली. कोटियानच्या फिरकीला बळी पडण्यापूर्वी रूबीनने ८७ चेंडूंत ६ चौकारांच्या मदतीने ५४ धावांची अर्धशतकी खेळी केली.

पुढे तियान व्हॅन मानव सुतारच्या गोलंदाजीला बळी पडला, त्याचे चार धावांनी अर्धशतक हुकले. तियानने ७५ चेंडूंत ५ चौकार व एका षट्कारसह ४६ धावांची भर घातली. तनुषने प्रेनेलन सुब्रायेनच्या (१) रुपात आपला चौथा बळी मिळविला. खलील अहमदने लुथो सिपमलाचा पायचित केल्यानंतर खेळ थांबला तेव्हा दक्षिण आफ्रिकेने ८५.२ षटकांत ९ बाद २९९ धावा केल्या. त्शेपो मोरेकी चार धावांवर नाबाद राहिला. भारत अ संघाकडून तनुष कोटियानने ४ बळी, मानव सुतारने २ ब ळी, तर खलील अहमद, अंशुल कम्बोज व गुरनूर ब्रारने प्रत्येकी १ बळी टिपला.

(वृत्तसंस्था)

# मी तंदुरुस्त होण्याच्या मार्गावर : श्रेयस

♦ **सिडनी, ३० ऑक्टोबर**



मी तंदुरुस्त होण्याच्या मार्गावर असून दिवसेंदिवस बरा होत आहे, असे भारताचा स्टार फलंदाज श्रेयस अय्यरने गुरुवारी सांगितले.

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात हर्षित राणाच्या गोलंदाजीवर ॲलेक्स कॅरीचा कठीण झेल घेण्याचा प्रयत्न करताना ३० वर्षीय श्रेयस याच्या डाव्या बरगडीच्या खालच्या भागात दुखापत झाली होती.

मी सध्या बरे होण्याच्या प्रक्रियेत आहे आणि दररोज बरा होत आहे, असे अय्यरने दुखापतीनंतर पहिल्यांदाच आपल्या एक्स आणि इंस्टाग्राम अकाउंटवर पोस्ट केले.

मला मिळालेल्या सर्व शुभेच्छा व पाठिंबा पाहून मी मनापासून आभारी आहे, असे तो म्हणाला.

भारताचा एकदिवसीय उपकर्णधार अय्यर सुरुवातीला फिजिओच्या मदतीने मैदानाबाहेर गेला होता, परंतु नंतर त्याची प्रकृती खालावली कारण त्याचे महत्त्वाचे पॅरामीटर्स घसरले आणि तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले.

त्यानंतरच्या चाचण्यांमध्ये प्लीहामध्ये जखम झाल्यामुळे अंतर्गत रक्तस्त्राव झाल्याचे दिसून आले, त्यानंतर त्यांना जवळून निरीक्षणासाठी आयसीयूमध्ये दाखल करण्यात आले.

अय्यरची प्रकृती स्थिर झाली आहे आणि त्यांना अतिदक्षता विभागात (आयसीयू) हलवण्यात आले आहे, अशी पुष्टी बीसीसीआयने मंगळवारी केली होती.

(वृत्तसंस्था)

# राज्य धनुर्विद्या स्पर्धेत साखरे बंधूची कामगिरी

**नमला ३ सुवर्ण, १ ब्राँझ; नयनला सांघिक सुवर्ण**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**




राज्य शालेय धनुर्विद्या स्पर्धेत धनुर्धर अकॅडमीच्या नमन व नयन साखरे बंधूनी ५ पदकांची कमाई केली. नमनने रिकर्वमध्ये ओव्हर ऑल, मिक्स व एलिमेशमध्ये ३ सुवर्ण व १ ब्राँझ अशी ४ पटकाविली. नयनने सांघिक कपाउंड गटात सुवर्ण पटकाविले. नमनची या कामगिरीवर महाराष्ट्र संघात निवड झाली. शालेय राष्ट्रीय स्पर्धा वाराणसी येथे होणार आहेत. हे दोघे इंडियन मॉडेल स्कूल सीबीएसईचे विद्यार्थी आहे. त्यांना प्रशिक्षक दिपक चिकणे, स्कूलचे क्रीडा शिक्षक राजकुमार माने, सचिन धवन यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे अकादमीचे मार्गदर्शक प्रा संतोष गवळी, सचिन गायकवाड यांनी अभिनंदन केले.

# भारत विजय मिळविण्यास उत्सुक

**भारत-ऑस्ट्रेलिया दुसरा टी-२० सामना**

**स्थळ** : मेलबर्न क्रिकेट मैदान, मेलबर्न
**वेळ** : दुपारी १.४५ वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

♦ **मेलबर्न, ३० ऑक्टोबर**

भारत आणि ऑस्ट्रेलियातदरम्यानच्या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील कॅनबरा येथील पहिला सामना पावसामुळे रद्द करण्यात आल्यानंतर दोन्ही संघ शुक्रवारी दुसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यासाठी सज्ज झाले आहे. दोन्ही संघ विजय नोंदवण्यास उत्सुक झाले असतील.

कॅनबेरामधील सामना पूर्णत्वास गेला नसला तरीही कर्णधार सूर्यकुमार यादवला फलंदाजीचा सूर गवसल्याचा संघ व्यवस्थापनाला आनंद वाटतो. सूर्यकुमारने २४ चेंडूत ३९ धावा ठोकून फॉर्ममध्ये पुनरागमन केले आणि जोश हेझलवुडला मारलेला १२५ मीटरचा षटकार दीर्घकाळ स्मरणात राहील. अभिषेक शर्मा, तिलक वर्मा आणि शिवम दुबे यांसारखे युवा खेळाडूही फटकेबाजी करण्यास उत्सुक असतील.


मिचेल मार्श


सूर्यकुमार यादव

तथापि, कॅनबेरामध्ये पावसाचा निर्णय अंतिम होता व सामना रद्द करण्यात आला होता, तेव्हा भारताची ९.४ षटकांनंतर १ बाद ९७ अशी स्थिती होती. सूर्यकुमार व शुभमन गिल दोघेही ऑस्ट्रेलियन आक्रमणाची धार बोथट करण्याच्या मनस्थितीत होते.

मेलबर्नमध्ये शुक्रवारीही पावसाचा अंदाज आहे, परंतु त्याची तमा न बाळगता भारतीय संघाला मालिकेतील पहिल्या सामन्यात जिथे थांबले होते, तिथून पुन्हा सुरुवात करण्याचा प्रयत्न करावा लागेल. या दुसऱ्या सामन्यासाठी सूर्यकुमारला फॉर्म गवसल्याचे बघून संघ व्यवस्थापनाला आनंद झाला असेल. मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरने राबवलेल्या उच्च-जोखीमपूर्ण पद्धतीसह विश्वचषकाच्या मार्गावर सुरू आहे.

गंभीरला भारतीय संघाने नियमितपणे २५०, २६० पेक्षा जास्त धावा कराव्यात अशी इच्छा आहे. गत काही महिन्यांत भारतीय खेळाडूंनी केलेली तडाखेबंद फलंदाजी ही स्पष्टपणे दर्शवते की भारत व श्रीलंकेत होणाऱ्या टी-२० विश्वचषकाच्या काही महिन्यांपूर्वी फलंदाजांनी गंभीरच्या तत्वज्ञानाचा स्वीकार केला आहे. या सामन्यात भारतीय संघ गत उन्हाळ्यात अमेरिकेत जिंकलेल्या विजेतेपदाचे रक्षण करण्याचा प्रयत्न करेल. भारताला कॅनबेरा येथे गोलंदाजी करण्याची संधी मिळाली नाही परंतु त्या विभागाचा विचार केला तर, भारताकडे जसप्रीत बुमराहचा दर्जा आणि वरुण चक्रवर्तीची युक्ती आहे. कुलदीप यादव आणि अक्षर पटेलसारखे गोलंदाज एक शक्तिशाली आक्रमण तयार करतात. तरीही भारतीय गोलंदाजांना मिचेल मार्श आणि ट्रॅव्हिस हेडविरुद्ध प्रभावी कामगिरी करावी लागेल.

ऑस्ट्रेलियाचा टी-२० संघ आक्रमक क्रिकेट खेळण्यावर प्रामुख्याने लक्ष केंद्रित करतो. हेड, मार्श, मार्कस स्टोइनिस, टिम डेव्हिड व जोश इग्लिस सारख्या खेळाडूंमध्ये मोठी धावसंख्या उभारण्याची क्षमता आहे, तेव्हा भारतीय संघालाही आक्रमक पवित्रा घ्यावा लागेल.

वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्क टी-२० मधून निवृत्त होत आहे आणि पॅट कमिन्स दुखापतीतून सावरत आहे, त्यामुळे गोलंदाजीचा अनुभव थोडा कमी दिसत आहे. झेव्हियर बार्टलेट, मॅथ्यू कुहनेमन व नॅथन एलिसचा समावेश असलेल्या आक्रमणाचे नेतृत्व करण्याची जबाबदारी हेझलवूडवर आहे.

(वृत्तसंस्था)



# हरीभाई देवकरण, संगमेश्वर कॉलेज अंतिम फेरीत

**शालेय शहर क्रिकेट स्पर्धा : ह.देच्या आदित्य तमनूरचे शानदार शतक**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**

शालेय शहर क्रिकेट स्पर्धेत १९ वर्षाखालील मुलांच्या गटात ह. दे. व संगमेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाने अंतिम फेरीत प्रवेश केला.

हरिभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर ही स्पर्धा सुरू आहे. या स्पर्धेत शहरातील १५ संघांनी भाग घेतला आहे. गुरुवारी झालेल्या उपांत्य सामन्यात हरिभाई देवकरण कनिष्ठ महाविद्यालयाने एच. एन. कनिष्ठ महाविद्यालयाचा पराभव केला. यात ह.दे.च्या आदित्य तमनूर (१०१) याने शानदार शतक झळकाविले. दुसऱ्या उपांत्य सामन्यात संगमेश्वर महाविद्यालयाने निर्मलाताई ठोकळ कनिष्ठ महाविद्यालयावर विजय मिळविला.

या प्रसंगी सोलापूर महानगरपालिका सहाय्यक आयुक्त मनीषा मगर यांनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. यावेळी महानगरपालिका क्रीडा अधिकारी, श्रीकांत घोलप, ह.दे. कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य शांतप्पा कुंभार, पर्यवेक्षक औदुंबर सर्वगोड, अप्पासाहेब राऊत, राहुल हजारे, संतोष खेंडे, प्रमोद चुंगे, प्रकाश कंपली व अक्षय गवळी आदी उपस्थित होते.

# क्रिकेटपटूंसाठी अपघात विमा योजना सुरू

**सोलापूर जिल्हा क्रिकेट संघटनेचा अभिनव उपक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन आयोजित आमंत्रित स्पर्धेसाठी सोलापूर जिल्हा क्रिकेट संघटनेचा १४ वर्षाखालील संघ पुण्याकडे रवाना झाला असून हे सामने ३० ऑक्टोबर ते ८ नोव्हेंबर या कालावधीत पुणे येथे होणार आहेत. या संघातील खेळाडू व एका पालकांचा दोन लाख रुपयांचा विमा सोलापूर जिल्हा क्रिकेट संघटनेकडून उतरविण्यात आला आहे.

सोलापूर जिल्हा क्रिकेट संघटनेने महाराष्ट्रात प्रथमच खेळाडूंसाठी अशी योजना सुरू केली असून या योजनेत हॉस्पिटलचा संपूर्ण खर्च समाविष्ट आहे. त्याचा चेक ओरियंटल इन्शुरन्सचे एजंट जॉय म्हेत्रस यांना देण्यात आला. हा चेक सुपूर्द करताना सोलापूर शहर भाजपचे माजी अध्यक्ष नरेंद्रजी काळे यांच्या हस्ते देण्यात आला. याप्रसंगी प्रकाश भुतडा, सचिव चंद्रकांत रेंबर्सू, सुनील मालप, निलेश गायकवाड आदी उपस्थित होते. सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे चेअरमन रणजीतसिंह मोहिते पाटील, अध्यक्ष दिलीप माने, व्हाईस चेअरमन श्रीकांत मोरे, सचिव खासदार धैर्यशील मोहिते पाटील, सहसचिव चंद्रकांत रेंबर्सू आणि खजिनदार संतोष बडवे उपाध्यक्ष प्रकाश भुतडा, मुकुंद जाधव, नितीन देशमुख, यांच्या संकल्पनेतून संघटनेतर्फे खेळाडूंच्या हितासाठी विविध नवनवीन योजना राबविण्यात येत आहेत. त्यातील हा एक महत्वाचा उपक्रम आहे.



### ४२८ खेळाडूंमधून २२ जणांचा संघ जाहीर

जिल्हा संघ निवडीसाठी जुळे सोलापूर येथील भंडारी मैदानावर निवड चाचणी झाली. यात शहर व जिल्ह्यातील ४२८ खेळाडू सहभागी झाले होते. यातून अंतिम २२ जणाचा संघ अप्पू गोटे, राजू रंगम व नीलेश गायकवाड या निवड समितीने निवडला. **संभाव्य संघ :** विहान येवणकर, आनंद शेंडे, अभिषेक देशमुख, श्रीराज कबाडे, आर्यन हंगे, यश लोंढे, रुद्र चौगुले, कार्तिक पाटोळे, रणवीरसिंग बोमरा, ऋग्वेद पाटील, अनुज वाल्मिकी, अविर पवार, गौरव गाडेकर, निमिष काळेल, सम्राट बोबडे, कृष्णराज देशमुख, हर्ष जगताप, तन्मय घोडके, विराज सलगर, श्लोक आनंद, ध्रुव शिंदे, संस्कार गवळी. प्रशिक्षक : नीलेश गायकवाड.

# जिल्हा क्रीडा संकुलातील १३ कोटी रुपयांचे काम संथ गतीने

**कामाची पुण्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या टीमची पाहणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**

कुमठा नाका येथील जिल्हा क्रीडा संकुलात सुरू असलेल्या १३ कोटी रुपयांच्या कामास सुरवात झाली असून हे काम संथ गतीने सुरू आहे. चार डिसेंबरला २०२४ला स्पोर्टस् फॅसिलिटीज कंपनी प्रायव्हेट लिमिटेडला हा ठेका दिला असून यातून ४०० मीटरचा सिंथेटिक ट्रॅक, बॅडमिंटन इनडोअर हॉल नुतनीकरण, मुला- मुलींची वसतीगृहाचे नुतनीकरण व अंतर्गत रस्ते ही कामे सुरू आहेत. दोन महिने राहिले तरी ५० टक्केही काम झाले नाही. त्यामुळे ही काम जलद गतीने करावे, असे पत्र जिल्हा क्रीडा कार्यालयाने सार्वजिनिक बांधकाम विभागास दिले आहे.

दरम्यान या सर्व कामाची पाहणी दक्षता व गुन्हा नियंत्रण पुणे विभागाचे अधिक्षक अभियंता संजय माळी व त्यांची टीमने ही पाहणी केली. यावेळी कार्यकारी अभियंता मनोज ठाकरे, मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी दत्तात्रय वरकड आदी उपस्थित होते.



**सोलापूर : जिल्हा क्रीडा संकुलातील अंतर्गत रस्त्याची पाहणी करताना पुणे विभागाच्या दक्षता व गुन्हा नियंत्रण विभागाचे अधिक्षक अभियंता संजय माळी व त्यांची टीम. यावेळी कार्यकारी अभियंता मनोज ठाकरे, मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी दत्तात्रय वरकड.**



### रानवेध, आम्ही मंद्रूपकर टीमतर्फे क्रिकेट पंच असोसिएशनचे अध्यक्ष टेळे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**

सोलापूर जिल्हा क्रिकेट पंच असोसिएशनच्या अध्यक्षपदी नंदकुमार टेळे यांची निवडीबद्दल आम्ही मंद्रूपकर व रानवेध फाउंडेशन तर्फे सत्कार करण्यात आला. या सत्कार सोहळ्यास जगन्नाथ खरात, सचिन साठे, रवी केवटे, रसुल शिकलगार, उदय देशपांडे, नितीन खराडे, मामा खांडेकर, विनोद कामतकर आदी उपस्थित होते. मंद्रूपचे श्री. टेळे हे जिल्हास्तरीय संघटनेचे नेतृत्व करण्यासोबत नवोदीत खेळाडू, पंच घडविण्यासाठी करीत असलेल्या प्रयत्नांमुळे मंद्रूपकरांचा गौरव होतोय, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. पंचांच्या गुणवत्ता वृद्धीसाठी प्रशिक्षण उपक्रम राबवण्याचा संकल्प असल्याचे अध्यक्ष श्री. टेळे यांनी सांगितले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# निधीच्या अनियमिततेबद्दल खासदार प्रणिती शिंदेंनी आयुक्तांना विचारला जाब

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर -**

शहरातील नॅशनल क्लीन एअर प्रोजेक्टच्या अंमलबजावणीत गंभीर गैरव्यवस्था, पारदर्शकतेचा अभाव आणि प्रशासनातील निष्काळजीपणा असल्याचे निदर्शनास आणून खासदार प्रणिती शिंदे यांनी सोलापूर महानगरपालिकेला पत्राद्वारे जाब विचारला आहे.



खासदार शिंदे यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे की, सोलापूर शहरात नॅशनल क्लीन एअर प्रोग्रमच्या अंमलबजावणीत गंभीर त्रुटी आणि अनियमितता दिसून येत आहे. विशेषतः या कार्यक्रमांतर्गत मंजूर झालेल्या निधीचा वापर, प्रक्रियेतील पारदर्शकता आणि सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींच्या सहभागाच्या अभावाबाबत गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे. महानगरपालिकेच्या प्रशासकीय प्रमुख म्हणून, या अंमलबजावणीची जबाबदारी ही आपली आहे. तथापि, निधीचा वापर कसा आणि कुठे करण्यात आला याबाबत माहिती अत्यंत अस्पष्ट असून, नागरिकांना वा लोकप्रतिनिधींना याची पुरेशी कल्पना दिली गेलेली नाही. यामुळे निधीच्या प्रभावी वापराबाबत प्रश्न निर्माण होत आहेत. विशेषतः सत्ताधारी पक्षाच्या आमदारांच्या प्रस्तावांना प्राधान्य देऊन, इतर पक्षांच्या प्रतिनिधींच्या सूचना दर्लक्षित केल्या जात असल्याचे आढळून आले आहे. ही प्रवृत्ती लोकशाही प्रक्रियेच्या विरोधात आहे. मी हा विषय लोकलेखा समितीसमोर मांडलेला असून, नियंत्रक व महालेखा परीक्षक यांच्यामार्फत सोलापूर मधील प्रकल्पांचे कार्यक्षमतेचे लेखापरीक्षण करण्यात यावे, अशी औपचारिक मागणी केलेली आहे. सार्वजनिक निधीचा अपव्यय टाळणे आणि कार्यक्रमाचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवणे ही आपल्या प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. या बाबींकडे गांभीर्याने लक्ष दिले गेले नाही, तर संसदेत आवश्यक ती कार्यवाही करण्याची मागणी खा. शिंदे यांनी केली आहे.

# पांढरा कांदा खातोय जास्त भाव

## बाजार समितीत आवकसह कांद्याचे दर घसरललेच; शेतकरी बनला हवालदिल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० ऑक्टोबर**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत मागील चार दिवसांत ६०० ट्रकहून अधिक कांदा विक्रीसाठी आला आहे. गुरुवारी सुमारे १५ हजार ३३१ क्विंटल लाल तर १ हजार २०२ क्विंटल पांढरा कांदा विक्रीसाठी आला होता. गतवर्षीच्या तुलनेत आवक खूप कमी असताना देखील भाव वाढलेले नाहीत. सध्या कांद्याला सोलापूर बाजार समितीत प्रतिक्विंटल नऊशे ते अकराशे रुपयांपर्यंत सरासरी भाव मिळत आहे.

दरम्यान, मागील तीन वर्षांत ऑक्टोबर, नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यात सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत सुमारे १५ हजार गाड्या कांदा विक्रीसाठी आल्याचे पाहायला मिळाले. पण, यंदाच्या अतिवृष्टी व पुरामुळे सोलापूर बाजार समितीतील कांद्याची आवक घटली आहे. सरासरी भाव देखील मागील सहा महिन्यांपासून दीड हजारांवर गेलेला नाही. सोलापूर, बीड, धाराशिव, पुणे, नाशिक या जिल्ह्यातील कांद्याचे हजारो हेक्टर क्षेत्र अतिवृष्टी व पुरामुळे बाधित झाले आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील कांदा अजूनही अपेक्षेप्रमाणे बाजार समितीत आलेला नाही. सांगली, कर्नाटक, बीड येथून कांदा येऊ लागल्याचे बाजार समितीतील अधिकाऱ्यांनी सांगितले. सध्या सोलापूर बाजार समितीत लाल कांद्याला किमान १०० रुपये आणि जास्तीत जास्त २२०० रुपयांपर्यंत भाव मिळत आहे. सरासरी भाव ९५० ते १०५० रुपयांपर्यंत आहे. दुसरीकडे पांढऱ्या कांद्याला प्रतिक्विंटल २०० रुपये ते ३२०० रुपयांपर्यंत भाव आहे. दोन दिवसांपूर्वी पांढऱ्या कांद्याला सरासरी १७०० रुपये भाव होता, तो आता दोनशे रुपयांनी कमी झाला आहे. तर लाल कांद्याचा सरासरी भाव देखील १०० रुपयांनी उतरला आहे.

बाजार समितीत पांढरा कांद्याची आवक कमी असल्याने मागणी वाढवून दर तेजीत असल्याचे दिसत आहेत. गुरुवारी देखील पांढऱ्या कांद्याला लाल कांद्यापेक्षा जास्त दर मिळाला. २०० ते ३००० सरासरी १४५० प्रतिक्विंटल असा दर पांढऱ्या कांद्याला राहिला. तर लाल कांद्याची गुरुवारी सुमारे १५,३३१ क्विंटल इतकी आवक बाजारपेठेत दाखल झाली होती. त्याला १०० ते २००० सरासरी ९५० प्रति क्विंटल असा दर मिळाला.

### शेतकरी संकटाच्या चक्रव्यूहात

सोयाबीन, उडदास अपेक्षित हमीभाव नाही. कांद्यालाही समाधानकारक भाव मिळत नाही. दुसरीकडे उसाची एफआरपी एकरकमी मिळत नाही. अतिवृष्टी व पुरात पिकांचे मोठे नुकसान झाले, तरी सरकारकडून भरपाई देखील मिळालेली नाही. डोक्यावर बँकांचे कर्ज आहे, ते फेडायचे कसे हा प्रश्न आहे.

### तीन दिवसांतील कांदा अन् सरासरी भाव

| दिवस | आवक (ट्रक) | सरासरी भाव |
|---|---|---|
| सोमवार | २२३ | १२०० |
| मंगळवार | १५३ | ११०० |
| बुधवार | १९७ | १०५० |



# पूरग्रस्त विद्यार्थ्यांसाठी क्रेडाईने एक हजार शैक्षणिक साहित्य संचांचे केले वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**

पूरबाधित विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांसाठी क्रेडाई महाराष्ट्रच्या वतीने क्रेडाई सोलापूर कडून १००० शैक्षणिक साहित्य संचांचे वाटप करण्यात येत आहे. या उपक्रमाचा प्रातिनिधिक स्वरूपात वितरण कार्यक्रम जिल्हा परिषद सोलापूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या हस्ते गुरूवारी जिल्हा परिषद शाळा तिऱ्हे येथे संपन्न झाला.

यावेळी जिल्हा शिक्षणाधिकारी कादर शेख, क्रेडाई सोलापूर अध्यक्ष अभिनव साळुंखे, उपाध्यक्ष आनंद पाटील, सचिव राजीव दीपाली, माजी अध्यक्ष अभय सुराणा तसेच क्रेडाई महाराष्ट्र उपाध्यक्ष शशिकांत जिद्दीमनी, व क्रेडाई नॅशनल चे कार्यकारिणी सदस्य सुनील फुरडे आदी उपस्थित होते.

या उपक्रमांतर्गत पूरग्रस्त परिसरातील जिल्हा परिषद शाळांमधील पुरबाधित विद्यार्थ्यांना शालेय साहित्य संच दप्तर, १२ वह्या, कंपास बॉक्स, चित्रकला वही, २ पेन व पॅड आदी वस्तूंचे वाटप करण्यात येणार आहे. या माध्यमातून पूरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक प्रवासात नवसंजीवनी मिळावी, हा क्रेडाईचा उद्देश आहे. कार्यक्रमादरम्यान क्रेडाई सोलापूरचे अध्यक्ष अभिनव साळुंखे सांगितले की, ''वास्तू विकासाबरोबरच सामाजिक जबाबदारी पार पाडणे हेही आमचे कर्तव्य आहे. शिक्षणाला आधार देणे म्हणजे भविष्याला दिशा देणे.

# डॉ. सुरेश शेळकेंना महाराष्ट्र गौरव पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ३० ऑक्टोबर-**



आनंद युनिवर्स फाउंडेशन, पुणे यांच्यावतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय महाराष्ट्र गौरव पुरस्कार बार्शी तालुक्याचे सुपुत्र आशा केंद्राचे कार्यकारी विश्वस्त तसेच एस. एस.ग्रो एजन्सीचे संस्थापक डॉ. सुरेश शेळके यांना नुकताच जाहीर झाला.

आनंदी युनिवर्स फाउंडेशनच्यावतीने प्रत्येक वर्षी विविध क्षेत्रात काम करणाऱ्या कर्तुत्वान व्यक्तीचा सन्मान सोहळा संस्थेच्यावतीने करण्यात येते असतो. त्यात बार्शी तालुक्याचे सुपुत्र डॉ. सुरेश शेळके यांचाही समावेश आहे. आशा केंद्राच्या माध्यमातून आरोग्य व सामाजिक क्षेत्रात विविध प्रश्नावर काम करुन काम सुरु आहे. तसेच एस. एस.ग्रोच्या माध्यमातून शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन व शेतीच्या प्रश्नावर प्रभावी कामगिरी केल्यामुळे याचा फायदा अनेक सामान्य व्यक्ती व शेतकऱ्यांना झाला. त्यामुळे डॉ. सुरेश शेळके यांच्या कार्याची दखल घेत आनंदी युनिवर्स फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश विटेकर यांनी घेतली आणि राज्यस्तरीय महाराष्ट्र गौरव पुरस्कार याची घोषणा केली. हा पुरस्कार प्रदान सोहळा पुणे येथे पंडित जवाहरलाल नेहरु सभागृह, घोले रोड, शिवाजीनगर येथे दि. १० डिसेंबर रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत डॉ. सुरेश शेळके यांना प्रदान करण्यात येणार आहे. असे संस्थेचे अध्यक्ष यांनी सांगितले.

# बार्शीतून अल्पवयीन मुलगी बेपत्ता

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३० ऑक्टोबर-**

बार्शी तालुक्यातील एका गावातील १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी बेपत्ता झाली आहे. तिच्या ब्युटी पार्लरमध्ये सापडलेल्या चिठ्ठीने कुटुंबीयांमध्ये खळबळ उडाली असून, वडिलांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. अज्ञात व्यक्तीने फसवून पळवल्याचा संशय असून, विहिरीतील शोध मोहिमेतही तिचा ठावठिकाणा लागला नाही.

शेतकरी वडील (वय ४५) यांच्या कुटुंबात पत्नी, मुलगा व तीन मुली असे एकत्र राहतात. वडील शेती करतात, तर आई बार्शी येथे ब्युटी पार्लर चालवतात. लापता मुलगी १२ वीत शिकत असून, तिचे वय १७ वर्षे ८ महिने ८ दिवस आहे.




२७ ऑक्टोबर रोजी सकाळी ६.४५ वाजता वडिलांनी तिला सौंदरे येथील बस स्टॉपवरुन बार्शी येथील क्लासेससाठी सोडले. तेथून ती बार्शी बसने जाणार होती. सकाळी १०.३० वाजता आईंना पार्लरसाठी सोडण्यासाठी वडील पुन्हा सौंदरे गेले. मुलगी नेहमी दुपारी ११ वाजता गावातील बस थांब्यावर येत असे, पण १२ वाजेपर्यंत न आल्याने वडिलांनी आईंना फोन केला. आईंनी बसस्टँडवर शोध घेतला, पण ती सापडली नाही. काही वेळाने आईंनी सांगितले की, पार्लरमध्ये मुलीने लिहिलेली चिठ्ठी सापडली. चिठ्ठीत 'पुलाजवळच्या विहिरीत उडी मारुन जीव देणार' असा मजकूर होता. वडील बार्शीला धावले. विहिरीजवळ मुलीची शाळेची बॅग व फोटो सापडला. लगेच बार्शी शहर पोलीस ठाण्यात चिठ्ठी दाखवली. शहर पोलिसांनी तत्परता दाखवत पोलीस, अग्निशमन दल व नगरपालिका कर्मचाऱ्यांनी सांगितलेल्या ठिकाणच्या विहिरीतील पाणी काढून शोध घेतला, तरी मुलगी सापडली नाही.

वडिलांच्या तक्रारीनुसार, सकाळी ६.४५ ते दुपारी १२ या वेळेत हिस संकेश्वर बोल, बेदराई विहिरीजवळील पार्लरमधून अज्ञात व्यक्तीने फसवून पळवले. 'माझ्या संमतीशिवाय फूस लावून नेले', असे म्हटले आहे. पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला. सीसीटीव्ही, बसस्टँड चौकशी, मोबाइल लोकेशन तपास सुरु आहे. मुलीचा फोन बंद आहे. पोलीस तपास सुरू आहे.



# पालिकेतून भाजपला हद्दपार करण्यासाठी समविचारी पक्षाची आघाडी करा

**आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पदाधिकाऱ्यांना शरद पवार यांच्या सूचना**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० ऑक्टोबर-**

आगामी स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पक्षाध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत मुंबईत बैठक झाली. यात महापालिकेतून भाजपला हद्दपार करण्यासाठी समविचारी पक्षाची आघाडी करण्याचे आदेश दिले आहेत. स्थानिक पातळीवर कोणताही निर्णय घ्या. प्रदेश पातळीवरून आपल्यास सहकार्य मिळेल.

सोलापूर जिल्ह्याचे प्रभारी माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या समवेत समन्वय ठेऊन निर्णय घेण्याचे आदेश दिल्याची माहिती माजी महापौर यु.एन. बेरिया यांनी दिली. शहरातील राजकीय परिस्थितीचा आढावा पवार यांनी घेतला. बेरीया यांनी २०२५ मध्ये आगामी निवडणुकीसाठी कोणत्या उपाय योजना करावी लागणार यांची माहिती दिली. तरमहाविकास आघाडीसमवेत जागा वाटप करताना ज्यांची ज्या भागात ताकत आहे, त्यानुसार जागा वाटप करण्याचे मुद्दे मांडले. त्यावर शरद पवार यांनी सोलापूर महानगरपालिकेत भाजप हद्दपार करण्यासाठी शहरातील इतर समविचारी पक्षाशी आघाडी करा, असे आदेश दिल्याचे बेरिया यांनी सांगितले. या बैठकीस राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार सुप्रिया सुळे, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, सोलापूर जिल्ह्याचे प्रभारी माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, आमदार एकनाथ खडसे, माजी मंत्री बाळासाहेब पाटील, आमदार जितेंद्र आव्हाड, जिल्हाध्यक्ष वसंत नाना देशमुख, जिल्हा कार्याध्यक्ष रवि पाटील तर सोलापूर माढ्याचे आमदार अभिजित पाटील तसेच सोलापूर शहरातून माजी महापौर यु. एन. बेरिया, माजी शहराध्यक्ष महेश गादेकर, भारत जाधव आदी उपस्थित होते.

# विकासकांना आता कर आकारणीच्या एनओसीची गरज नाही : डॉ. ओम्बासे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि. ३० आक्टोबर-**

शहरात आता एका जागेवर विकास करताना त्या विकास प्रकल्पासाठी विकासाकांना प्राथमिक किंवा अंतिम लेआउट मंजुरीसाठी द्यावे लागणारे महापालिका कर आकारणी विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र लागणार नाही. गुरुवारी क्रेडाईच्या बैठकीत हा आदेश पालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांनी दिले. यामुळे आता नगर रचना विभागातील मंजुरी प्रक्रिया अधिक सुलभ व वेगवान होणार असून, विकासकांना आवश्यक असलेली प्रशासनिक स्पष्टताही प्राप्त होईल.

पालिकेतील नगर रचना विभागामार्फत विविध विकास प्रकल्पांसाठी प्राथमिक-अंतिम रेखांकन (लेआउट) मंजुरीची कार्यवाही करताना आतापर्यंत संबंधित मिळकतीसाठी कर आकारणी विभागाकडील एनओसी सादर करण्याची अट लागू होती. परंतु नगर रचना विभागाकडे सादर होणारे बहुतेक रेखांकन प्रस्ताव हे मूळतः शेतजमिनींवरील असतात. प्राथमिक रेखांकन मंजूर झाल्यानंतरच त्या ठिकाणी मूलभूत सोयीसुविधा उभारल्या जातात आणि त्यानंतरच संबंधित जमिनीचे अंतिम रेखांकन मंजूर केले जाते. त्यामुळे, अंतिम रेखांकन मंजूर होईपर्यंत ती जमीन प्रत्यक्ष वापरात नसते व त्यावर कर आकारणी करणे आवश्यक ठरत नाही. यामुळे यापुढे अंतिम रेखांकन मंजूर झाल्यानंतर विकासक स्वतः च्या नावाने संबंधित मालमत्तेची कर आकारणी करून घेतील. तसेच विक्री केलेल्या भूखंडांच्या बाबतीत संबंधित भूखंडधारक महापालिकेच्या कर आकारणी विभागाकडे नोंदणी करून त्यानुसार कर आकारणी करून घेतील. या अनुषंगाने प्राथमिक किंवा अंतिम लेआउट प्रक्रियेसाठी प्रस्ताव सादर करताना विकासकांना कर आकारणी विभागाकडील ना हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक नाही, असे डॉ. ओम्बासे यांनी स्पष्ट निर्देश दिले आहेत.

# ग्राहकांचा विश्वास हीच लोकमंगलची ताकद

## आ. सुभाष देशमुख; सांगोल्यात लोकमंगल बँक व पतसंस्थेचा दिवाळी फराळ

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ३० ऑक्टोबर-**

लोकमंगल समुहाच्या प्रत्येक संस्थेवर ग्राहकांचा असलेला विश्वास हीच लोकमंगलची खरी ताकद असल्याचे प्रतिपादन माजी सहकार मंत्री लोकमंगल समुहाचे संस्थापक आ. सुभाष देशमुख यांनी केले. ते सांगोला येथील लोकमंगल बँक व पतसंस्थेच्यावतीने आयोजित दिवाळी फराळ व स्नेहसंवाद कार्यकमात बोलत होते. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बँकेचे संचालक विजय कुलकर्णी होते.

यावेळी बँकेचे सल्लागार व लोकमंगल पतसंस्थेचे संचालक ॲड. गजानन भाकरे यांनी लोकमंगल समुहाच्यावतीने राबविण्यात येणा-या सामुदायीक विवाह सोहळा, निराधारांना मोफत घरपोच डबे, अन्नपुर्णा योजना, समृद्ध गाव योजना, वृक्ष लागवड आदी विविध उपक्रमांची माहिती दिली. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त करून लोकमंगल समुह व आ.सुभाष देशमुख यांचेवर विश्वास व्यक्त केला. प्रास्ताविकात बँकेचे सांगोला शाखा व्यवस्थापक ॲड. शिवाजी दरेकर यांनी बँकेच्या प्रगतीचा अहवाल सादर करून विविध कर्ज योजना, पर्यटन सप्ताह याची माहिती दिली. याप्रसंगी मोठ्या संख्येने ग्राहक उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बँक कर्मचारी सुहास वालिकर, पृथ्वीराज पवार, विजय स्वामी, ज्योती गुळमिरे, सागर महामुनी, पतसंस्थेचे विभागीय अधिकारी वैभव लांबोरे, शाखा अधिकारी दत्तात्रय दिवसे, ऐश्वर्या दौंडे, स्नेहल साळुंखे, विकास खुळपे, साहिल काळे, फडके यांनी परिश्रम घेतले.



> लोकमंगल बँक, लोकमंगल पतसंस्था व लोकमंगल मल्टीस्टेट सोसायटी या तिन्ही वित्तीय संस्थानी अर्धा महाराष्ट्रभर विस्तार केलेला आहे. राज्य शासन, केंद्र शासन व भारतीय रिझर्व्ह बँक यांच्या मार्गदर्शक तत्वांचे नियमित व कडक पालक करून आर्थिक शिस्त ठेऊन कामकाज करीत आहोत. त्यामुळे लोकमंगल समुहाने ग्राहकांचा विश्वास संपादीत केलेला आहे.
> **- आ. सुभाष देशमुख,**
> संस्थापक, लोकमंगल समूह



# इर्लें येथे सागवानाची १८ झाडे मोडल्याने अज्ञाता विरोधात गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ३० ऑक्टोबर-**

कोरफळे येथील द्राक्ष बागेची घटना ताजी असतानाच इर्लें येथील एका शेतकऱ्याची सागवान झाडे अज्ञात इसमाने मोडून टाकल्यामुळे शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे. एकाच आठवड्यात दोन घटना घडल्यामुळे विकृत वृत्ती वाढू लागल्याचे दिसून येत आहे.

याप्रकरणी वैराग पोलीस ठाण्यात अज्ञाताच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत वैराग पोलिसांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, इर्लें येथील गट क्रमांक तीनशे आठ पैकी एक मध्ये उत्कर्ष आनंदकुमार डुरे यांची चार एकर जमीन आहे यामध्ये दीड वर्षांपूर्वी दोन एकर क्षेत्रावर ती सागवान झाडांची लागण करण्यात आली आहे. सुमारे सहाशे झाडे असलेल्या या शेतातील अज्ञात इसमाने अठरा झाडे मोडून टाकून सुमारे एक लाख रुपयांचे नुकसान केले आहे. याप्रकरणी वैराग पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## निधन वृत्त...

### गोदाबाई जाधव



**वेळापूर, दि. ३० ऑक्टोबर-**

मळोली (ता. माळशिरस) येथील गोदाबाई एकनाथ जाधव यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे, परंतुडे असा परिवार आहे. त्या ज्ञानेश्वर माऊली व श्रीमंत जाधव यांच्या आई तर पत्रकार प्रा. अभिजीत जाधव यांच्या त्या आज्जी होत.

### झेड. ए. शेख



**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**

एम ए पानगल उर्दू शाळेतील निवृत इंग्रजी शिक्षिका झेड.ए. शेख उर्फ जुबेदा आपा यांचे २९ ऑक्टोबर रोजी वयाच्या ९० व्या वर्षी निधन झाले. ते अ विवाहित होते. रात्री १० वाजता सिध्देश्वर पेठ येथील त्यांची अंतीम यात्रा निघून मोदी कब्रस्तान येथे नमाजे जनाजा अदा करुन तेथेच दफन करण्यात आले.

# शक्तिपीठ महामार्ग मोजणीस सहकार्य करा

## उपविभागीय अधिकारी बी. आर. माळी यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.३० ऑक्टोबर-**

शक्तिपीठ महामार्ग मोजणीस शेतकऱ्यांनी विरोध करू नये. त्यांच्या मागण्या आपण शासन दरबारापर्यंत पोहोचवू व मोजणीसाठी प्रत्येकाने शेतामध्ये येऊन हद्दी, बोअर, विहीर, ठिबक, पाईपलाईन, दाखविणे गरजेचे आहे. म्हणजे नुकसान होणार नाही. यासाठी बाधित शेतकऱ्यांनी संमती दिल्यास चार पट मोबदला अधिक मिळेल व यासाठी विरोधाची भूमिका सोडा व महामार्ग मोजणीस सहकार्य करा, असे आवाहन मंगळवेढा उपविभागीय अधिकारी बी. आर. माळी यांनी श्री दत्त मंदिर नाझरे वझरे येथे आयोजित करण्यात आलेल्या महामार्ग बाधित शेतकऱ्यांच्या बैठकीत केले. सुरुवातीस शेतकऱ्यांवर अन्याय होणार नाही, सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन सांगोला तहसीलदार संतोष कणसे यांनी केले.



शक्तिपीठ मोजणीस शेतकऱ्यांचा विरोध आहे. यासाठी आपण कोर्टात जाऊ व मुख्यमंत्र्याची शिष्टमंडळ घेऊन भेट घेऊ व त्यांना शेतकऱ्यांच्या व्यथा सांगू असे शेतकरी संघर्ष समितीचे ॲड. सचिन देशमुख यांनी यावेळी सांगितले. शक्तिपीठ महामार्गात शेतकऱ्यांना शेअर्स देऊन म्हणजे पार्टनरशिप द्या, अशी मागणी शेतकरी राजू पाटील यांनी यावेळी केली. शक्तीपीठ महामार्ग होऊ नये असे सर्व शेतकऱ्यांची मागणी आहेच व झाल्यास श्रीधर स्वामी व संजीव स्वामी महाराज यांचे प्रसिद्ध असलेले येथील श्री दत्त मंदिराचा यात समावेश करा व महामार्गास जोडण्यासाठी प्रयत्न करा असे आवाहन रविराज शेटे यांनी यावेळी केले. यावेळी प्रा. के. वाय. पाटील, सचिन बनसोडे, तमा पाटील, डॉ. हरिश्चंद्र सोनवणे, मंगेवाडी येथील चंद्रकांत चौगुले, बाळासो शिंदे यांनी शक्तिपीठ विरोधात मत व्यक्त केले.

याप्रसंगी संघर्ष समितीचे प्रकाश सोळशे, सुहास देशपांडे, अमोल खरात, वसंत पाटील, आनंदा कोकरे, मल्हारी चव्हाण, श्रीधर देशपांडे, तानाजी कवठेकर, भारत बनसोडे, सचिन कोकरे, भारत पाटील, विनू बुवा पाटील, पांडुरंग बनसोडे, गंगाधर जोंधळे, बाबुराव जोंधळे, आप्पासो पाटील, पोपट जोंधळे, दीपक शिरदाळे, संजय बनसोडे, लक्ष्मण आलदर, बाबासो सरगर, भारत शेळके, पोपट गुरव, हनुमंत गोसावी, अतुल फसाले, लक्ष्मण जाधव, विजय गुरव, सुरेश शिंदे, सुभाष गुरव, देना पाटील तसेच मंडल अधिकारी हरीश जाधव, हरिभाऊ चांडोले, तलाठी, पोलीस पाटील, भूसंपादन अधिकारी, महामार्ग अधिकारी, नाझरे, वझरे, बलवडी, चिनके, कोळे, यलमार मंगेवाडी उपस्थित होते. आभार उत्तम सरगर यांनी मानले.

> कोणत्याही शेतकऱ्याची मागणी नसताना शक्तीपीठ महामार्ग करणे म्हणजे राजकीय स्वार्थापोटी हा महामार्ग करणे व शेतकऱ्यांचे जीवन उद्धवस्त करणे हे बरोबर नाही. येथून चार किलोमीटर अंतरावर नागपूर-रत्नागिरी महामार्ग मोकळा पडला आहे. या महामार्गास शक्तिपीठ महामार्ग जोडा म्हणजे येथील जमिनी वाचतील व सरकारची बचत होईल. परंतु असे न करता शासन शेतकऱ्यांना उध्वस्त करणारा असेल तर मृत्यूला सामोरी जाऊ परंतु जमिनी देणार नाही असा परखड इशारा संघर्ष समितीचे दादासो वाघमोडे यांनी यावेळी दिला.

# खड्ड्यांमुळे मृत्यू; नुकसान भरपाईबाबत समिती गठित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० आक्टोबर-**

शहरातील खड्ड्यांमुळे तसेच उघड्या मॅनहोलमुळे लोकांचे मृत्यू होतात. यासंदर्भात नुकसानभरपाई देण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सोलापूर महापालिकेत समिती गठित करण्यात आली आहे.

महापालिकेच्या बेपरवाईमुळे अशा घटना घडतात असा नागरिक, लोकप्रतिनिधीचा आरोप असतो. अशा घटना घडल्यास मृत पावलेल्या व्यक्तीचे नातेवाईक, कुटुंबीय यांना महापालिकेकडून न्याय मिळावा अशी अपेक्षा असते. पण प्रशासनाकडून संबंधितांना नुकसान भरपाई देण्यासंदर्भात टाळाटाळ वा दिरंगाई होत असते. म्हणूनच संबंधित लोक यासंदर्भात न्यायालयात जातात. मुंबई उच्च न्यायालय यासंदर्भात एक लोकहित याचिका दाखल आहे. या याचिकेची सुनावणी दि. १३ ऑक्टोबर रोजी झाली. या सुनावणी दरम्यान न्यायालयाने रस्त्यावरील खड्ड्यांबाबत आलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने व रस्त्यावरील खड्ड्यांमुळे किंवा उघड्या मॅनहोलमुळे झालेल्या मृत्यूबाबत मृतांच्या कायदेशीर वारसांना तसेच दुखापत झाल्यास दुखापतीचे स्वरुप आणि गंभीरता इत्यादी विचारात घेऊन नुकसान भरपाई देणेबाबत आदेश पारित केले आहेत. याशिवाय इतर विविध निर्देश दिले आहेत.

उच्च न्यायालयाने नुकसान भरपाई निश्चित करण्यासाठी समिती स्थापन करावी, असे निर्देश सोलापूर महापालिकेला दिले आहेत. त्याअनुषंगाने महापालिका प्रशासनाने समिती गठीत केली आहे. त्यामध्ये महापालिका आयुक्त हे समितीचे अध्यक्ष व सदस्य आहेत. सदस्य म्हणून सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व इतर सदस्य यांची समिती गठीत करण्यात आली आहे.

# कार्तिकी वारीसाठी शहरातून दोन दिंड्यांचे पंढरपूरकडे प्रस्थान



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० ऑक्टोबर-**

कार्तिकी वारीसाठी सोलापूर शहरातून देगाव नाका येथील लक्ष्मी नगरातून एक व शेळगीच्या मनिषनगरमधून एक अशा दोन पायी दिंड्यांचे पंढरपूरकडे प्रस्थान झाले. देगाव नाका येथील लक्ष्मी नगरातून रामकृष्णहरी सांप्रदायिक भजनी मंडळाच्या दिंडीचे प्रस्थान अनंतमहाराज ढेरे यांच्या हस्ते वीणापूजनाने झाले. यावेळी हभप मनोज महाराज खलाटे, रामकृष्ण सुरवसे, संकेत सुरवसे, आदित्य ढेरे, बाळू शिंदे, प्रकाश सावंत, श्रेयस सुरवसे, चंदुलाल गोडसे, विणेकरी दादा खरात, दत्तात्रय गुंड, नवगीरे आदींसह वारकरी उपस्थित होते.

हि दिंडी तिर्हेमार्गे पंढरपूरकडे जात आहे. यामध्ये वडजी, हगलूर, देवकुरळी, पाटील वस्ती, जुनी पोलीस लाईन येथील सुमारे शंभर वारकरी सहभागी झाले आहेत. शेळगीच्या मनिषनगरमधून विठ्ठल-रूक्मीणी भजनी मंडळाच्या दिंडीचे विश्व वारकरी संघाचे शहराध्यक्ष हभप महेश महाराज जाधव यांच्या हस्ते वीणा पूजन होऊन प्रस्थान झाले. यावेळी अध्यक्ष हभप शिवाजी महाराज पोतदार, हभप अविनाश शिंदे, गणपत मानकुसकर, लक्ष्मिकांत वेदपाठक, नंदकुमार वेदपाठक, महेश महामुनी, मंगेश कळमणकर आदींसह वारकरी उपस्थित होते. हि पायी दिंडी मोहोळ मार्गे पंढरपूरकडे जाणार आहे.

## उळेतून श्रीगुरू देहूकर सांप्रदायिक मंडळाच्या दिंडीचे प्रस्थान

उळे (ता.दक्षिण सोलापूर) येथील श्रीगुरू देहुकर सांप्रदायिक मंडळाच्या दिंडीचे बुधवारी सकाळी दहा वाजता पंढरपूरकडे प्रस्थान झाले.जगद्गुरू श्रीसंत तुकाराम महाराज यांचे विद्यमान वंशज श्रीगुरू बापुसाहेब महाराज देहूकर व श्रीगुरू कान्होबा महाराज देहुकर यांच्या कृपाशीर्वादाने ग्राम स्थांच्या सहकार्याने हि दिंडी परंपरा सुरू आहे. येथील हनुमान मंदीरातून हभप दत्तात्रय महाराज क्षिरसागर यांच्या हस्ते वीणा पूजनाने दिंडीचे प्रस्थान झाले. यावेळी हभप धनंजय महाराज गुंड, हभप. प्रभु लिंग महाराज क्षिरसागर , हभप दत्तात्रय महाराज घायाळ, विणेकरी गणपत खंडागळे, गुरुलिंग कुंभार, राहूल शिंदे, हरी खंडागळे, भैरु शिंदे, विष्णू शिंदे, चांगदेव घोरपडे, मृदंगाचार्य राम खंडागळे, आदिनाथ खंडागळे, सोमनाथ खंडागळे, श्रीकांत आरगे, मच्छिंद्र डांगे, दत्तात्रय खंडागळे आदींसह वारकरी व ग्रामस्थ उपस्थित होते. हि दिंडी मोहोळ मार्गे पंढरपूरकडे जात आहे. दींडीत सुमारे शंभर वारकरी सहभागी झाले आहेत.






# बल्करच्या चाकाखाली सापडून महिला जागीच ठार

### शांती चौकात गुरुवारी दुपारी घडलेला अपघात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० आक्टोबर-**

बल्करच्या चाकाखाली सापडून दुचाकीवरील महिलेचा जागीच अंत झाला. हा अपघात गुरुवारी सायंकाळी अक्कलकोट रोडवरील शांती चौकात झाला.

जयश्री अरूण जाधव (वय ४०, रा. तेलगाव, ता. दक्षिण सोलापूर) असे मरण पावलेल्या महिलेचे नाव आहे. गुरुवारी सायंकाळी जयश्री जाधव या पतीसोबत एमएच १३ डीजे ९१७८ क्रमांकाच्या दुचाकीवर पाठीमागे बसून बोरामणी येथून तेलगावकडे जात होत्या. अक्कलकोट रोडवरील शांती चौकात पाठीमागून येणाऱ्या बल्कर ट्रकने दुचाकीस पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकीवरील जयश्री जाधव व त्यांचे पती अरूण जाधव हे दुचाकीवरून पडून गंभीर जखमी होऊन बेशुध्द झाल्याने त्यांना चौकातील वाहतूक पोलिसांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यावेळी डॉ. राजदिपसिंग भिसे यांनी जयश्री जाधव यांना मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.





**श्री शंकर महाराज प्रकट दिन**
**सोलापूर : मोदीखाना परिसरातील दत्त मंदिरामध्ये गुरुवारी शंकर महाराज प्रकट दिनानिमित्त सामुदायिक पारायण करण्यात आले.**

# उजनीच्या डाव्या कालव्यात हातपाय बांधलेल्या युवकाचा मृतदेह सापडला

**टेंभुर्णी, दि. ३० ऑक्टोबर-**

टेंभुर्णीपासून काही अंतरावर असलेल्या भिमनगर-रांजणी हद्दीतील उजनी धरणालगतच्या उजनी डाव्या कालव्यात हातपाय बांधलेल्या अवस्थेत एका अज्ञात युवकाचा मृतदेह आढळून आला. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

टेंभुर्णी पोलीस स्टेशनकडून मिळालेल्या माहितीनुसार, २५ ते ३० वयोगटातील एका तरुणाचा हातपाय बांधून त्याला कालव्यात दगड बांधून टाकण्यात आले असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. सदर मृतदेहावर काळा शर्ट आणि काळी जीन्स पॅन्ट असल्याचे पोलिसांनी सांगितले. तसेच या तरुणाला गळा वळून हातपाय बांधून टाकून दिल्याची आज पहाटे घटना घडल्याचे अंदाज वर्तवला जात आहे. घटनेची माहिती मिळताच टेंभुर्णी पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नारायण पवार यांनी तातडीने पथकासह घटनास्थळी धाव घेतली असून तपास सुरु आहे. प्राथमिक पाहणीवरून प्रकार संशयास्पद असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. मृत व्यक्तीबाबत माहिती असल्यास ९७६३५२३८४९ या क्रमांकावर संपर्क करावा,





**सोलापूर : पूर्व भागातील दाजी पेठेतील श्री व्यंकटेश्वर देवस्थान मंदिरात ५३ वे ब्रह्मोत्सवात ध्वजारोहण करण्यात आले. दुसऱ्या छायाचित्रात शेष वाहन सेवा करण्यात आली.**

# एमडी ड्रग्स प्रकरणातील तरुणास पाच दिवस पोलिस कोठडी

### गुन्हे शाखेचे पथक तपासासाठी जाणार मुंबईला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० आक्टोबर-**

शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी ३२ ग्रॅम एमडी ड्रग्ज सहित अटक केलेल्या तरूणास न्यायालयाने पाच दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला आहे. या तरूणाने ड्रग्ज कोठून आणले याच्या तपासासाठी शहर गुन्हे शाखेचे पथक मुंबईला जाणार आहे.

मोहमद अझहर हैदरसाहेब कुरेशी (वय ३७, रा. मिमपुरा लेन, सेंटर स्ट्रीट कॅम्प, पुणे) असे पोलिस कोठडी मिळालेल्याचे आहे. २८ ऑक्टोबर रोजी शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांना एक व्यक्ती सोलापूर एस.टी. स्टैंड परिसरामध्ये मेफेड्रोन (एम.डी.) अंमली पदार्थ विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यावरुन पोलिसांनी पुण्यावरून आलेल्या बसमधून एक संशयास्पद व्यक्ती उतरला, त्यावेळी पोलिसांनी त्यास ताब्यात घेऊन त्याची अंगझडती घेतली असता त्याचे पॅटचे खिशामध्ये एका प्लास्टिक पाऊचमध्ये पांढऱ्या रंगाची मेफेड्रोन (एम.डी.) सदृश्य पावडर मिळून आली. याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर पोलिसांनी मोहमद कुरेशीस अटक करण्यात येऊन न्यायालयात हजर करण्यात आले.


त्यावेळी त्यास न्यायालयाने ५ दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला. पोलिस निरीक्षक अरविंद माने पुढील तपास करीत आहेत.

# श्री मार्कंडेय सहकारी रुग्णालयातील शासकीय योजनांचे आज उद्घाटन

### आ. देवेंद्र कोठे, डॉ. शिवरत्न शेटे यांची प्रमुख उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० आक्टोबर-**

श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रुणालय आणि संशोधन केंद्रातील एकत्रित प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतीराव फुले योजनेचे उद्घाटन आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या हस्ते आज (शुक्रवारी) सकाळी ११ वाजता रुणालयात होणार असल्याची माहिती रुणालयाचे प्रेसिडेंट सत्यनारायण बोल्ली यांनी दिली. या कार्यक्रमास आमदार देवेंद्र कोठे आणि हिंदवी परिवाराचे प्रमुख ख्यातनाम शिवचरित्र व्याख्याते डॉ. शिवरत्न शेटे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.



विशेषतः पूर्व भाग आणि एकूणच शहरात आर्थिक दुर्बल रुणांची संख्या मोठ्या प्रमाणावर असते. उत्कृष्ट वैद्यकीय सेवेमुळे रुणांचा विश्वास संपादन केलेल्या श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रुणालयात एकत्रित प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतीराव फुले योजना नसल्यामुळे आर्थिक दुर्बल घटकातील रुणांना शासकीय योजनांचा लाभ घेता येत नव्हता. त्यामुळे श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रुणालयात या शासकीय योजना सुरू व्हाव्यात याकरिता आमदार देवेंद्र कोठे यांनी आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्याकडे पाठपुरावा केला होता. यानंतर शासनाने श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रुणालयात एकत्रित प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतीराव फुले योजनेला मंजुरी दिली आहे. या योजनांचे उद्घाटन आज (शुक्रवारी) सकाळी होणार असून या कार्यक्रमास सोलापूरकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन प्रशासकीय अधिकारी स्वामी आकेन यांनी केले आहे.

## जैन समाजातील एकजुटीचा विजय : प्रा.मनीष शहा

**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**

प.पू.आचार्य श्री १०८ गुप्तिनंदीजी महाराज यांच्या मार्गदर्शनात बोर्डिंग बचाव समितीने केलेल्या आंदोलनास सर्व आजी-माजी विद्यार्थी, संपूर्ण भारतातील सकल जैन समाज तसेच अनेक शैक्षणिक, सामाजिक व धार्मिक संस्था सहभागी होऊन एकत्रितपणे लढा दिल्यामुळे पुण्यातील जैन बोर्डिंगचा बिल्डर व ट्रस्टीचा करार रद्द झाला.

त्यामुळे हा ऐतिहासिक विजय मिळाला असल्याचे मत येथील जैन समाजाचे कार्यकर्ते मनीष शहा यांनी व्यक्त केले. काही ट्रस्टी व बिल्डरने केलेला हा भूखंड घोटाळा वेळेवर उघडकीस आणून त्याची माहिती सर्व समाजाला देऊन हे आंदोलन छेडले आणि यशस्वी केले त्यासाठी येथील बचाव समितीच्या सर्व प्रतिनिधींचे प्रा. शहा यांनी आभार मानले आहेत

# जिल्हा परिषदेच्या ई-निविदा प्रक्रियेत प्रचंड गैरव्यवहार

- विविध संघटनांचा आंदोलनाचा इशारा
- पाच नोव्हेंबरला ठरणार आंदोलनाची दिशा






**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**

सोलापूर जिल्हा परिषदेतील ई-ऑनलाईन निविदा प्रक्रियेत बेकायदेशीर होत असल्याचा आरोप महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ, राज्य अभियंता संघटना, बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया, राज्य मजूर सहकारी संस्था, राज्य पाणी पुरवठा कंत्राटदार संघटना यांनी केला आहे. निविदामध्ये ठरवून नियमबाहय अटी घालून आर्थिक लाभ उठवून शासनाचे कोटयावधी रुपयांचे नुकसान झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, ग्रामविकास मंत्री, ग्रामसचिव, मुख्य कार्यकारी अधिकारी यांना या संदर्भात वारंवार निवेदन दिले आहेत. या संदर्भात सविस्तर चौकशी न झाल्याने संघटनेने आंदोलनाचा इशारा दिला आहे. ३ नोव्हेंबरपर्यंत बेकायदेशीर ई-निविदा प्रक्रिया थांबवून संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई न झाल्यास या गंभीर प्रकरणावर ठोस निर्णय घेण्यासाठी व आंदोलनाची दिशा ठरविण्यासाठी बुधवार दिनांक नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता जिल्हा समाज कल्याण केंद्र, रंगभवन येथे कंत्राटदारांची बैठक आयोजित करण्यात आली आहे. सदर महत्वाच्या बैठकीस उपस्थित राहण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ, राज्य अभियंता संघटना, महाराष्ट्र राज्य ग्रामीण पाणी पुरवठा कंत्राटदार संघटनेचे राज्य अध्यक्ष मिलिंद भोसले, विल्डर्स असोसिएशन ऑफ इंडियाचे जिल्हाध्यक्ष संतोष कलगुडगी, माजी राज्याध्यक्ष दत्तात्रय मुळे, लेबर फेडरेशन सोलापूर जिल्हाध्यक्ष शंकरराव चौगुले, महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघाचे उपाध्यक्ष कांतीलाल दुबल, सचिव कैलास लांडे, राज्यसंघटक नरेंद्र भोसले, जिल्हा पाणी पुरवठा कंत्राटदार संघटना जिल्हाध्यक्ष आनंद तोडकरी, विवेक राठोड, सुर्यकांत बिराजदार, सोलापूर महानगरपालिका कॉन्टॅक्टरचे जिल्हाध्यक्ष रामभाऊ दुधाळ यांनी केले आहे.

# दासरी हटाव, शिवसेना बचाव! शिवसैनिकांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० ऑक्टोबर-**



शिवसेनेचे विभागीय नेते माजी मंत्री चंद्रकांत खैरे आणि शिवसेनेचे सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख अनिल कोकिळ यांच्या उपस्थित महानगरपालिका निवडणुकीच्या दृष्टीने आयोजित बैठकीत शिवसेना सोलापूर जिल्हाप्रमुख अजय दासरी यांनी कार्याचा अहवाल सादर करताना आपल्याच पदाधिकाऱ्यांवर आणि शिवसैनिकांवर केलेले आरोप दुर्दैवी आहेत.

पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांनी जिल्हाप्रमुख जबाबदारी देऊन जवळपास दोन वर्षांचा कालावधी लोटला आहे. यावेळी दक्षिण सोलापूर दक्षिणमध्ये अमर पाटील यांना उमेदवारी मिळाली. परंतु त्यांच्या प्रचाराची यंत्रणादेखील जिल्हाप्रमुख या नात्याने केली नाही. शिंदेची बंडाळी टाळण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले नाहीत. सोलापूर लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये त्यांनी बनावट बूथ यंत्रणा राबवून मोठा आर्थिक गैरव्यवहार केला आहे. घरामध्येच बसून फक्त सोशल मीडियावर फोटो टाकून किंवा गप्पा मारतानाचे फोटो पोस्ट करत महानगरपालिका निवडणुकीची तयारी सुरू आहे, असे भासवून वरिष्ठांची दिशाभूल केली आहे. काँग्रेस पक्ष सोडून शिवसेनेत येऊन येथील निष्ठावंत शिवसैनिकांवर दंडेलशाही केली आहे. तसेच सर्व शिवसैनिकांना मी अखंड सोलापूर जिल्ह्याचा जिल्हाप्रमुख आहे, अशा अविर्भावात वावरत आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख अजय दासरी यांच्या त्रासाला कंटाळून शिवसेनेचे माजी मंत्री उत्तमप्रकाश खंदारे, माजी नगरसेवक भारत बडूरवाले, गुरूशांत धूत्तगावकर, ज्येष्ठ कामगार नेते विष्णू कारमपुरी यांनी शिवसेना सोडली. तसेच युवासेनेमध्ये देखील त्यांनी हस्तक्षेप केल्याने युवासेना पदाधिकारी त्यांच्या त्रासाला कंटाळून शिवसेना शिंदे गटात गेले. तसेच अनेक युवासेना पदाधिकारी अलिप्त आहेत. तसेच महिला आघाडीमध्ये हस्तक्षेप केल्याने अनेक महिला शिवसेनेपासून अलिप्त झाल्या आहेत. अशा गैरकारभार करणाऱ्या शिवसेना जिल्हाप्रमुख अजय दासरी यांस तात्काळ पक्षातून हकालपट्टी करून सामान्य शिवसैनिकाची नियुक्ती करण्याची मागणी जिल्हा उपप्रमुख दत्ता वानकर, शहर संघटक लहु गायकवाड व सुरेश जगताप यांच्यासह अनेक शिवसैनिकांनी केली आहे.

## भाजपाचे षडयंत्र

शिवसेना पक्ष वाढत असल्यामुळे भाजपाच्या नेत्यांना पक्षविस्तार बघवत नाही. म्हणून त्यांनी सेनेच्या नेत्यांमार्फत षडयंत्र सुरू केले आहे. माझ्याविरूध्द तक्रार करणाऱ्यांना मी उत्तर देण्यास तयार आहे. विरोधकांनी पक्षश्रेष्ठींकडे तक्रार करावे. सेनाभवनात सोक्षमोक्ष होईल.

**- अजय दासरी,**
**जिल्हाप्रमुख, उबाठा शिवसेना**



# मनपा प्रभाग २२ येथे रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० ऑक्टोबर-**

सोलापूर महापालिका प्रभाग क्रमांक २२ येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना अंतर्गत सन २०२३- २४ अंतर्गत माजी नगरसेवक किसन जाधव आणि नागेश गायकवाड यांच्या प्रयत्नातून ११ लाख २८,५८८ खर्चित सोनीनगर, मोदी हुडको, येथील रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचे उद्घाटन करण्यात आले.

दरम्यान, प्रभाग क्रमांक २२ च्या सर्वांगीण विकासासाठी आगामी काळात प्रयत्न करण्याची ग्वाही किसन जाधव यांनी दिली.यावेळी हरीश तेलगू ,सिद्राम वाडेकर, आमिर तांबोळी, फैयाज शेख, धनंजय नगरकर, जनार्दन कांबळे, गणेश दुगाने, मधुकर कश्यप, वसंत गोरे, नीलम गोरे, अनिता भंडारे आदींसह प्रभागातील नागरिक उपस्थित होते.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सरकारी रुग्णालयांत दररोज रंगीत बेडशीट्सचा वापर

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.३० ऑक्टोबर -**
रुग्णालयातील संक्रमणजन्य आजारांचा धोका कमी करण्यासाठी राज्य शासनाने एक अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. आता सरकारी रुग्णालयांत प्रत्येक दिवशी वेगवेगळ्या रंगांच्या बेडशीट्स वापरण्यात येणार असून, बेडशीट, उशांचे कव्हर, ब्लँकेट, पडदे, गणवेश, टॉवेल आदी वस्त्रांची निर्जंतुक धुलाई पूर्णतः यांत्रिक पद्धतीने केली जाणार आहे.

उदगीर येथील सामान्य रुग्णालयात दररोज सुमारे २ हजार बाह्यरुग्णांची नोंदणी होते, तर शेकडो रुग्ण उपचारासाठी दाखल होतात. शस्त्रक्रियेनंतर किंवा प्रसूतीनंतर रुग्णांना संक्रमणाचा धोका अधिक असल्याने हा निर्णय रुग्णांच्या आरोग्य सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

प्रत्येक दिवशी ठरावीक रंगाच्या बेडशीट्स वापरण्याचा निर्णय घेतला गेला आहे. त्यामुळे कोणत्या बेडवर नवे बेडशीट टाकले गेले आहे की नाही हे लगेच ओळखता येईल. यामुळे स्वच्छतेच्या कामात पारदर्शकता आणि जबाबदारी वाढणार आहे.

यांत्रिक धुलाईमुळे वस्त्रांचे पूर्ण निर्जंतुकीकरण प्रभावीपणे होईल, परिणामी संक्रमणजन्य आजारांचा प्रसार रोखण्यास मदत होईल. हा निर्णय विशेषतः अतिदक्षता विभाग, नवजात बालके व शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांसाठी लाभदायी ठरणार आहे.



# शेतकऱ्यांना अनुदान आणि हमीभाव न मिळाल्याने संताप

## शिवसेना शेतकरी सेनेचा शासनाला इशारा... सोयाबीन खरेदी केंद्र तात्काळ सुरु करा...!

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.३०, ऑक्टोबर -**
तालुक्यातील शेतकऱ्यांचे अतिवृष्टीमुळे सोयाबीनचे मोठे नुकसान झाले असून अनेक हेक्टर जमिनीवरील माती वाहून गेली आहे. रब्बी हंगामासाठी पेरणी करणे शेतकऱ्यांना अवघड झाले आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने हेक्टरी १८ हजार ५०० रुपये तीन हेक्टरपर्यंत मदतीची घोषणा केली होती, मात्र अजूनही सुमारे ५० टक्के शेतकऱ्यांच्या खात्यावर एक रुपयाही जमा झालेला नाही, असा आरोप करण्यात आला आहे.




काही शेतकऱ्यांना केवळ ८,५०० रुपये दोन हेक्टरपर्यंतच मदत देण्यात आली असून, रब्बी पेरणीसाठी जाहीर केलेले १० हजार रुपये अनुदान सुद्धा अद्याप खात्यात जमा झालेले नाही. या अनुदानाचे अधिकार महसूल विभागाकडून कृषी विभागाकडे का दिले गेले, याबाबतही शंका व्यक्त करण्यात आली.

याशिवाय, मुख्यमंत्र्यांनी हेक्टरी १७ हजार रुपये पिकविमा जाहीर केला असला तरी तो विमा कंपनी देणार की शासन, हेही स्पष्ट नाही, असे शेतकरी संघटनांचे म्हणणे आहे.

शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारे हे सरकार आहे, अशी टीका करत शिवसेना शेतकरी सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. आण्णासाहेब मिरगाळे यांनी शासनाविरुद्ध तीव्र संताप व्यक्त केला.

त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शासनाने घोषित केलेला सोयाबीनचा हमीभाव ५३२८ रुपये असताना, बाजार समित्यांमध्ये सोयाबीन ३८०० रुपयांनाच विकला जात आहे. त्यामुळे प्रत्येक क्विंटलला दीड हजार रुपयांचा फरक शेतकऱ्यांच्या खात्यात पावतीप्रमाणे जमा करावा, अशी मागणी त्यांनी केली.

तसेच, सोयाबीन खरेदी केंद्र तात्काळ सुरू न केल्यास तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा शासनाला इशारा देण्यात आला आहे.

या प्रसंगी निलंगा विधानसभा प्रमुख शिवाजी पांढरे, अल्पसंख्याक सेलचे तालुकाप्रमुख लायकपाशा शेख, महिला आघाडी तालुकाप्रमुख सविताताई पांढरे, उपतालुकाप्रमुख मंगलबाई कांबळे, अरुणाताई माने, नागिनबाई सुरवसे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## ढाळेगाव तलावात मगर दिसल्याची चर्चा; वनविभागाचा सतर्कतेचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.३०, ऑक्टोबर -**
अहमदपूर तालुक्यातील ढाळेगाव येथे तलावात मगर दिसल्याची माहिती मिळाल्यानंतर वनविभागाने तात्काळ तपास सुरू करून परिसरात खबरदारीचे उपाययोजना केल्या आहेत.

ढाळेगाव येथील शेतकरी गोपाळ शिवाजी बुजारे यांनी दि.२३ ऑक्टोबर रोजी भ्रमणध्वनीद्वारे अहमदपूर वनविभागाला तलावात मगर दिसल्याची माहिती दिली. त्यानंतर वनरक्षक होनराव यांनी तलाव परिसरात भेट देऊन पाहणी केली व स्थानिक शेतकऱ्यांकडून माहिती घेतली.

वनपरिक्षेत्र अधिकारी नागरगोजे आणि वनपरिमंडळ अधिकारी गोविंद माळी यांनी तीन दिवस या भागावर विशेष लक्ष ठेवले. मात्र या काळात मगर दिसून आली




नाही. तरीही खबरदारीचा उपाय म्हणून तलावाजवळ मगरीपासून सावध राहा असे फलक लावण्यात आले आहेत. ढाळेगावचे उपसरपंच शिवाजीराव भिकाने यांनी गावकऱ्यांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले.

तलावात धुणी-धुवणे, पोहणे तसेच जनावरे पाण्यावर नेणे टाळावे, असे सांगून गावात दवंडी देण्यात आली. तसेच, जर पुन्हा मगर आढळून आली तर त्वरित वनविभागास कळवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## अहमदपूरहून श्रीक्षेत्र कपिलधारकडे राष्ट्रसंत माऊलींची महापदयात्रा मार्गस्थ



**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.३०, ऑक्टोबर -**
अहमदपूर येथील राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या संजीवन समाधीस्थानापासून चापोली मार्गे श्रीक्षेत्र कपिलधारकडे जाणारी ७१ वी महापरयात्रा रविवारी भव्य शोभायात्रेसह अहमदपूर शहरातून मार्गस्थ झाली.

सुमारे ७० वर्षांपूर्वी राष्ट्रसंत माऊलींनी चापोली येथून कपिलधार पदयात्रेची परंपरा सुरू केली होती. अध्यात्म आणि विज्ञान यांची सांगड घालणारी, जीवनातील ताणतणाव दूर करून स्वावलंबनाचा संदेश देणारी ही पदयात्रा भक्तांच्या श्रद्धेचे प्रतीक मानली जाते.

पदयात्रा प्रारंभी भक्तीस्थळावर राष्ट्रसंतांच्या उत्तराधिकारी राजशेखर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या हस्ते समाधी रुद्राभिषेक व अशोक पूजन करण्यात आले. त्यानंतर चापोली येथील मलेशे परिवाराच्या मानाच्या ध्वजपूजनानंतर अश्वासह मिरवणुकीला सुरुवात झाली. मिरवणूक शहरातील शिवाजी चौकात पोहोचल्यावर यात्रेतील प्रमुख संत बसव महाराज निलंगा मठ, आचार्य गुरुराज स्वामी महाराज, भक्तीस्थळ प्रमुख बसवेश्वर महाराज चिंचोलीकर, रा. चलिंग महाराज हंगरगा, मनमत आप्पा पालापुरे, शिवलिंग पाटील किनीकर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी सोलापुरे परिवार व महाजन परिवार यांच्या वतीने भाविकांचे स्वागत करण्यात आले. या प्रसंगी माजी मंत्री बाळासाहेब जाधव, रामजी महाजन (पुणे), अनिल कासनाळे, राजकुमार कल्याणी, विनोद हिंगणे, अभय मिरकले, संदीप चौधरी, भीमाशंकर शेटकार, गिरीश शेटकर, रंजना नाकसाखरे, जयश्री बारोळे, आशा बेंबळे, उषा बेंबळे, कल्पना बेंबळे, तसेच महाजन व शेटकार परिवारातील अनेक भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### दैठणा येथे आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांची सांत्वनपर भेट

**तभा वृत्तसेवा**
**दैठणा, दि.३०, ऑक्टोबर -**
निलंगा विधानसभा मतदारसंघाचे आमदार व माजी पालकमंत्री संभाजी पाटील निलंगेकर यांनी दैठणा येथे दुःखित कुटुंबांना भेट देऊन सांत्वन केले.

प्रकाश गुडे यांच्या मातोश्री हरूबाई गुडे तसेच सिद्धार्थ तोटे यांचे वडील दत्तात्रय तोटे यांच्या निधनानंतर आमदार निलंगेकर यांनी त्यांच्या घरी भेट देऊन कुटुंबीयांना धीर दिला. या वेळी त्यांनी दुःखात आपण एकटे नाही, आम्ही सर्व सोबत आहोत, असे सांगत कुटुंबांना मानसिक आधार दिला.

या प्रसंगी भाजपचे स्थानिक कार्यकर्ते व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दैठण्यात समाज मंदिर बांधकामाचा शुभारंभ

### आ. संभाजी पाटील निलंगेकर यांच्या हस्ते भूमिपूजन...



**तभा वृत्तसेवा**
**दैठणा, दि.३०, ऑक्टोबर -**
दैठणा गावाच्या सर्वांगीण विकासाच्या दिशेने आणखी एक महत्वाचे पाऊल टाकत येथील समाज मंदिर बांधकामाचा शुभारंभ भूमिपूजनाने दि.२९ ऑक्टोबर रोजी संपन्न झाला. हा सोहळा निलंगा विधानसभा मतदारसंघाचे आमदार व माजी मंत्री संभाजी पाटील निलंगेकर यांच्या हस्ते पार पडला.

या प्रसंगी गावातील मान्यवर, नागरिक आणि भाजपचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाला मंगेश पाटील, गोविंदराव चिलकुरे, माधव बिरादार, संजय बोरकर, ज्ञानेश्वर चेवले, बाबासाहेब सुरवसे, संजय दोर्वे, धोंडीराम सांगवे, सागर मरुडकर, संग्राम हवा, अनिल शिंदे, सदानंद पाटील, प्रसाद पाटील, पांडुरंग पाटील, धनंजय स्वामी, राजीव नमनगे, माधराव बिरादार, अण्णाराव पाटील, माधव खंदारे, विलास पाटील, तसेच सरपंच शेषराव कांबळे आणि अन्य मान्यवर उपस्थित होते. यावेळी आपल्या मनोगतात आमदार पाटील म्हणाले, समाज मंदिर हे गावाच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक विकासाचे केंद्र आहे. यामुळे ग्रामसंघटनेस बळ मिळेल. दैठणा गावाचा सर्वांगीण विकास हा आमचा प्राधान्यक्रम असून पुढील काळातही विविध विकासकामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल.

गावकऱ्यांनी आ. पाटील यांच्या विकासाभिमुख कार्याचे कौतुक करून त्यांचे आभार मानले.

## लातूरमध्ये उभारला जाणार 'स्टॅच्यु ऑफ नॉलेज'; डॉ. आंबेडकरांचा ७५ फुटी पुतळा

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.३०, ऑक्टोबर -**
लातूर शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान परिसरात 'स्टॅच्यु ऑफ नॉलेज' अर्थात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ७५ फुटी भव्य पुतळा उभारण्यात येणार आहे. या कामाला प्रशासकीय मान्यता मिळून १० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून, यानिमित्ताने शहर भाजपच्या वतीने आनंदोत्सव साजरा करण्यात आला.


१० कोटी निधीस प्रशासकीय मान्यता... भाजपकडून आनंदोत्सव साजरा...

शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आणि फटाक्यांची आतषबाजी करत हा आनंद सोहळा साजरा झाला. या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे विशेष आभार कव्हेकर यांनी मानले.

हा उपक्रम तत्कालीन खासदार सुधाकर शृंगारे यांच्या संकल्पनेतून सुरू झाला होता. त्यावेळी विद्यमान मुख्यमंत्री फडणवीस यांनी या प्रकल्पाला विशेष बाब म्हणून मंजुरी दिली होती.

मात्र काही विरोधी पक्षांनी या प्रकल्पाला विरोध दर्शवून अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. तरीही भाजपचे लोकप्रतिनिधी आणि शहर संघटनांनी सातत्याने पाठपुरावा करून अखेर हा ऐतिहासिक क्षण साधला. शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर म्हणाले, स्टॅच्यु ऑफ नॉलेज उभारणीमुळे लातूर शहराच्या सौंदर्यात भर पडेलच, पण सामाजिक एकता, राष्ट्रप्रेम आणि डॉ. आंबेडकरांच्या विचारांची प्रेरणा पुढील पिढ्यांना मिळत राहील.

लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते भूमिपूजन होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी माजी जिल्हाध्यक्ष देविदास काळे, शहर सरचिटणीस संजय गीर, निखील गायकवाड, प्रविण कस्तुरे, महिला मोर्चा अध्यक्षा शितल मालू, युवा मोर्चा अध्यक्ष ओम धरणे, तसेच विविध आघाडी व मोर्च्यांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शहरभर या निर्णयाचे स्वागत होत असून, लातूरमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा ७५ फुटी भव्य पुतळा उभारला जाणार ही बाब लातूरकरांसाठी अभिमानाचा क्षण ठरत आहे.

## उदगीरच्या साहित्यिक चळवळीने घेतलेली भरारी नावलौकिक वाढवणारी : रामचंद्र तिरुके

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.३०, ऑक्टोबर -**
साहित्य चळवळ आणि लेखन या दोन्ही क्षेत्रात उदगीरने घेतलेली भरारी ही उदगीरच्या नावलौकिकात भर टाकणारी आहे, असे मत मराठवाडा साहित्य परिषदेच्या केंद्रीय कार्यकारिणीचे उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके यांनी व्यक्त केले.

मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने देण्यात येणारा 'बालसाहित्याचा रघुनाथ शिवराम बोरसे स्मृती पुरस्कार' प्राप्त झाल्याबद्दल संजय ऐलवाड यांचा मराठवाडा साहित्य परिषद, उदगीर शाखेच्या वतीने सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परिषदेचे उदगीर शाखा अध्यक्ष धनंजय गुडसूरकर होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनिता येलमटे यांनी केले. बदलत्या काळात वाचनाचे संस्कारच नव्या पिढीला आणि मानवजातीला कल्याणकारी ठरतील, असे मत व्यक्त करत तिरुके म्हणाले, लिहिणाऱ्या हातांना व वाचकांना बळ देणे ही काळाची गरज आहे. चांगले साहित्य निर्माण झाले पाहिजे आणि त्या साहित्याचा गौरव झाला पाहिजे, तरच वाचन संस्कृती मजबूत होईल.

सत्काराला उत्तर देताना संजय ऐलवाड यांनी पर्यावरण विषयक प्रश्नांवर भाष्य केले. त्यांनी म्हटले की, साहित्याच्या माध्यमातून पर्यावरणाचे गांभीर्य समाजापर्यंत पोहोचवता येते आणि त्यातून परिणामकारक बदल घडवून आणता येतो.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामदास केदार यांनी केले, तर प्रा. प्रवीण जाहूरे यांनी आभार मानले.

यावेळी विश्वनाथ बिरादार माळेवाडीकर, सुरेखा गुजलवार, लक्ष्मण बेंबडे, विश्वास पडिले, चंद्रदीप नादरगे, राजीव गुणाले यांच्यासह अनेक साहित्यरसिक उपस्थित होते.

# उजनी येथे संत गणेशनाथ महाराज संजीवन सोहळा व यात्रा महोत्सवास प्रारंभ

### शतकानुशतकांची अखंड परंपरा कायम...

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.३०, ऑक्टोबर -**
गेल्या साडेतीन शतकाहून अधिक परंपरेचा वारसा लाभलेल्या औसा तालुक्यातील उजनी येथील श्री संत गणेशनाथ महाराज संजीवन सोहळा व यात्रा महोत्सवास यावर्षी सुरुवात झाली आहे. पंधरा दिवस चालणाऱ्या या महोत्सवात गाथा भजन, रामायण पारायण, हरिपाठ, हरिकिर्तन, हरिजागर, काकडा आरती, भुपाळी, विष्णुसहस्रनाम व नामजप अशा विविध धार्मिक कार्यक्रमांची मुशाफिरी होणार आहे. त्याचबरोबर शास्त्रीय संगीत गायन-वादन, जंगी कुस्त्या, पालखी मिरवणुका आणि भारुड या सांस्कृतिक कार्यक्रमांचीही रेलचेल राहणार आहे.

या महोत्सवाची सुरुवात तुकादास शहाजी भगवान काटे यांच्या कीर्तनाने झाली. त्यानंतर दररोज देशभरातील नामवंत कीर्तनकारांच्या कीर्तनाचा कार्यक्रम होत आहे. यात नवनाथ महाराज चिखलीकर, कुमार पाटील महाराज गांजनखेडा, प्रा. बाळासाहेब महाराज देहूकर, माधव महाराज ढाकणी (आळंदी), महादेव महाराज (बीड), गुरु कान्होबा महाराज देहूखर, अमोल महाराज पल्ले (लातूर) यांचा समावेश आहे.



पुढील दिवसांत गणेश महाराज सोनवणे (आळंदी), जयेश महाराज भाग्यवंत (मुंबई), सुधाकर महाराज इंगळे (सोलापूर), किशोर महाराज खरात (नाशिक), उमेश महाराज दसरथे (आळंदी) आणि ज्ञानेश्वर महाराज कदम (आळंदी) यांच्या कीर्तनाचे आयोजन आहे. बुधवार, दि.५ ऑक्टोबर रोजी योगीराज महाराज उजनी यांचे महाप्रसादीय कीर्तन होणार असून, दुपारी गोपाळपुर बाजार चौकात गोपाळकाला महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

रविवार, दि.२ ऑक्टोबर रोजी शास्त्रीय भजनाचा कार्यक्रम, त्यानंतर पं. जगदीश चव्हाण (मुंबई) व पं. संजय गरुड (पुणे) यांचे चक्रीभजन होणार आहे. मंगळवार, दि. ४ ऑक्टोबर रोजी मध्यरात्री पालखी मिरवणूक, तसेच पहाटे तेरणे नदीकाठी शोभेची आतषबाजी होणार आहे. बुधवार, दि. ५ ऑक्टोबर रोजी रात्री शास्त्रीय संगीत गायन-वादनाचा कार्यक्रम होणार असून, त्यात पं. ऋषीकेश बडवे व अस्मिता चिंचाळकर गायन करणार आहेत. त्यांना पं. राहुल गोळे (हार्मोनियम) यांची साथ लाभणार असून, प्रसाद करंमबेळकर, अभय जबडे, पांडुरंग मुकडे, व्यंकट ढवण तबल्यावर साथ देणार आहेत.

गुरुवार, दि.६ ऑक्टोबर रोजी तेरणे फडावर नामवंत मल्लांच्या जंगी कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, या वर्षी तरुणांमध्ये कुस्त्यांची आवड निर्माण व्हावी म्हणून लहान मल्लांच्या स्पर्धांचेही विशेष आयोजन करण्यात आले आहे.

### शास्त्रीय संगीत गायन-वादनाची अखंड परंपरा कायम

श्री संत गणेशनाथ महाराज संजीवन समाधी सोहळा व यात्रा महोत्सवानिमित्त गावचे सुपुत्र आणि विख्यात तबलावादक पांडुरंग मुकडे यांनी १९६३ साली शास्त्रीय संगीत गायन-वादनाच्या कार्यक्रमाची परंपरा सुरू केली. या मंचावर आजपर्यंत डॉ. सुहासिनी कोरटकर (पुणे), उपेंद्र भट, हरिश्चंद्र गवारे, बकुळ पंडित (मुंबई), पं. प्रभाकर कारेकर, जयतीर्थ मेवुंडी (धारवाड), आनंद भाटे, उस्ताद उस्मान खान, पद्मश्री उल्हास कशाळकर, पद्मश्री सुरेश तळवळकर यांसारख्या प्रख्यात कलाकारांनी हजेरी लावली आहे.

## नळेगावच्या तलाठ्याने ४० हजारांची लाच मागितली; चाकूर पोलिसांत गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.३०, ऑक्टोबर -**
चाकूर तालुक्यातील नळेगाव येथील तलाठी अमोल रामशेट्टे यांच्यावर ४० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केल्याप्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागाने (एसीबी) गुन्हा दाखल केला आहे.

नळेगाव येथील एका ५२ वर्षीय व्यक्तीने व त्यांच्या भावाने गट क्रमांक ८२७/०१ मधील १० आर जमीन खरेदी करून कोर्ट डिग्री केली होती. या जमिनीची फेरफार नोंद करण्यासाठी ते तलाठी कार्यालयात गेले असता, तलाठी रामशेट्टे यांनी या कामासाठी ४० हजार रुपयांची लाच मागितली, अशी तक्रार तक्रारदाराने एसीबीकडे केली.

एसीबी लातूरच्या अधिकाऱ्यांनी तक्रारीची पडताळणी केली असता, तलाठी यांनी ३९ हजार रुपयांची तडजोडीची लाच एका खाजगी व्यक्तीकडे देण्यास सांगितली. त्यानुसार, १४, १५ आणि २८ ऑक्टोबर रोजी सापळा रचण्यात आला. मात्र तलाठी रामशेट्टे यांना संशय आल्याने त्यांनी लाच स्वीकारण्यास नकार दिला.

यानंतर एसीबीचे पोलिस उपअधीक्षक संतोष बर्गे यांच्या फिर्यादीवरून चाकूर पोलिस ठाण्यात तलाठी अमोल रामशेट्टे यांच्या विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# निवडणूकीत गोंधळ घालणाऱ्यांवर प्रतिबंधक कारवाई करा

## विशेष पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र यांनी घेतला आढावा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० ऑक्टोबर**

छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र यांनी गुरूवारी जिल्ह्याची कायदा व सुव्यवस्था आणि गुन्हेगारी नियंत्रण प्रणालीचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर अधीक्षक सचिन पांडकर आणि चेतना तिडके यांची उपस्थिती होती.

विशेष पोलीस महानिरीक्षक मिश्र यांनी पोलीस दलाला थेट आणि कडक निर्देश दिले. मागील निवडणूक काळात गुन्हे दाखल असलेल्या आरोपींवर तातडीने प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे त्यांनी स्पष्ट निर्देश दिले. या बैठकीत शरीराविरुद्धचे गुन्हे, मालमत्तेविरोधातील गुन्हे, विशेषतः चोऱ्या आणि घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्यास सांगण्यात आले. त्यांनी पोलिस उपअधीक्षक आणि स्थानिक गुन्हे शाखा यांनी अवैध धंद्यांवर केलेल्या कारवायांचा आढावा घेतला. तसेच, आर्थिक गुन्हे शाखा आणि सायबर सेलच्या प्रलंबित तपासावर लक्ष केंद्रित करण्यास सांगितले. अवैध धंद्यावर प्रभावी कारवाया करण्याच्या सूचना दिल्या.

अधिकारी अंमलदार यांचा गौरव

उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा यावेळी प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. यामध्ये बीड शहर, पिंपळनेर, परळी शहर, अंबाजोगाई ग्रामीण, नेकनूर, सह सुमारे १५ ते २०



कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला.

पोलीस अधीक्षक वाचक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक वजूरकर हे नियत वयोमानानुसार उद्या दिनांक ३१/१०/२०२५ रोजी सेवानिवृत्त होत असल्यामुळे त्यांच्या उत्कृष्ट सेवेबद्दल प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

हरवलेली मुलांसंदर्भात कारवाई करा

मिश्र यांनी फरार आरोपींचा शोध घेणे, हरवलेली लहान मुले आणि अपहृत मुली यांचा तपास करणे तसेच जप्त केलेला मुद्देमाल फिर्यादीला परत करण्यासाठी प्रयत्न करणे आणि प्रलंबित अर्ज तातडीने निकाली काढणे अशा सूचना दिल्या. त्यांनी तपासात ई-साक्ष पचा प्रभावी वापर करण्यावरही भर दिला.

# परळीत देश पातळीवरील भव्य पशुपक्षी प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० ऑक्टोबर**

राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या पुढाकारातून परळीला देश पातळीवरील मोठा बहुमान मिळाला आहे. परळीच्या इतिहासात पहिल्यांदाच अनोखे व आगळे वेगळे असे देश पातळीवरील भव्य पशुपक्षी प्रदर्शन भरणार आहे.



देशपातळीवरील महापशुधन एक्स्पो हा परळीसाठी ऐतिहासिक बहुमान ठरणारा आहे.

राज्यातील पशुपालकांसाठी आणि कृषी क्षेत्राशी निगडित पशुसंवर्धन उद्योगांसाठी एक मोठी उपलब्धी म्हणून परळी वैजनाथ येथे १० ते १२ डिसेंबर २०२५ दरम्यान महापशुधन एक्स्पो २०२५ हे देशपातळीवरील पशुपक्षी प्रदर्शन आयोजित करण्यात येणार आहे. मंत्री पंकजा मुंडे यांच्या पुढाकारातून होत असलेल्या या प्रदर्शनासाठी शासनाने ५ कोटी ८४ लाख रूपये मंजूर केले असून याबाबतचा शासनादेश निर्गमित करण्यात आला आहे.

भारतीय पशुधन क्षेत्र हे जगातील सर्वात मोठे असून भारतात ११.६ टक्के पशुधन आहे. पशुपालन हा शेतकऱ्यांच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. महाराष्ट्रात पशुपालनातून शेतकऱ्यांना हमीपात्र उत्पन्न मिळत असून, ज्या भागात हा व्यवसाय प्रामुख्याने केला जातो, त्या भागात आत्महत्यांचे प्रमाण तुलनेने कमी असल्याचे आढळून आले आहे. राज्याच्या विकासात विदर्भ व मराठवाडा या भागांचा सकल देशांतर्गत उत्पादनातील (जीडीपी) वाटा कमी असल्याने तेथील शेतकऱ्यांना व पशुपालकांना प्रोत्साहन देणे अत्यावश्यक ठरते. या पार्श्वभूमीवर पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या संकल्पनेतून व पुढाकारातून परळीत अखिल भारतीय पशुप्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. हे अखिल भारतीय पशुप्रदर्शन पशुपालकांना नवीन तंत्रज्ञान, उत्पादन क्षमता व प्रजनन क्षमता वाढविण्यासाठी प्रेरणा देणार आहे.

या प्रदर्शनात राज्यातील आणि राज्याबाहेरील देशभरातून विविध जातींचे जातीवंत व उत्कृष्ट पशुधन प्रदर्शित करण्यात येणार आहे. तसेच पशुसंवर्धन क्षेत्रातील व्यावसायिक, तज्ज्ञ आणि विविध संस्थांचे स्टॉल्स लावले जाणार असून अद्ययावत तंत्रज्ञान, उपकरणे आणि नव्या संधींची माहिती पशुपालकांना मिळणार आहे. कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन आणि अंमलबजावणी पशुसंवर्धन आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येणार आहे. परळी वैजनाथ येथे होणारा हा महापशुधन एक्स्पो २०२५ राज्यातील पशुपालक, उद्योग, संशोधक आणि सामान्य नागरिकांसाठी एक प्रेरणादायी आणि ऐतिहासिक सोहळा ठरणार आहे.

# जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

## पाच आरोपींना अटक, ३.४९ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० ऑक्टोबर**

दिनांक ३०/१०/२०२५ रोजी पिंपळनेर पोलिसांनी मौजे मैंदा शिवारात जुगार अड्ड्यावर छापा टाकून पाच इसमांना अटक केली आहे. आरोपींकडून ३,४९,४७०/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

कारवाईचा तपशील:

पोलिसांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, मैंदा शिवारात, मैंदा फाटा ते गाडीउतार तांडा रोडच्या उजव्या बाजूला विटभट्टीजवळ लिंबाच्या झाडाखाली मोकळ्या जागेत काही इसम बेकायदेशीररित्या 'तिरट' नावाचा जुगार खेळत व खेळवत आहेत.




या माहितीच्या आधारावर, पोलीस अंमलदार वैजिनाथ चंद्रकांत मगर यांच्या फिर्यादीनुसार, सहाय्यक पोलीस निरीक्षक मधुसूदन घूगे, आणि पोलीस उपनिरीक्षक अर्जुन गोलवाल यांच्या पथकाने सायंकाळी १६.३० वाजता अचानक छापा टाकला.

छाप्यादरम्यान, पाच इसम गोलाकारात बसलेले आणि जुगार खेळताना आढळून आले.

अटक आरोपींची नावे व जप्त मुद्देमाल:

पाच आरोपींची नावे:

सुभाष गोपिनाथ चव्हाण (वय ४० वर्षे)

गंपु गुंडीबा कसबे (वय ६० वर्षे)

दिलीप शिवाजी घोरड (वय ३२ वर्षे)

हनुमंत रामभाऊ लोकरे (वय ३८ वर्षे)

शिवाजी रंगनाथ कसबे (वय ५५ वर्षे)

सर्व रा. मैंदा, ता. जि. बीड.

जप्त केलेला मुद्देमाल: रोख रक्कम, मोबाईल, आणि पाच मोटारसायकली (हिरो स्प्लेंडर पल्स, बजाज डिस्कव्हर, बजाज बॉक्सर, बजाज प्लॅटीना) असा एकूण ३,४९,४७०/- (तीन लाख एकोणपन्नास हजार चारशे सत्तर रुपये) किमतीचा मुद्देमाल पंचांसमक्ष जप्त करण्यात आला आहे.

गुन्हा दाखल:

या आरोपींविरुद्ध कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार बंदी कायदा प्रमाणे कायदेशीर फिर्याद नोंदविण्यात आली आहे. पुढील तपास पिंपळनेर पोलीस स्टेशन करत आहे.

सदर कारवाई मा पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपोअ सचिन पांडकर, उपविपोअ हनपुडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहा पोलीस निरीक्षक मधुसूदन घूगे, पो उप नी गोलवाल, पोलीस अंमलदार शेळके, गरजे, मगर, ढाकणे पठाण, विघ्ने, तावरे यांनी केली आहे.

# पायाभूत सोयी सुविधा अनुदान योजनेसाठी प्रस्ताव सादर करावेत

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० ऑक्टोबर**

राज्यातील धार्मिक अल्पसंख्यांक बहुल शासनमान्य खाजगी अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित, कनिष्ठ महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्थां, नगरपालिका, नगरपरिषद शाळा व अपंग शाळांमध्ये पायाभूत सोयी सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना राबविण्यात येत आहे.

सदर योजना सन २०२५-२६ या वर्षात राबविण्यात येत असून संस्थाचालकांनी या योजनेसाठीचे परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती बीड या कार्यालास दिनांक १४ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६:१५ वाजेपर्यंत सादर करावेत मुदतीनंतर प्राप्त प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाही याची नोंद घ्यावी, असे जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी, सुधाकर चिंचाणे यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# शिक्षकांच्या दैनंदिन शालेय कामकाजातील विविध ऑनलाइन पचा भार कमी करावा - विजय रापतवार, अध्यक्ष शिक्षक मैत्री प्रतिष्ठान

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.३० ऑक्टोबर**

महाराष्ट्र शासन आपल्या विविध शासकीय योजना राबविण्यासाठी ऑनलाइन पद्धतीच्या स्वरूपात विद्यार्थ्यांची व योजनांची माहिती ऍप् द्वारे शिक्षकांच्या कडून भरून घेत आहे. जिल्हा परिषद शाळा मध्ये कार्यरत असलेले शिक्षक दररोज ४० प्रकारची विविध प वापरत आहेत.



दररोज शिक्षकांना विविध ऑनलाईन प्स लिंक अहवाल सर्वेक्षण, तसेच त्यांच्या प्रशिक्षना मध्येच व्यस्त रहावे लागत आहे. सर्व वेगवेगळे मिळून एकूण ४० प्स आहेत ज्यामध्ये शिक्षकांना विद्यार्थ्यांना विद्यार्जनाचे काम सोडून यामध्येच व्यस्त रहावे लागत आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ लागले आहे. हे ऑनलाइन काम करत असताना यांचे सर्व्हर कधी चालतं कधी चालतं नाही तर कधी कोणती तांत्रिक अडचण निर्माण होते आहे. त्यामुळे शिक्षक जवळपास दिवसभर यामध्येच व्यस्त असतात.व आपोआपच विद्यार्थ्यांना आपल्या शैक्षणिक नुकसानिस सामोरे जावे लागत आहे.

ही बाब शासनाने गंभीर्याने लक्षात घेऊन शासनाने हे सर्व ४० प्स एकत्र करून शाळांच्या ऑनलाइन कामासाठी एकत्रित प्रणाली विकसित करून एकच प चालू करावे जेणेकरून शिक्षकांना कमी वेळेत हे सर्व ऑनलाईन कामे करता यावीत. जेणेकरून शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या विद्या ज्ञानार्जयाकडेही पुरेसा वेळ देता येईल . पर्यायाने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही. यावर शासनाने गंभीर्याने विचार करून यावर उचित अशी कार्यवाही करावी अशी मागणी शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय रापतवार, उपाध्यक्ष पांडुरंग नरवडे व सचिव विष्णू सरवदे यांनी एका प्रसिद्धी पत्राद्वारे केली आहे.शिक्षकांना हाताळाव्या लागत असलेल्या विविध प्स मध्ये सरल, शालार्थ,मध्यान्ह भोजन, प्रेरणा, प्रेरणा डीबीटी,महाडीबीटी, दीक्षा रीड अलॉन्ग, निपुण प्लस, शारदा उल्हास भारत,समर्थ पोर्टल, विनोबा प, कर्मयोगी, हरितिमा, इको क्लब,एस आधार उमंग प, महास्कूल स्वच्छ सर्वेक्षण,फीट इंडिया, सूक्ष्म कवच, ज्ञान समीक्षा, परख अशा जवळपास एकूण ४० प्सवर शिक्षकाकडून दररोज हजेरी, सर्वेक्षण अहवाल आणि विविध शासकीय माहिती दररोज अनिवार्य पणे भरावी लागते.

विविध शासकीय व्हाट्सअप ग्रुप करून दिवसभर वेगवेगळे शासकीय परिपत्रके व आदेश त्यातच अनेक वेगवेगळ्या माहितीसाठी वेगवेगळ्या लिंक येतात त्यामुळे शिक्षक पूर्ण वेळ या ऑनलाईन काम व व्हाट्सअप ग्रुप मुळे मोबाईलवर व्यस्त असल्यासारखे असतात. त्यात या प्स चे सर्वर चालले नाही तर माहिती वेळेत गेली नाही म्हणून पुन्हा कारवाईची भीती असते. या तणावांमध्येच शिक्षक दिवसभर असतात या सर्व कामाचा परिणाम अध्यापनावर होतो आहे. त्यामुळे शासनाने हे सर्व प्स एकत्रित करून नवीन डिजिटल प्रणाली विकसित करावी व हवी असलेली माहिती आपोआप या पवरून वेगवेगळ्या योजनेसाठी स्वीकारली जाईल अशी काही व्यवस्था करावी जेणेकरून शिक्षकावरील या ऑनलाइन कामाचा ताण कमी होईल अशी मागणी शिक्षक मैत्री प्रतिष्ठान अंबाजोगाई च्या वतीने अध्यक्ष विजय रापतवार व त्यांच्या संपूर्ण प्रतिष्ठानच्या वतीने शासनाकडे केली आहे.

# ढेकणमोहा येथे डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया प्रतिबंधासाठी आरोग्य जनजागृती व सर्वेक्षण

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० ऑक्टोबर**

तालुक्यातील मौजे ढेकणमोहा येथे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ उल्हास गंडाळ व जिल्हा हिवताप अधिकारी श्री विजयसिंह शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा हिवताप कार्यालयामार्फत डेंग्यू, मलेरिया आणि चिकनगुनिया या साथीच्या आजारांविषयी जनजागृती व सर्वेक्षण अभियान राबविण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश गावातील नागरिकांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता वाढविणे आणि डासजन्य रोगांवर प्रभावी नियंत्रण ठेवणे हा होता.

या प्रसंगी जिल्हा पर्यवेक्षक संजय धस यांनी उपस्थित नागरिकांना मौल्यवान आरोग्य मार्गदर्शन दिले. तसेच आरोग्य सहाय्यक पवळ, सगरे, आरोग्य कर्मचारी पठाण, शगीर, सानप, करपे, भिलारे, जाधव, मेखले, सातपुते, गव्हाणे आणि प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान ढेकणमोहा गावात कंटेनर सर्वेक्षण करण्यात आले. दूषित पाण्याच्या कंटेनरमध्ये अबेट औषध टाकण्यात आले, तर काही कंटेनर रिकामे करण्यात आले. प्रत्येक घरात जाऊन नागरिकांना डेंग्यू, मलेरिया आणि चिकनगुनिया प्रतिबंधक उपाययोजना समजावून सांगण्यात आल्या.

नागरिकांना दर आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळण्याचे, तसेच मच्छरदाणी, लिक्विड, अगरबत्ती किंवा नैसर्गिक उपाय (उदा. लिंबाची पाने) वापरण्याचे आवाहन करण्यात आले. नाल्या नियमितपणे साफ ठेवाव्यात, पाण्याच्या हौदात व खड्ड्यांमध्ये गप्पी मासे सोडावेत, अशीही सूचना देण्यात आली.याशिवाय, सरपंच आणि ग्रामपंचायतीला तात्काळ धूर फवारणी (फॉगिंग) करण्याचे निर्देश देण्यात आले, जेणेकरून डासांची उत्पत्ती आटोक्यात येईल आणि कीटकजन्य आजारांवर नियंत्रण मिळवता येईल.या उपक्रमाद्वारे गावात स्वच्छतेचे महत्त्व आणि डासजन्य आजारांपासून बचावासाठी आवश्यक उपाययोजना याबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यात आली.

# गजानन विद्यालय लऊळ येथे ३२ वर्षा नंतर पार पडला स्नेह मिलन मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.३० ऑक्टोबर**

तालुक्यातील गजानन विद्यालय लऊळ येथे ३२ वर्षा नंतर स्नेह मिलन मेळावा पार पडला. १९९२-९३ बॅच ला शिकवणारे जाधव सर, देशमुख सर, महाजन सर, शिंगाडे सर, संस्थेच्या अध्यक्षा राजूबाई शिंदे, शाळेचे सध्याचे मुख्याध्यापक घंटाजी सर, यांचा उपस्थितीत स्नेह मिलन मेळावा पार पडला.



स्वागत गीत अरविंद लोंढे यांनी गायले. बने चाहे दुश्मन जमाना हमारा सलामत रहे दोस्ताना हमारा या गीताचे गायन देडे सर, डावरे सर, लोटे सर, यांनी केले. तसेच ताई कविताचे गायन अशोक राठोड सर, यांनी केले तर मैत्री कविताचे गायन प्रा. लक्ष्मण गिरी यांनी केले. तसेच शेटे साहेब, डॉ.कुलकर्णी व इतर वर्गमित्र यांनी मैत्री या विषयावर आपापले मनोगत व्यक्त केले. जाधव सर, यांनी औक्षवंत व निरोगी राहण्यासाठी रोज सकाळी व्यायाम करणे आहारावर नियंत्रण ठेवणे रोज किमान किमान पाच ते सहा किलोमीटर चालणे अशा आरोग्य विषयी काही टिप्स सांगितल्या. व सर्वांची शंभरी पार व्हावी सर्वांच्या हातून विद्यार्थ्यांची, समाजाची, दीनदुबळ्यांची, सेवा घडो अशा शुभेच्छा दिल्या. व सर्वांचे आभार मानले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अँड. देडे साहेब यांनी केले.कार्यक्रमाचे नियोजन लोडे सर, अशोक राठोड, उघडे सर,यांनी केले.

# जिल्ह्यात लंपी आजारावर उपाय योजना युद्ध पातळीवर करावी-अनिल बोर्डे

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.३० ऑक्टोबर**

जिल्ह्यात बऱ्याच ठिकाणी लंपी आजाराची लागण मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे पशु मालक व शेतकरी ग्राहकामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आजार नियंत्रणात आणण्यासाठी शासनाने युद्ध पातळीवर उपाय योजना व नुकसान भरपाई देण्यासाठी कारवाई करण्यात यावी अशी मागणी मा. जिल्हाधिकारी बीड, मा. तहसीलदार गेवराई, मा. पशुवैद्यकीय अधिकारी गेवराई यांच्याकडे बीड जिल्हा ग्राहक पंचायत उपाध्यक्ष तथा अध्यक्ष श्री जगदंबा ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्था गेवराई यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

जिल्ह्यात बऱ्याच ठिकाणी लंपी आजाराची लागण मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे पशु मालक व शेतकरी ग्राहकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सद्यस्थितीत शेतकरी ग्राहक अतिवृष्टीने आर्थिक संकटात सापडलेला आहे. त्यावर अद्याप पर्यंत ठोस उपाय योजना झालेली नाही. जिल्ह्यात तसेच गेवराई तालुक्यात लंपी आजाराची मोठ्या प्रमाणात लागण झालेली आहे असे निदर्शनास आले आहे. लंपी आजाराने काही जनावरे दगावली असल्याचे निदर्शनास आले आहे. सदरील आजार नियंत्रणात आणण्यासाठी ठोस उपाययोजना झालेली नाही. त्यासाठी युद्ध पातळीवर उपाययोजना करणे आवश्यक आहे. सदरील आजाराचा फैलाव मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे शेतकरी ग्राहक व पशु मात्रलकांमध्ये तीव्र नाराजी पसरलेली आहे. त्याची तात्काळ शासनाने दखल घेऊन उपाययोजना युद्ध पातळीवर करणे आवश्यक आहे. पशुमालकांना या संकटातून वाचविणे शासनाचे कर्तव्य आहे. तरी शासनाने संबंधित विभागास तात्काळ आदेश निर्गमित करावेत.

तसेच नुकसान झालेल्या पशुमालकांना व शेतकरी ग्राहकांना तात्काळ युद्ध पातळीवर उपाय योजना पंचनामे करून नुकसान भरपाई देण्यात यावी. पशु मालकांना दिलासा देण्यात यावा अशी मागणी बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र उपाध्यक्ष अनिल बोर्डे केलेली आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# कांडली बुद्रुक येथील तरुणाचा प्रेम प्रकरणातून अपहरण करून खून

**तभा वृतसेवा**
**तामसा, दि. ३० ऑक्टोबर-**

हिमायतनगर तालुक्यातील कांडली (बु.) येथील एका तरुणाचा प्रेम प्रकरणातून अपहरण करून खून केला व प्रेत भोकर तालुक्यातील सिंगारवाडी शिवारातील विहिरीत टाकल्याची घटना दिनांक २८ रोजी उघडकीस आली. या घटनेमुळे कांडली गावात मोठी खळबळ उडाली असून तामसा पोलिसांनी अपहरण करून खून केल्याचा गुन्हा दाखल करून दोन आरोपीला अटक केली.




कांडीली (बु.) येथील नकुल संजय पावडे (वय १७) हा संभाजीनगर येथे शिक्षण घेत होता. दिवाळीनिमित्त तो आपल्या गावाकडे आला होता. दि. २६ रोजीचे मध्यरात्रीपासून आपला मुलगा घरी परत आला नसल्याने त्याचे वडील संजय शिवाजी पावडे यांनी नकुलचा आपल्या नातेवाईकासह सर्वत्र शोध घेतला. परंतु नकुलचा कोठेही पत्ताच लागला नसल्याने त्यांनी दि. २७ रोजी तामसा पोलीस ठाणे गाठून आपला मुलगा नकुलचे अपहरण झाल्याची फिर्याद दिली होती. पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल करून तपासाची चक्रे वेगाने फिरवली. नांदेडच्या स्थानिक गुन्हे शाखेची तपास कामी मदत घेतली होती. स्थानिक गुन्हा शाखेने तपासाअंती गणेश संभाजी दारेवाड (वय ३९) व विशाल गणेश दारेवाड (वय १९) दोघेही राहणार कांडीली (बु.) बाप लेकाला संशयित म्हणून ताब्यात घेतले. पोलिसांनी पोलिसी खाक्या दाखवताच दोन्ही संशयीतानी नकुलचा खून करून प्रेत पोत्यात बांधून भोकर हद्दीतील सुधा नदी काठच्या सिंगारवाडी शिवारातील एका विहिरीत टाकल्याची कबुली दिली. तामसा पोलिसांनी घटनास्थळी जाऊन दि. २८ रोजीच्या मध्यरात्रीनंतर ३ वाजताचे दरम्यान मयत नकुलचे प्रेत विहिरीबाहेर काढले. तामसा प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रेतावर शेववविच्छेदन केले. पोलिसांनी अटक केलेल्या दोन्ही आरोपीतील एकाची मुलगी तर दुसऱ्याच्या विवाहीत बहिणीसोबत नकुलचे प्रेमसंबंध होते. तिच्या लग्नानंतरही तो तिला त्रास देत असल्याने त्याचा खून केल्याची कबुली दिल्याचे तामसा पोलिसांनी सांगितले. तामसा पोलिसांनी दोन्ही आरोपीविरुद्ध अपहरण करून खून केला व पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने प्रेत विहिरीत टाकून दिल्याचे कलमान्वय गुन्हा दाखल केला. तामसा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शहादेव खेडकर यांचे मार्गदर्शनाखाली पुढील तपास फौजदार बालाजी नरोटे हे करीत आहेत. दोन्ही आरोपीला भोकर न्यायालयात हजर केले असता आरोपीला दोन दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली.

# अवैध वाळू उपशाचा धडाका; महसूल व पोलिस प्रशासनाचे मौन संशयास्पद!

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. ३० ऑक्टोबर-**

नायगाव तालुक्यात शासनाने वाळू उपशावर घातलेली बंदी केवळ कागदावर राहिल्याचे चित्र दिसत आहे. प्रत्यक्षात मात्र लोहा तालुक्यातील काही वाळू माफिया भरदिवसा आणि रात्रीच्या वेळी गोदावरी नदीपात्रातून टाईटानिक जहाजा सारखे सक्शन पंप व बोटींच्या सहाय्याने वाळू उपसत आहेत. संबंधित महसूल व पोलिस विभागाचे अधिकारी या बेकायदेशीर धंद्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा गंभीर आरोप नागरिकांकडून होत असून, प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात सर्वसामान्यांत तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

बरबडा व टाकळी अंतरगाव परिसरात रोज १५ ते २० सक्शन पंपांच्या सहाय्याने हजारो ब्रास वाळू नदीतून उपसली जाते. ही वाळू लोहा तालुक्यातील येळी, कामळज, कौडगाव येथे साठवून मोठ्या हायवा टिपरमधून मारतळा,



कहाळा, मांजरम,गडगा, कौठा, गोणार मार्ग मुखेड व मारतळा ते कहाळा, नायगाव परिसरात खुलेआम विक्रीसाठी पोहोचवली जात असल्याचे समोर आले आहे.

लोहा येथील महसूल विभाग आणि उस्माननगर , कुंटूर, नायगाव पोलीस विभागातील काही अधिकाऱ्यांची मुक संमती असल्याची चर्चा स्थानिक नागरिक करीत आहेत. तलाठी, मंडळ अधिकारी आणि लोहा तहसील कार्यालयातील संबंधित अधिकारी यांना या अवैध व्यवसायातून दरमहा ठराविक हिस्सा मिळत असल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. नागरिकांकडून तोंडी व लेखी तक्रारी देऊनही प्रशासन गप्प राहिल्याने संशय अधिक गडद झाला आहे. उलट तक्रारदारांना अमाप माया जमा केलेले मुजोर वाळू माफियांकडून धमक्या मिळत असून, प्रशासन त्यांच्याच बाजूने असल्याचा आरोप केला जात आहे.

या संपूर्ण प्रकरणामुळे शासनाच्या महसुलाला लाखो रुपयांचा तोटा होत आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षकांनी वेगवेगळे पथक तयार करून तातडीने संबंधित महसूल व पोलिस अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी सर्व सामान्य नागरिकांकडून जोर धरत आहे.

# शिवसेना पदाधिकाऱ्यांनी जोमाने कामाला लागावे : रोहिदास चव्हाण

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. ३० ऑक्टोबर-**

आगामी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका निवडणुका शिवसेना (उबाठा )पक्षानी महाविकास आघाडीच्या माध्यमातून पूर्ण ताकदीने लढविणार असून, त्याअनुषंगाने लोहा-कंधार शिवसेना पदाधिकाऱ्यांशी संवाद साधण्यासाठी शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी आमदार तथा लातूर जिल्हा संपर्कप्रमुख रोहिदास चव्हाण यांनी सर्व शिवसेना पदाधिकाऱ्यांनी जोमाने कामाला लागावे, असे आवाहन केले.



शिवसेना पदाधिकाऱ्यांनी आपल्या जि.प. गटात व गणात, गाव वाडी तांड्यावर जबाबदारी घेऊन काम करावे. येत्या चार दिवसांत इच्छुकांच्या मुलाखती घेणार असल्याचेही चव्हाण म्हणाले.

यावेळी माजी पंचायत समिती सदस्य नवनाथ चव्हान, उपजिल्हाप्रमुख सतीश पाटील उमरेकर, उपजिल्हाप्रमुख भालचंद्र नाईक, पुरुषोत्तम धोंडगे, गणेश कुंटेवार, विधानसभा संघटक सुरेश पाटील हिलाल, विधानसभा प्रमुख बसंत पा. शिंदे, तालुकाप्रमुख भीमराव शिंदे ,तालुकाप्रमुख बालाजी गाडेकर, कंधार शिवसेना तालुकाप्रमुख परमेश्वर जाधव, माजी नगरसेवक रामकिशन पारेकर, शिक्षक सेनेचे खंडू पवार, साईनाथ पाटील, उपतालुकाप्रमुख परमेश्वर घोरपडे, विश्वनाथ पवार, शक्ती वने, संतोष ढवळे, राहुल ससाणे, दादाराव पाटील, संतोष घोरबांड, निरंजन वाघमारे यांच्यासह शेकडो शिवसेना पदाधिकारी या आढावा बैठकीस उपस्थित होते.

## भोकर येथे आज मॅरेथॉन स्पर्धा

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. ३० ऑक्टोबर-**

राष्ट्रीय एकता दिनानिमित्त पोलीस प्रशासनाच्या वतीने मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक बक्षीस व ट्रॉफी प्रदान करण्यात येणार आहे. त्यासाठी जास्तीत जास्त खेळाडूसह युवक युवतीने या स्पर्धेत सहभाग नोंदवावा असे आवाहन पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांनी केले आहे.

## तृष्णा तोटरे यांच्या उमेदवारी अर्ज दाखल केल्याने भाजपा कार्यकर्त्यांमध्ये उत्साह

**नायगाव**-राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका साठी नुकत्याच जाहीर झालेल्या आरक्षण सोडतीन्वये नायगाव तालुक्यातील नरसी जिल्हा परिषद सर्कल हे अनुसूचित जाती (महिला) प्रवर्गासाठी आरक्षित झाले आहे. यापार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या तिकिटावर उमेदवारी मिळावी या मागणी साठी गौरी शेळगाव ता.नायगांव येथील सौ. तृष्णा मनोहर तोटरे यांनी आपला उमेदवारी अर्ज सादर केला आहे.



आज, दि.२९ ऑक्टोबर रोजी बुधवारी दुपार नंतर माननीय आमदार राजेश पवार यांच्या नायगाव येथील संपर्क कार्यालयात दत्ता पाटील ढगे यांच्याकडे रीतसर अर्ज दाखल करण्यात आला या वेळी ॲड. रुपेश हाके उपस्थित होते. सौ. तृष्णा मनोहर तोटरे ह्या गौरी शेळगांव येथील उच्च विद्याविभुषीत असुन. त्यांना सामाजिक कार्या ची जाणीव आहे.व सर्वसामान्य जनतेत मिसळणारा स्वभाव आहे . यामुळे त्या परिसरातील जनतेच्या विशेष पसंतीस उतरल्या आहेत. त्यांचे पती प्रा. डॉ. मनोहर तोटरे हे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महा विद्यालयाचे प्राचार्य असून शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात त्यांचे मोलाचे योगदान आहे. सौ. तोटरे यांच्या उमेदवारी अर्ज सादरीकरणावेळी कार्यकर्त्यांनी नरसी जि प सर्कल मधील स्थानिक नेतृत्वाला संधी मिळाली पाहिजे अशी मागणी केली. या निमित्ताने नायगांव तालुक्यातील भाजपा कार्य कर्त्यांमध्ये मोठ्याउत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. स्थानिक पातळीवरील महिलांना राजकीय सक्षमी करणाची दिशा मिळावी आणि गावपातळीवरील नेतृत्वाला जिल्हा परिषदेत योग्य प्रतिनिधित्व मिळावे, हा सौ. तोटरे यांच्या उमेदवारी मागणी मागचा मूळ हेतू असल्याचे यावेळी सांगण्यात येत आहे.

## पुन्हा आसमानी संकट अती पावसामुळे बळीराजा पूर्णतः उध्वस्त

**हाणेगाव** -राज्यात परतीच्या मान्सूनने थैमान घातले असून, सततच्या अति पावसामुळे शेतकऱ्यांवर मोठे आसमानी संकट कोसळले आहे. खरीप हंगामातील काढणीला आलेली सोयाबीन, कांदा, मका आता कापूस मातीमोल झाली आहेत. नांदेड जिल्ह्यातील सीमेवरती भाग असलेला हाणेगाव परिसरातील गावच्या शेतीत पाणी साचल्याने कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे, ज्यामुळे शेतकरी पूर्णपणे हतबल झाला आहे. मागील काही दिवसांपासून चालुच आहे मध्येच चार दिवस उघाड दिला होता पण काल अचानक अवकाळी पावसाने हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतला आहे. सोयाबीन: बहुतांश भागांत सोयाबीनचे पीक पूर्णपणे सडले असून, काही ठिकाणी शेतातच अंकुर फुटले आहेत. कापूस: वेचणीला आलेल्या कपाशीची बोंडे पावसामुळे कुजली असून, गुणवत्ता पूर्णपणे खालावली आहे. शेतकरी हवालदील झाला आहे एकीकडे नैसर्गिक संकटे आणि दुसरीकडे शेतीसाठी घेतलेले कर्ज यामुळे शेतकरी पुरता अडचणीत सापडला आहे. संपूर्ण वर्षभराचे श्रम आणि केलेली गुंतवणूक पाण्यात गेली आहे. आता कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा आणि कर्जाची परतफेड कशी करायची, असा प्रश्न प्रत्येक शेतकऱ्यासमोर उभा राहिला आहे. निसर्गाच्या या प्रकोपाने शेतकरी मानसिक आणि आर्थिकदृष्ट्या खचला आहे. वरुन राज्य शासन तुटपुंजी अनुदान जाहीर केला आहे याच्यातुन साधा एका बेगाचा ही खर्च निघेना सध्यातर शेतकरी आसमानी व सुलतानी संकटात सापडल्याचे चित्र सर्वत्र दिसत आहे.

## भोकरमध्ये पेरकेवार समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळा

**नांदेड** -पेरकेवार, पेरकी, पेरकेवाड समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व शासकीय नोकरीस लागलेल्या जिल्ह्यातील नवतरुणांचा गौरव सोहळा भोकर मध्ये आयोजित करण्यात आला होता यावेळी आमदार शंकर अण्णा पायली आमदार श्रीजयाताई चव्हाण यांच्यासह मान्यवरांनी मार्गदर्शन केले. भोकर तालुक्यासह जिल्हाभरात पेरकेवाड पेरकी पेरकेवार समाज अल्पसंख्यांक असून त्यांची राजकीय सामाजिक, आर्थिक सुधारणा व्हावी यासाठी शिक्षणाची अत्यंत गरज आहे हाच हेतू डोळ्यासमोर ठेवून सामाजिक कार्यकर्ते तथा कंत्राटदार गोविंदराव उल्लेवाड यांनी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व शासकीय नोकरीस लागलेल्या नवतरुणांचा गौरव हा कार्यक्रम २६ ऑक्टोबर रोजी गणराज मंगल कार्यालय रिसॉर्ट येथे आयोजित करण्यात आला होता प्रारंभी शहरातून भव्य रॅली काढण्यात आली त्यानंतर आयोजित सत्कार सोहळा कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संयोजक गोविंदराव उल्लेवाड हे होते.दीप प्रज्वलन करुन उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला प्रमुख मार्गदर्शक आमदार शंकर अण्णा पायली यावेळी बोलताना म्हणाले आपला समाज गरीब असून विद्यार्थ्यांनी शिक्षण घेणे गरजेचे आहे, एकमेकांचे पाय न ओढता संघटन संघटित होऊन आपली वेगळी ओळख निर्माण करा. आमदार श्रीजयताई चव्हाण यांनी समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू असे मत व्यक्त केले गुणवंत विद्यार्थी व शासकीय नोकरीस लागलेल्या मान्यवर युवकांचा प्रशस्तीपत्र सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला, अध्यक्षीय समारोपात संयोजक गोविंदराव ऊलेवाड यांनी समाजाच्या विविध समस्या मांडल्या सर्वांनी संघटित होणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले या कार्यक्रमास माजी आमदार गंपा गोवर्धन, सभापती जगदीश पा.भोशीकर, प्रकाश देशमुख भोशीकर, भाजपा तालुका अध्यक्ष दिवाकर रेड्डी सुरकुंटवाड, उपसभापती बालाजी शानमवाड, शकुंतला ताई एंबडवार, राम येरावर, संभाजी आलेवाड यांच्यासह जिल्ह्यातील मान्यवर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रस्त्यांच्या अपूर्ण व प्रलंबित कामांमुळे वाहतुकीची परिस्थिती गंभीर

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ३० ऑक्टोबर-**

किनवट प्रतिनिधी दि. ३० : किनवट तालुका आणि शहर परिसरात रस्त्यांच्या अपूर्ण व प्रलंबित कामांमुळे वाहतुकीची परिस्थिती गंभीर बनली आहे. बुधवारी दुपार पासून झालेल्या जोरदार पावसामुळे किनवट-नांदेड राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६१ (अ) वरील थारा ते सावरी दरम्यानचा रस्ता पूर्णपणे चिखलमय झाला असून, बुधवारी रात्रीपासून हा मार्ग वाहतुकीसाठी बंद पडला होता. या ठिकाणी सुमारे ५० फुट लांबीपर्यंत रस्त्यावर चिखल साचल्याने सिमेंटचे केमिकल वाहुन नेणारे एक अवडज वाहने अडकून पडल्याने रस्त्यावर अवजड वाहन अडकुन पडले यामुळे वाहनचालकांना



मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

त्यामुळे धानोरा किंवा नांदेड कडे जाणाऱ्या वाहनांना थारादिग्रसचंद्रपूर तांडासावरी या पर्यायी लहान रस्त्याचा वापर करावा लागत आहे. मात्र या मार्गावर वाहनांची मोठी गर्दी असून, विशेषतः अवजड वाहनांची लांबच लांब रांग लागली आहे. लहान चारचाकी वाहने कसाबसा मार्ग काढत असली तरी मोठ्या वाहनांच्या वाहतुकीला पूर्णतः अडथळा निर्माण झाला आहे. तरी या ठीकाणी किनवट पोलिस प्रशासनाने शर्तीचे प्रयत्न करुन दुपारी १ वाजे पर्यंत रस्ता सुरळीत केल्याची माहिती पोलिस हेड कॉन्स्टेबल प्रकाश बोदमवाड यांनी माध्यमांना दिली.

दरम्यान, किनवट शहरातील मुख्य रस्त्याचे कामही पुन्हा ठप्प झाल्याने शहरात वाहतूक कोंडी, खड्डे व अपघातांच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. शहरातील प्रमुख चौकामध्ये चिखल, पाणी साचणे व वाहनांच्या रांगा लागल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. तसेच गोकुंदा येथिल किनवट शिव ते बाळासाहेब ठाकरे चौक पर्यंत रस्त्यावर प्रचंड खड्डे पडल्याने वाहनचालकांना त्रास होत आहे. अपघात होण्याची शक्यता नाकारता येत आहे. राष्ट्रीय महामार्गाचे काम अनेक वर्षांपासून प्रलंबित असुन या ठिकाणी रेल्वे उड्डाण पुलाचा विषय हि संबंधित राष्ट्रीय महामार्गाच्या कंत्राटदाराने अनेक वर्षांपासून प्रलंबित ठेवल्याने वाहतुक कोंडी व लहान मोठे अपघात हे नित्याचाच विषय झाला आहे.


त्यातच दक्षिण भारतातील मुसळधार पावसामुळे 'कृष्णा एक्सप्रेस' ही रेल्वे गाडी तिरुपती पर्यंत न जाता अर्धवट परत आल्याने परीनामी आदिलाबाद ते नांदेड अशी धावणारी इंटरसिटी एक्सप्रेस गाडी हि केवळ मुदखेड स्थानकापर्यंतच विलंबाने धावत असल्याने, किनवट तालुक्याचा जिल्हा मुख्यालयाशी रेल्वे संपर्कही तुटल्यासारखा झाला आहे.

त्यामुळे नागरिक, शासकीय कर्मचारी, विद्यार्थी तसेच व्यापारी वर्ग यांना प्रवासात मोठी गैरसोय भासत आहे. शेतकऱ्यांच्या अडचणींमध्ये वाढ झाली आहे. रब्बी हंगामाची पेरणी सुरू असताना व खरीप हंगामातील काढणीसाठी तयार पीक शेतातच अडकलेले आहे. सततच्या पावसामुळे आणि रस्ते बंद झाल्याने वाहतूक ठप्प झाल्याने पीक बाहेर काढणे, बाजारात पोचवणे अवघड झाले आहे. परिणामी आधीच अतिवृष्टीमुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना पुन्हा एकदा संकटाचा सामना करावा लागत आहे.नागरिक व शेतकरी यांचा प्रशासनाकडे मागणी आहे की, रस्त्याची तातडीने दुरुस्ती करून वाहतूक सुरळीत करावी, तसेच शहरातील रस्त्यांची अपूर्ण कामे त्वरीत पूर्ण करून नागरिकांना दिलासा द्यावा.

# प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे शहिद स्मारकांवर मोकाट कुत्र्यांचा ताबा







**मिलिंद वाघमारे**
**देगलूर, दि. ३० ऑक्टोबर-**

येथील स्वातंत्र्यसंग्रामात सहभागी झालेले सैनिक आणि शहीद जवानांच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेली स्मारके प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे आज दयनीय अवस्थेत दिसत आहेत. शहीद अब्दुल हमीद स्मारक, शहीद कॅप्टन डॉ. मनोज काशिनाथ आप्पा दयाडे चौक तसेच देगलूर पोलिस ठाण्यासमोरील भारतीय स्वातंत्र्य संग्रामात सहभागी झालेल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेल्या स्मारकावर मोकाट कुत्र्यांचा संचार वाढला आहे. तर रोषणाईसाठी बसवलेले काही दिवे बंद पडले आहेत. तसेच काही स्मारकांवर गवतही उगवलेलं आहे.

लाखो रुपये खर्च करून उभारलेली ही स्मारके देगलूर शहराचे वैभव आहेत. येणाऱ्या पिढ्यांना राष्ट्रप्रेम, देशभक्ती आणि राष्ट्र स्वाभिमान शिकवणारी ही स्मारके प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अक्षरशः कुत्रांचे निवासस्थान बनले आहेत, हे अत्यंत दुदैवी बाब आहे.

स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण करणाऱ्या वीरांच्या स्मृतींचा हा अपमान नाही का ? देगलूर नगरपरिषद प्रशासनाला राष्ट्रभक्ती आणि राष्ट्र स्वाभिमानाची जाणीव आहे का ? यावर आता प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत. लाखो रुपयांची स्मारके उभारली पण अल्प दराचे दरवाजे बसवलेच नाहीत. तर कॅप्टन डॉ. मनोज काशिनाथ आप्पा दयाडे चौकाचे लोखंडी खुप लहान झाल्यामुळे मोकाट कुत्र्यांचा संचार स्वारकांवर होतांना दिसतोय.

विशेष म्हणजे, छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि महात्मा बसवेश्वर स्मारक या ठिकाणी दरवाजे व कुंपण असल्याने मोकाट कुत्र्यांचा संचार नाही. मात्र, शहीद जवानांच्या स्मारकांकडेच दुर्लक्ष झाल्याने ही अवस्था पहावयास मिळते.

शासनाकडून स्वच्छतेसाठी लाखो रुपये खर्च केले जातात. राष्ट्रभक्ती आणि राष्ट्र स्वाभिमानाची प्रेरणा मिळावी म्हणून विविध उपक्रम राबवले जातात. परंतु देगलूर शहरातील शहीद स्मारकांची ही अवस्था पाहता, स्वच्छता आणि राष्ट्रप्रेम या दोन्ही मूल्यांकडे प्रशासनाकडून दुर्लक्ष झाल्याचे दिसून येतं. नगरपरिषदेला नुकताच कामगिरीबद्दल पुरस्कार मिळाला असला तरी या स्मृतींचे रक्षण करण्यात अपयश आल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

# नांदेड-सुरत एक्सप्रेस रेल्वे सुरू करण्याची खासदाराकडे मागणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३० ऑक्टोबर-**

मराठवाडा जिल्ह्यातील व्यावसायिक,नोकरदारकर्मचारी वर्ग, औद्योगिक कर्मचारी, उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी व रोजगारानिमित्त मुंबई पश्चिम भागातील बोरीवली, भाईंदर, वसई-विरार तसेच पालघर, बोईसर, डहाणू व गुजरातमधील वापी,वलसाड,सुरत या ठिकाणी बरेच लोक स्थायिक झालेले आहेत.




सदर भागातून छत्रपती संभाजी नगर, हिंगोली, परभणी, नांदेड धर्माबाद या भागात दळणवळणासाठी एकही रेल्वे गाडी नाही. त्यामुळे प्रवास करताना अनेक ठिकाणाहून रेल्वे गाड्या बदलत जोखमीचा प्रवास करावा लागत आहे. तसेच वाढत्या प्रवाशांमुळे रेल्वेचे आरक्षण मिळणे दिवसेंदिवस कठीण होत आहे.

मुंबई पश्चिम भागातील 'मराठवाडा मित्र मंडळाच्या १वतीने प्रतिनिधी म्हणून दर्शन भंडारे यांनी नांदेड ते सुरत व सुरत ते नांदेड व्हाया कल्याण-वसईविरार मार्गे अशी दैनंदिन धावणारी एक्सप्रेस रेल्वेगाडी सुरू करण्याबाबतच्या मागणीचे लेखी निवेदन नांदेड-१६ लोकसभा सदस्य खासदार रविंद्र चव्हाण यांच्याकडे दिले आहे.

मराठवाड्यातून मुंबई व गुजरातला ये-जा करणार्या प्रवाशांची वारंवारिता जास्त व रेल्वे गाड्यांची वारंवारिता कमी असल्याने प्रवास करण्याच्या चिंतेने प्रवासी जनता हैराण आहेत. शैक्षणिक क्षेत्रातील उच्च शिक्षण घेण्यासाठी मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना छत्रपती संभाजी नगर, नाशिक व मुंबईला जावे लागते. तसेच प्रशासकीय कर्मचारी, कापड व इतर व्यावसायिक, चखऊ तील नोकरदार वर्ग तसेच रोजगाराच्या शोधातील करमानी यांच्यासाठी एक्स्प्रेस रेल्वेगाडी सुरू झाल्यास अत्यंत सोईचे,सुरक्षित व सुखकर प्रवास होण्याची आशा आहे.

## समाधी सोहळ्याच्या निमित्त उमरीत उत्सव



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३० ऑक्टोबर-**

उमरी तालुक्यातील असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री सद्गुरू सदानंद बाबा महाराज यांच्या १०१ व्या संजीवन समाधी सोहळ्याच्या निमित्ताने उमरी शहरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मराठवाडा ,तेलंगणा, आंध्र प्रदेश तसेच नजीकच्या कर्नाटक राज्यातील असंख्य भाविक भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री सदानंद सद्गुरु बाबा महाराज यांच्या संजीवन सोहळ्यानिमित्त दरवर्षी येथे हजारो भाविकांची उपस्थिती असते. ७,८, व ९ नोव्हेंबर रोजी उमरी शहरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दररोज सकाळी संजीवन समाधी मंदिरात काकड आरती, पूजाअर्चा, यानंतर दुपारी चार वाजता कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. ७ नोव्हेंबर रोजी श्री विक्रम महाराज नांदेडकर यांचे कीर्तन होईल. ८ नोव्हेंबर रोजी सकाळी माळावरचा गणपती येथे भाविकांची पायी पदयात्रा काढण्यात येईल. दुपारी श्री माधवराव वडगावे महाराज यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम होईल. ९ रोजी सकाळी काकड आरती, महाअभिषेक पूजाअर्चा यानंतर शहरातून सद्गुरु श्री सदानंद बाबा महाराज यांच्या पादुकांची पालखी मिरवणूक निघेल. दुपारनंतर समाधी मंदिर परिसरात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व भाविकांनी या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा. असे आवाहन संस्थानाधिपती अरविंद महाराज यांनी केले आहे.

# मुस्लिम बांधवांनी एकजूट होऊन येणाऱ्या नगरपालिका निवडणुकीसाठी लढा द्यावा: सय्यद मोईन

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ३० ऑक्टोबर-**

मुदखेड शहरातील रेल्वे स्टेशन मदिना नगर येथे दि. २८ ऑक्टोंबर रोजी ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन पक्षाचे माजी प्रदेश अध्यक्ष सय्यद मोईन यांच्या प्रमुख उपस्थितीत सभा संपन्न

सय्यद मोईन यांनी या सभेत बोलताना म्हणाले कि देशात मुस्लिम समाजावर मोठ्या प्रमाणावर अन्याय होत आहेत म्हणून मुस्लिम समाजातील नेत्यांनी जातीवादी पक्षाच्या मागे न लागता तुमच्यासाठी एमआयएम पक्षाचे दरवाजे खुले आहेत असे जाहीर आवाहन केले.

मुदखेड शहरामधील मुस्लिम गल्ली व



वार्डात रोड रस्ता नाल्यांची दुरअवस्था झाली याकडे सत्ताधाऱ्याचे सर्रास दुर्लक्ष केले जात आहे हे तुम्ही डोळ्यांनी पाहत आहात असेही सय्यद मोईन यांनी आपल्या भाषणात सांगितले आहे.

पुढे बोलताना म्हणाले कि शहरातील शादी खान्याचे बेहाल झाले असुन येथील मुस्लिम समाजांना आपल्या मुला मुलीचे लग्न करण्यासाठी नांदेडला जावावे लागत आहे यापेक्षा दुर्भाग्य काय असा प्रश्न सय्यद मोईन यांनी जाहीर सभेत मुस्लिम समाजापुढे उपस्थित केला.

काँग्रेस पक्षाने गेल्या अनेक वर्षापासून मुस्लिम समाजाला केवळ मतदानासाठी वापर केला असून संसद मध्ये मुस्लिम समाजाबद्दल बिल पास करायच असेल किंवा एखाद्या बिलाला विरोध करायच असेल तर एम आय एम पक्षाचे खासदार असदुद्दीन ओवेसी यांच्या सोबत एक ही काँगेस खासदार साथ देत नाहीत मग तुम्ही काँग्रेस पक्षाच्या नादाला का लागता असाही प्रश्न जाहीर सभेत उपस्थित केला.

शहरात मुस्लिम समाज मोठ्या प्रमाणावर असून या ठिकाणी विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी उर्दू कॉलेज नाही पिण्याला स्वच्छ पाणी मिळत नाही अशा मूलभूत सुविधे पासून समाजाला वेठीस धरतात या करिता मुस्लिम बांधवांनी एकजूट होऊन येणाऱ्या नगरपालिका निवडणुकीसाठी लढा द्यावा असे आव्हान सय्यद मोईन यांनी केले.

याप्रसंगी माजी मराठवाडा अध्यक्ष फेरोज लाला, माजी जिल्हाध्यक्ष मिर्झा अमजद बेग, विधानसभा अध्यक्ष अब्दुल लतीफ , शहराध्यक्ष मोहम्मद हुसेन, मौलाना हाफीज यहीया , मोहम्मद मजीद, मोहम्मद महमूद, मोहम्मद अफरोज बागवान, मोहम्मद मजीद यांच्यासह मुस्लिम समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## स्क्रब टायफसचा शिरकाव; जिल्ह्यात आरोग्य विभाग सतर्क

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० ऑक्टोबर -**
राज्यात पुन्हा एकदा स्क्रब टायफस या संसर्गजन्य आजाराचा शिरकाव झाला असून, यवतमाळ व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांमध्ये या आजाराचे रुग्ण आढळले आहेत. यामुळे सार्वजनिक आरोग्य विभागाने नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

या संदर्भात सहसंचालक, हि.ह.व. जलजन्य आजार, आरोग्य सेवा, पुणे यांनी सर्व जिल्ह्यांना मार्गदर्शक सूचना दिल्या असून, जिल्ह्यात आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरू करण्यात आल्या आहेत.

आरोग्य विभागाने सर्व वैद्यकीय अधीक्षक, वैद्यकीय अधिकारी व तालुका आरोग्य अधिकारी यांना सतर्क राहून आवश्यक प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक उपाययोजना राबविण्याचे निर्देश दिले आहेत.

नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता, ताप, डोकेदुखी किंवा अंगावर पुरळ अशी लक्षणे आढळल्यास घाबरू नये व त्वरित जवळच्या सरकारी आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. मैनाक घोष, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. धाराशिव, तसेच डॉ.एस.एल. हरिदास, जिल्हा आरोग्य अधिकारी, धाराशिव यांनी केले आहे.



# अतिवृष्टी अनुदान वितरणातील दिरंगाईबाबत शिवसेनेची तहसील कार्यालयास धडक

## प्रशासकीय यंत्रणेच्या ढिसाळ व गलथान कारभाराविरोधात निवेदन...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० ऑक्टोबर -**
खरीप हंगाम २०२४ व २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर शेतीचे तसेच घरांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनाने भरघोस अनुदान मंजूर केले असले, तरी अद्यापही अनेक शेतकऱ्यांच्या खात्यावर अनुदानाची रक्कम जमा झालेली नाही. मागील सात-आठ महिन्यांपासून महसूल प्रशासनाचा कारभार अत्यंत संथ गतीने सुरू असून, शेतकऱ्यांना शासनाच्या मदतीपासून वंचित राहावे लागत आहे.

अतिवृष्टीच्या काळात झालेल्या नुकसानीच्या भरपाईसाठी शासनाच्या मदतीची अपेक्षा असताना महसूल यंत्रणेचा ढिसाळ व गलथान कारभार उघड झाला आहे. अनेक शेतकऱ्यांचे घर पडझड झाल्यानंतर त्यांना मंजूर झालेले अनुदान आजतागायत वितरित झालेले नाही. तसेच वाहून गेलेल्या जनावरांचा अहवाल शासनाकडे न गेल्याने संबंधित पशुपालकांना नुकसानभरपाई मिळण्यात विलंब होत आहे.

नदीकाठच्या खरडून गेलेल्या जमिनींसाठी शासनाने भरघोस अनुदान मंजूर केले असले तरी उमरगा व लोहारा तालुक्यातील स्वयंस्पष्ट अहवाल शासनाकडे न गेल्याने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदतीपासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मग्रारोहयो योजनेतून दिल्या जाणाऱ्या लाभाबाबतही प्रशासनाकडून कोणतीही ठोस पावले उचलण्यात आलेली नाहीत.

याशिवाय, २०२४ च्या अनुदान वितरणासाठीचे पोर्टल बंद असल्याने आणि केवायसी प्रक्रिया पूर्ण केलेल्याही अनेक शेतकऱ्यांना अद्याप रक्कम मिळालेली नाही. २०२५ साली झालेल्या अतिवृष्टीत नुकसान झालेल्या शेतकऱ्यांनाही अद्याप शासनाने मंजूर केलेल्या अनुदानाचा लाभ मिळालेला नाही. अनेकांच्या फार्मर आयडी व आधारवरील नावातील तफावत, तसेच एकाच व्यक्तीच्या नावे



असलेल्या जमिनींच्या नोंदीतील गोंधळामुळे तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. या सर्व मुद्द्यांवर शिवसेनेच्या वतीने महसूल प्रशासनास निवेदन देण्यात आले, आणि तातडीने कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली. या अनुषंगाने तहसीलदार उमरगा यांनी सांगितले की, महसूल प्रशासनाच्या वतीने दर शनिवार व रविवारी प्रत्येक गावात शिबिरे घेऊन अनुदान वितरणासंबंधीच्या तांत्रिक अडचणी एका महिन्यात दूर केल्या जातील. या कार्यात स्थानिक शिवसैनिक प्रशासनाला सहकार्य करतील, अशी हमी युवा सेना मराठवाडा निरीक्षक किरण गायकवाड यांनी दिली.

यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख बळीराम सुरवसे, उपतालुकाप्रमुख प्रताप लोभे, व्यंकट पाटील, शेखर पाटील, युवा सेना जिल्हाप्रमुख सचिन जाधव, तालुकाप्रमुख विनोद कोराळे, शहरप्रमुख योगेश तपसाळे, माजी गटनेते संतोष सगर, पंढरीनाथ कोणे, मनोज जाधव, शहाजी येळीकर, बाळू शिंदे, अरुण जगताप, प्रदीप शिवनेचारी, राहुल शिंदे, गोपाळ घोडके, रोहित पवार, नामदेव पवार, अविनाश कदम, जितेंद्र पोतदार, विरपक्षय्या जवळगे, तुळशीदास चौगुले, संदीप चव्हाण, आयुब लदाफ, कुमार गाढवे, बाबा शेख आदी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### जितेंद्र खेडकर यांनी पहिला पगार श्री तुळजाभवानी देवींच्या चरणी अर्पण

**तुळजापूर, दि.३० ऑक्टोबर -**
अहिल्यानगर जिल्ह्यातील चिचोंडी पाटील येथील जितेंद्र बापू खेडकर यांनी भारतीय सैन्यात भरती झाल्यानंतर आपला पहिला पगार श्री तुळजाभवानी देवींच्या चरणी अर्पण करून देशसेवेच्या प्रवासाची सुरुवात देवीच्या आशीर्वादाने केली. आज सकाळी ते आपल्या कुटुंबासह श्री क्षेत्र तुळजापूरात दाखल झाले. त्यांनी भक्तिभावाने देवींचे दर्शन घेऊन पहिला पगार अर्पण केला. याप्रसंगी श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे जनसंपर्क अधिकारी अनिरुद्ध देशपांडे यांनी देवीची प्रतिमा भेट देऊन जितेंद्र खेडकर यांचा सन्मान केला. सैन्यात भरती होणे ही आयुष्यातील मोठी उपलब्धी असून पहिला पगार देवीला अर्पण करणे हे माझे कर्तव्य आहे, अशा भावना खेडकर यांनी व्यक्त केल्या.



### अपूर्वा रेड्डीची राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड

**उमरगा, दि.३० ऑक्टोबर -**
स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिरची विद्यार्थिनी अपूर्वा रेड्डी हिने धाराशिव येथे पार पडलेल्या लातूर विभागीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड मिळवली आहे. १४ वर्षांखालील मुलींच्या गटात अपूर्वाने पहिल्या फेरीपासूनच आघाडी राखत विजय मिळवला. स्पर्धेच्या विजेत्यांना महिला व बालकल्याण अधिकारी गणेश कुकडे, नंदकुमार सुरू, अक्षय बिराजदार, जावेद शेख व महादेव भोरे यांच्या हस्ते गौरविण्यात आले. अपूर्वाच्या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. चंद्रकांत महाजन, अध्यक्ष मल्लिकार्जुन दंडगे, कार्यवाह डॉ. कपिल महाजन, मुख्याध्यापिका सविता लोहार व सर्व शिक्षकांनी अपूर्वा रेड्डी व तिचे मार्गदर्शक शिक्षक दत्तात्रय कोकणे यांचे अभिनंदन केले.



### तुळजापूरमध्ये युवकांचा राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) मध्ये प्रवेश

**तुळजापूर, दि.३० ऑक्टोबर -**
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) च्या संघटन बळकटीकरण उपक्रमाला तुळजापूरात मोठा प्रतिसाद मिळत असून, प्रभाग क्रमांक पाचमधील असंख्य युवकांनी २९ ऑक्टोबर रोजी पक्षात जाहीर प्रवेश केला. या कार्यक्रमाला ज्येष्ठ नेते अनिल शिंदे, जिल्हाध्यक्ष धनंजय पाटील, तालुकाध्यक्ष धैर्यशील पाटील, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष तोफिक शेख तसेच आकाश शिंदे, विवेक शिंदे, शरद जगदाळे, अमर चोपदार, रुबाब पठाण, अक्षय परमेश्वर आदी मान्यवर उपस्थित होते. आगामी तुळजापूर नगर परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेला हा युवकांचा प्रवेश पक्षाला नवसंजीवनी देणारा ठरणार आहे. युवकांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) च्या विचारधारेवर विश्वास ठेवत शहर विकासासाठी आणि नागरिकांच्या समस्यांवर सकारात्मक काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.



### खंडोबा मंदिर चौकात प्रवाशांच्या सुरक्षेसाठी गतिरोधक बसवण्याची मागणी

**नळदुर्ग, दि.३० ऑक्टोबर -**
नळदुर्ग बायपासवरील खंडोबा मंदिराकडे जाणाऱ्या चौकात प्रवाशांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, राष्ट्रीय महामार्ग विभागाने तात्काळ गतिरोधक बसवावेत, अशी मागणी खंडोबा भक्त, शेतकरी, पशुपालक आणि नागरिकांनी केली आहे. सोलापूर-हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गावर गतिरोधक नसल्याने भरधाव वेगात जाणाऱ्या वाहनांमुळे मंदिराकडे जाणाऱ्या भाविकांना तसेच शेतकऱ्यांना मोठा धोका निर्माण झाला आहे. शेतात जाणारे शेतकरी, दुचाकीस्वार आणि स्थानिक नागरिकांना हा महामार्ग ओलांडताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. लवकरच श्रीक्षेत्र मैलारपुर येथे खंडोबा देवाचे आगमन होणार असून, भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी अपेक्षित आहे. त्यामुळे जीवितहानी टाळण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग विभागाने तातडीने गतिरोधक आणि वेगमर्यादा दर्शक फलक बसवावेत, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात आली आहे.

## न.पा.च्या निवडणुकीत नव्या चेहऱ्यांचा उत्साह; मतदारांचा बदलाचा निर्धार

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३० ऑक्टोबर -**
नळदुर्ग नगरपालिकेच्या आगामी निवडणुकीकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले असून, यावेळी अनेक नवीन चेहरे आणि युवक उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची शक्यता आहे. गेल्या अनेक वर्षांपासून त्याच त्या नगरसेवकांना वारंवार निवडून देणाऱ्या मतदारांमध्ये आता बदलाची भावना निर्माण झाली असून, नव्या नेतृत्वाला संधी देण्याचा निर्धार मतदारांनी केला आहे.

नळदुर्ग नगरपालिकेच्या निवडणुकीचा कार्यक्रम लवकरच जाहीर होणार असल्याने, सोशल मीडियावर भावी नगरसेवक म्हणून मिरविण्याची चढाओढ शहरात सुरू झाली आहे. फेसबुक, इंस्टाग्राम, व्हॉट्सअॅप आदी माध्यमांवर अनेक तरुणांनी प्रचाराची झुंज सुरु केली आहे.

या संभाव्य उमेदवारांमध्ये सुशांत भुमकर, मारुती खारवे, पद्माकर घोडके, ज्ञानेश्वर घोडके, बबन चौधरी, श्रमिक पोतदार, पांडुरंग पुदाले, चंद्रकांत (यारा) दस, खालेद इनामदार, तानाजी जाधव, अमोल सुरवसे, शिवाजी सुरवसे, गौस कुरेशी, संजय विठ्ठल जाधव, प्रमोद कुलकर्णी, संभाजी कांबळे, धीमाजी घुगे यांसह भीमनगर, वसंतनगर, दुर्गानगर परिसरातून अनेक नवे चेहरे निवडणुकीसाठी तयारी करत आहेत.



यामुळे जुने नगरसेवकांसमोर या नव्या उमेदवारांचे मोठे आव्हान उभे राहणार आहे. मतदारही आता जुन्या चेहऱ्यांना कंटाळले असून, शहराचा विकास करायचा असेल तर नव्या पिढीला संधी दिली पाहिजे अशी भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. राजकीय पक्षांनीही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये युवक आणि नव्या चेहऱ्यांना संधी देण्याचा निर्णय घेतल्याचे संकेत मिळत आहेत. त्यामुळे यंदाची नळदुर्ग नगरपालिका निवडणूक अधिक रंगतदार होणार असून, शहराच्या विकासाच्या दृष्टीने नव्या नेतृत्वाची चाचणी ठरणार आहे.

अनेक वर्षांपासून नगरसेवक पदावर असणाऱ्या काहींच्या एकाधिकारशाहीमुळे शहरातील विकासकामांना खीळ बसल्याची टीका होत आहे. त्यामुळे मतदारांमध्ये बदलाची लाट दिसत असून, जुन्यांसोबत नव्यांनाही संधी द्यावी ही भावना अधिक बळावत आहे.

## महायुतीला प्राधान्य; मात्र स्वबळाची तयारीही ठेवावी : अॅड. अशोक पटवर्धन



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.३० ऑक्टोबर -**
उमरगा-आगामी नगरपरिषद निवडणुकांना महायुतीच्या रूपाने सामोरे जाण्याचे आदेश पक्षाकडून मिळाले असून, स्थानिक पातळीवर देखील महायुतीलाच प्राधान्य दिले जाणार आहे. मात्र, ऐनवेळी काही कारणांमुळे युती न झाल्यास कार्यकर्त्यांनी गाफील न राहता स्वबळावरही तयारी ठेवावी, असे आवाहन शिवसेना मराठवाडा विभागीय सचिव अॅड. अशोक पटवर्धन यांनी केले.

उमरगा व मुरूम नगरपरिषद निवडणुकीच्या अनुषंगाने शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आढावा बैठक मंगळवार, दि.२८ रोजी सायंकाळी शासकीय विश्राम गृह, उमरगा येथे पार पडली. यावेळी अॅड. पटवर्धन बोलत होते. यावेळी बोलताना प्रा. रविंद्र गायकवाड म्हणाले की, आगामी निवडणुकांसंदर्भात जिल्ह्यातील तसेच तालुक्यातील महायुतीतील सर्व घटक पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांशी चर्चा सुरू असून त्यास सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. मात्र, कार्यकर्त्यांनी निष्क्रिय न राहता आपला उमेदवार जास्तीत जास्त मतांनी निवडून येण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

प्रचारादरम्यान जुने व नवे पदाधिकारी एकत्रित राहून समन्वयाने काम करण्याच्या सूचना त्यांनी कार्यकर्त्यांना दिल्या.

बैठकीत शिवसेना उपनेते तथा माजी आमदार ज्ञानराज चौगुले, बाजार समितीचे माजी सभापती जितेंद्र शिंदे, सहसंपर्कप्रमुख भगवान देवकाते, युवती सेना निरीक्षक अॅड. आकांक्षा चौगुले आदींची भाषणे झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक युवा सेना निरीक्षक किरण गायकवाड यांनी केले.

## डॉ. मुरहरी केळे यांची 'पॉवर अँन्ड एनर्जी एक्सपर्ट समिती' च्या अध्यक्षपदी नियुक्ती

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० ऑक्टोबर -**
पॉवर अॅण्ड एनर्जी एक्सपर्ट समिती' च्या अध्यक्षपदी डॉ. मुरहरी केळे यांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ग्रिकल्चरचे अध्यक्ष रवींद्र माणगावे यांनी प्रसिद्धीस दिले आहे.



धाराशिव जिल्ह्याचे सुपुत्र डॉ.मुरहरी केळे यांना उर्जा आणि विद्युत क्षेत्रातील ३५ वर्षापेक्षा जास्त अनुभव असून त्यांनी महाराष्ट्र, मध्यप्रदेश, त्रिपुरा राज्यांतील विद्युत मंडळात 'संचालक' तसेच 'अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक' अशा उच्च पदांवर काम केले असून त्यांच्या कार्यकाळात उद्योग आणि कृषी क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी अनेक धोरणात्मक निर्णय घेतले आहेत. त्यांनी दहा पेक्षा जास्त मराठी आणि इंग्रजी पुस्तके लिहिली असून त्यांचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर तसेच अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठात शोधनिबंध सादर केले आहेत.

डॉ. मुरहरी केळे यांच्या संस्थेच्या 'पॉवर अँन्ड एनर्जी एक्सपर्ट समिती' च्या अध्यक्षपदी नियुक्तीनंतर सर्वस्तरावरून अभिनंदन केले जात आहे.

## त्रासाला कंटाळून तरुणाची आत्महत्या; चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

**वाशी, दि.३० ऑक्टोबर -**
वाशी तालुक्यातील सारोळा मांडवा येथील राहुल नांगरे या तरुणाने व्हॉटसअपवरील छळाला कंटाळून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी चौघांविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

फिर्याद माणिक महादेव नांगरे (रा. सारोळा मांडवा) यांनी दिली असून, सोनाली राहुल नांगरे (पत्नी), वसंत पवार, तेजश्री वसंत पवार आणि प्रसाद वसंत पवार (रा. सोलापूर) या चौघांविरुद्ध सोने व पैशाच्या कारणावरून मानसिक त्रासास दिल्यास आरोप आहे.

## रेणुका गायकवाड काँग्रेसकडून उमेदवारीसाठी प्रयत्नशील

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.३० ऑक्टोबर -**
येवती पंचायत समिती गण सलग दुसऱ्यांदा एस.सी. महिला प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आला असून, या गणातून मौजे इटकळ येथील काँग्रेसचे निष्ठावंत कार्यकर्ते स्व. विजयकुमार गायकवाड यांच्या कन्या रेणुका गायकवाड या काँग्रेसकडून उमेदवारीसाठी प्रयत्नशील आहेत.

स्व. विजयकुमार गायकवाड यांनी सामाजिक कार्यातून तालुक्यात ओळख निर्माण केली होती. त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेत, रेणुका गायकवाड यांनी सामान्य जनतेपर्यंत शासकीय योजना पोहोचवण्याचा संकल्प व्यक्त केला आहे.

काँग्रेसकडून उमेदवारी मिळाल्यास सर्व ताकदीनिशी निवडणूक लढवणार असल्याचे गायकवाड यांनी सांगितले. दरम्यान, शहापूर जिल्हा परिषद गटात त्यांच्या कुटुंबाचा मजबूत जनाधार असल्याने त्यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## भाऊसाहेब बिराजदार साखर कारखान्याचा आठवा गाळप हंगाम सुरू

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.३० ऑक्टोबर -**
संघर्षातून उभारलेला भाऊसाहेब बिराजदार सहकारी साखर कारखाना (क्युनर्जी इंडस्ट्रीज लि.) आज परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत असून, मागील आठ वर्षांपासून सर्वाधिक दर व वेळेवर हप्ता देणारा कारखाना म्हणून कारखान्याने विश्वास संपादन केला आहे, असे प्रतिपादन प्रा. सुरेश बिराजदार यांनी केले.



दि.२७ ऑक्टोबर रोजी झालेल्या आठव्या गाळप हंगामाच्या शुभारंभ सोहळ्यात त्यांनी हे मत व्यक्त केले. यावेळी मोळी व गव्हाण पूजन माणिकराव बिराजदार यांच्या हस्ते तर काटा पूजन शेतकऱ्यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी कारखान्याचे संचालक सुनिल माने, साहेबराव पाटील, गोविंदराव साळुंके, युवराज पाटील, इमाम पटेल, आर. डी. माने यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. प्रा. बिराजदार यांनी सांगितले की, कारखाना शेतकऱ्यांचा ऊस संपेपर्यंत अखंडपणे गाळप सुरू ठेवणार असून, योग्य दरासह वेळेत हप्ता दिला जाणार आहे. कारखान्यात इथेनॉल आणि वीज निर्मितीची आधुनिक यंत्रणा उभारली असून, तोडणी व वाहतूक यंत्रणा आणि हार्वेस्टरसाठी करार करण्यात आले आहेत. कारखान्याला उच्च प्रतीचा ऊस मोठ्या प्रमाणात पुरवठा करावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

या कार्यक्रमास गहिनीनाथ कोकाटे, संजय जाधव, किसन जाधव, आयुब इनामदार, सत्यनारायण जाधव, प्रदीप पाटील, माधवराव पाटील आदींसह क्युनर्जी इंडस्ट्रीजचे जीएम पाटील बी.जे., चिफ इंजिनिअर राहुल मेरगळ, मुख्य शेती अधिकारी रामचंद्र शेंडगे, चिफ केमिस्ट सुरज पांढरे, डिस्टिलरी मॅनेजर ज्ञानेश्वर कोळगे आणि अनेक ऊस उत्पादक सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भैरवनाथ कानडे यांना राज्यस्तरीय 'लोकसंसद जनप्रेरणा शिखर पुरस्कार' प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३० ऑक्टोबर -**
चिकुंद्रा (ता. तुळजापूर) येथील श्री भैरवनाथ माध्यमिक विद्यालयाचे सहशिक्षक, निवेदक व सामाजिक कार्यकर्ते भैरवनाथ खंडु कानडे यांना शैक्षणिक, सामाजिक व जनजागृती क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल राज्यस्तरीय लोकसंसद जनप्रेरणा शिखर पुरस्कार-२०२५ या सर्वोच्च सन्मानाने गौरविण्यात आले आहे.



मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे पार पडलेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात अभिनेत्री अलका कुबल, डॉ. निशिगंधा वाड, अभिनेते रोहित कोकाटे, तसेच महाराष्ट्र शासनाचे ओमप्रकाश शेटे, उद्योजक छगन पाटील व सुरेश यादव यांच्या हस्ते त्यांना सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र प्रदान करण्यात आले.

हा पुरस्कार क्रांती ग्रामविकास संस्था व विश्वनायक लोकसंसद फाउंडेशन, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षण, समाजसेवा, साहित्य, संस्कृती आणि जनजागृती क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींना दिला जातो.

भैरवनाथ कानडे हे मागील २२ वर्षांपासून शिक्षक म्हणून कार्यरत असून, शैक्षणिक गुणवत्तावृद्धी, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि समाजातील जनजागृतीसाठी त्यांनी सातत्यपूर्ण प्रयत्न केले आहेत. यापूर्वी त्यांना महाराष्ट्र शासनाचा क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार, संत रविदास संस्था पुरस्कार (सामाजिक न्याय विभाग) आणि केंद्र शासनाचा नेहरू युवा पुरस्कार यांसह अनेक सन्मानांनी गौरविण्यात आले आहे.

त्यांच्या या यशाबद्दल शैक्षणिक, सामाजिक आणि पत्रकारिता क्षेत्रातून सर्वत्र कौतुक व्यक्त केले जात आहे.


### जाहीर प्रकटन
**तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार उमरगा यांचे कार्यालय**
**(दंडणीय विभाग)**

**जा.क्र.२०२४/दंडणीय/कावि-** **दिनांक २८/१०/२०२५**

समस्त गावकरी मौजे बलसुर ता. उमरगा जिल्हा धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात श्रीफ संतोष मोतीराम राठोड रा. बलसुर ता. उमरगा जि. धाराशिव यांनी त्यांच्या मुलीच्या नावे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत मागणी केली आहे.

**जन्म झालेल्याचे नाव : गीता संतोष राठोड**

वरिल व्यक्तीचा मौजे बलसुर .उमरगा जि. धाराशिव या ठिकाणी दि. ३०/०४/१९९९ या दिवशी जन्म झाला असून प्रमाणपत्र मिळणे संबंधी सदरील कार्यालयात दिनांक २९/०९/२०२५ या रोजी अर्ज केला आहे.

वरील जन्म / मृत्यू बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा. आक्षेप मुदतीनंतर च्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार**